**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग - दोन**

**सोमवार, दिनांक ८ जून, २०२६ / ज्येष्ठ १८, १९४८ (शके)**

८५. **<u>लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-</u>**

विधानसभेचे सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण ३६१ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. ३६१ निवेदनांपैकी २४७ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण ११४ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. आता ३८ निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ७६ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णतः ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ द्वारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : १ जून, २०२६**

**मेघना तळेकर**
**सचिव-२,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१०) संगणक कक्ष
११) एम.के.सी.एल.
१२) अनुवाद कक्ष
१३) प्रतिवेदन कक्ष

लक्षवेधी सूचना क्र.६७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री. काशिनाथ महादु दाते सर, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री.रोहित पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६७ पुढीलप्रमाणे आहे :-**

**"बीड येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू झालेल्या पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये दीपक वाहुळे या तरुणांनेही धावण्यामध्ये सहभाग घेतलेला असणे, त्याने १६०० मीटर धावण्याची चाचणी पूर्ण केल्यानंतर त्याचा शरीरातील पाणी कमी (डीहायड्रेशन) होण्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेली असणे, संबंधित तरुण हा भूमिहीन ऊसतोड कामगाराचा मुलगा असून त्याच्या या दुर्दैवी अंताने कुटुंबातील आधारस्तंभ गेलेला असणे, राज्यभरात राबविण्यात येत असलेल्या पोलीस भरतीमध्ये तरुण-तरुणींना पहाटे मैदानामध्ये मैदानी चाचणीसाठी हजर राहावे लागणे व दुपारच्या कडक उन्हामध्ये धावण्याची चाचणी घेतली जात असणे, या दरम्यान या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे पाणी, नाश्ता, जेवण, टॉयलेट इत्यादीची सोय करण्यात न येणे, त्यामुळे अनेक उमेदवार मैदानी चाचणी दरम्यान बेशुद्ध पडणे, शरीरातील पाणी कमी होणे, हृदयविकाराची झटके येणे यासारख्या गंभीर घटना घडत असणे, मैदानी चाचणी ही सकाळच्या किंवा सायंकाळच्या सत्रामध्ये घेण्यात यावी अशी उमेदवाराकडून होत असलेली मागणी, चंद्रपूर येथे सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत १०० मीटर धावण्याच्या परीक्षेदरम्यान वापरण्यात येणाऱ्या सेन्सरबाबत अनेक उमेदवारांकडून तक्रारी प्राप्त होणे, सदर धावण्याच्या परीक्षेत वापरलेला सेन्सर तात्रिक दृष्टया बिघाड असल्याने अनेक सक्षम व सुदृढ विद्यार्थ्यांना १५ पैकी फक्त ४,६ व काही विद्यार्थ्यांना ८ असे अत्यल्प गुण मिळत असल्याची बाब निदर्शनास येणे, इतर जिल्ह्यांतील पोलीस भरतीतील उमेदवारांना १५ पैकी १२ ते १५ गुण मिळणे, मात्र चंद्रपूरमध्ये तुलनेने अत्यल्प गुण मिळत असल्याने स्थानिक उमेदवारांमध्ये नाराजी निर्माण होणे, बीडच्या पोलीस भरतीत दुर्दैवी अंत झालेल्या तरुणाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच भरती प्रक्रियेतील उमेद्वारांवर अन्याय होऊ नये यासाठी स्टार्टिंग पॉईंटवर देखिल सेन्सर लाऊन धावण्याचे अचूक मोजमाप सुनिश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."**

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

**१) बीड जिल्हा पोलीस भरती**

बीड जिल्हा पोलीस दलातील,पोलीस शिपाई संवर्गातील, रिक्त १७४ पदे भरण्याच्या अनुषंगाने भरती प्रक्रिया राबविण्याकरीता, दि.२८.१०.२०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.सदर भरतीकरीता एकूण ८१३४ उमेदवारांनी, आवेदन अर्ज दाखल केले आहेत. सदर भरती प्रक्रियेंतर्गत, शारीरिक तपासणी व मैदानी चाचणी करीता, प्रत्येक दिवशी १००० उमेदवारांना बोलविण्यात आले होते. दि.११.०२.२०२६ रोजी, १६०० मीटर धावण्याची मैदानी चाचणी वेळी, श्री. दिपक भास्कर वाव्हळे, वय २६ वर्षे, रा. मांडेखेल, ता.परळी (वै.), जि. बीड या उमेदवाराचा धाव पूर्ण झाल्यानंतर, आकस्मीत मृत्यु झाला.

२०११- H-००८१-८००-1

याबाबत, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, असे दिसून आले की, श्री. वाव्हळे यांनी दुपारी १२.५५ मिनिटांनी त्यांची १६०० मीटर धाव पूर्ण केल्यानंतर, विश्रांती घेतली. त्यानंतर ते फिनिशिंग पॉईंट शेजारील वैद्यकीय कक्षामध्ये चालत गेले. वैद्यकीय कक्षातील उपस्थित वैद्यकीय अधिका-याकडून त्यांना प्राथमिक उपचार व IV देण्यात आले. तपासणी दरम्यान, त्यांची नाडी कमी असल्याचे आढळून आल्याने, त्यांना तात्काळ रुग्णवाहिकेद्वारे, जिल्हा रुग्णालय,बीड येथे पाठविण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांनी तपासणी करुन, श्री. दिपक भास्कर वाव्हळे यांना मृत घोषीत केले. जिल्हा रुग्णालय, बीड येथे मयताचे शवविच्छेदन करण्यात आले.मयताच्या व्हिसराची सहायक संचालक, न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून तपासणी करण्यात आली असून त्यांनी अहवाल सादर केला आहे.

सदर भरतीकरीता आलेल्या उमेदवारांसाठी जेवण्याची व राहण्याची विनामुल्य सोय करण्यात आली होती. उमेदवारांना, बसण्यासाठी शामियाना टाकण्यात आला होता, पिण्याच्या पाण्याकरीता आरो फिल्टरची व शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. भरतीसाठी आलेल्या उमेदवारांकरीता, अल्प दरात नाश्त्याची सुविधा करण्यात आली होती. जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत, वैद्यकीय अधिकारी, नर्स, आवश्यक औषधांसह वैद्यकीय कक्ष स्थापन करंण्यात आला होता.पोलीस अधीक्षक, बीड यांनी त्यांच्या अहवालात, दिनांक ११.०२.२०२६ रोजी, दुपारी १२.५५ वाजता, बीड जिल्ह्याचे तापमान ३१°C इतके होते. वारा ताशी ९ किमी इतका होता असे नमूद केले आहे.

**२) चंद्रपूर जिल्हा पोलीस भरती**

चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील, पोलीस शिपाई संवर्गाची, २१५ पदे भरण्याकरीता, भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर भरतीसाठी, दि.११.०२.२०२६ ते दि.१४.०२.२०२६ या कालावधीत, शारीरिक चाचणीकरीता उपस्थित असलेल्या काही उमेदवारांनी, त्यांना १०० मीटर धावणे या चाचणीमध्ये, कमी गुण मिळाल्याबाबत आक्षेप नोंदविला. त्यानुसार, याबाबत नियुक्त केलेल्या M/s Timing Technologies India Pvt. Hyderabad, Telangana, यांच्या तांत्रिक टिमकडून, RFID प्रणालीची तपासणी केली असता, त्यामध्ये सदर चाचणीकरीता वापरात असलेल्या लॅपटॉप मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे निदर्शनास आले. M/s Timing Technologies India Pvt. Hyderabad, यांच्याकडून सदर तांत्रिक बिघाड दुरुस्त करुन, RFID प्रणाली सुव्यवस्थित असल्याची खात्री केली. त्यानंतर, दि.११.०२.२०२६ ते दि.१४.०२.२०२६ या कालावधीत, १०० मीटर धावणे या चाचणीमध्ये भाग घेतलेल्या ३१२३ उमेदवारांना, दि.२२.०२.२०२६ रोजी, फेर चाचणीकरीता बोलविण्यात आले. त्यानुसार, उपस्थित असलेल्या १८१९ उमेदवारांची पुन्हा चाचणी घेण्यात आली. सदर दुबार चाचणीकरीता, गैरहजर असलेल्या १३०४ उमेदवारांपैकी, अर्ज केलेल्या २७ उमेदवारांना दि.२४.०२.२०२६ रोजी १०० मीटर धावण्याच्या फेर चाचणीकरीता बोलविण्यात आले. त्यामुळे सदर भरतीमध्ये कोणत्याही उमेदवाराचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली.

---

२९२४

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री. अमोल जावळे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २९२४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"गोतस्करीला आळा घालण्याकरीता राज्यातील काही व्यक्ती स्वयंप्रेरणेने गोरक्षणाचे कार्य करत असणे. दि. १०.०२.२०२६ रोजी उदगीर, लातूर पोलीस स्टेशन येथे गोवंश वाहतूक करणा-या व्यक्तींवर गुन्हा दाखल झालेला असूनसुध्दा गोतस्करीकरीता वापरण्यात आलेल्या गाड्या तत्कालीन पोलीस अधिका-यामार्फत सोडण्यात आलेल्या असणे. तसेच तासगांव, सांगली पोलीस स्टेशन येथे गोतस्करीच्या गुन्हयामधील गाडी क्र. MH-१० DT -७०८५ ही न्यायालयाच्या आदेशाशिवाय सोडलेली असणे. ज्या गोरक्षकांमार्फत पोलीसांना गोतस्करीबाबत माहिती दिली जाते त्यांचा जबाब दाखल न करता इतर दुसरा डमी गोरक्षकाचा जबाब दाखल करुन गोतस्करी करणा-या गाडया सोडण्यात येत असणे. गोतस्करी करणा-या वाहनांना पकडल्यावर त्यांचा वाहन परवाना रद्द होत नसणे. त्यामुळे गोतस्करीकरीता एकच वाहन पुन्हा पुन्हा वापर करण्यात येत असणे. बाजार समितीमध्ये दाखल होणा-या अनेक गोवंशाच्या कानामध्ये टॅग नसल्याने त्यांचा वापर गोतस्कर स्वत:ला शेतकरी भासवून गोतस्करीसाठी करत असणे. पोलीसांमार्फत गोतस्करांवर तात्काळ गुन्हे दाखल होत नसल्याने गोतस्करीतील प्राण्यांना गोशाळांकडे पाठविण्यात अडचणी निर्माण होत असणे. मागील पावसाळी अधिवेशनामध्ये पुढील अधिवेशनापर्यंत गोरक्षणाचा कायदा कडक करण्याबाबत व गोतस्करांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याबाबतचे आश्वासन मा. गृहराज्यमंत्री यांनी दिले असणे. त्याबाबत आजतागायत कारवाई झालेली नसणे. तरी पोलीसांकरीता एक सर्व समावेशक SOP तयार करणे, गोतस्करांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका, उपाययोजना."

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दि. ०८.०२.२०२६ रोजी पो.स्टे. उदगीर ग्रामीण हद्दीत मादलापुर मार्गावर जनावर बाजाराजवळ पेट्रोलींग करणा-या पोलीसांना गोवंशाची वाहतूक करणारे वाहन मिळून आल्यामुळे त्यांनी वाहनातील जनावरे ही गोवंशाची अवैध तस्करी करण्याकरिता जात नसल्याची खात्री करुन जनावरांची पूर्ण कागदपत्राची पडताळणी केली. वाहनातील जनावरे त्यांच्यासोबत असणारे शेतकरी यांचीच असल्याबाबतचे दाखले, जनावरांचे मेडीकल रिपोर्ट, जनावरांच्या वाहतूकीबाबतचा अहवाल, कानातील बिल्ले व सर्व कागदपत्रांची पडताळणी/खात्री करुन त्यांना रीतसर सोडून देण्यात आले आहे.

ROTA - H/2023 - 700-3-2026 1

दि. १२.०९.२०२५ रोजी पहाटे ०३.४५ वाचे सुमारास तासगांव पोलीस ठाणेचे पोलीस पथक व गोरक्षक यांना कॉलेज कार्नर तासगाव येथे आयशर गाडी क्रमांक एम एच १० डी टी ७०८५ चे चालक व त्याचे साथीदार हे आयशर गाडी मध्ये ७ देशी, १० जर्शी व गीर जातीच्या २ अशा एकुण १९ गाईंचे दोरीने तोंड घट्ट बांधून दाटीवाटीने भरुन, त्यांना कोणत्त्याही प्रकारचे चारापाणी, प्राथमिक उपचाराची व्यवस्था न करता व ते वाहतुकीस योग्य असल्याचे प्रमाणपत्र न घेता, तसेच गायी वाहन्याचा कोणताही परवाना न घेता बेकायदेशीररित्या कत्तलखान्याकडे कत्तल करण्याचे उद्देशाने घेऊन जात असल्याचे आढळून आले. त्यापैकी एका गाईस गंभीर दुखापत करुन निरूपयोगी होण्यास कारणीभूत झाले म्हणून तासगांव पोलीस ठाणे गुरनं ४५०/२०२५ भारतीय न्याय सहिता, २०२३ चे कलम ३२५, ३(५) सह प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ३, ५, ५अ(१), ५अ(२), ५ ब(९), ६, ७, ९, ११ सह प्राण्याचे परिवहन नियम १९७८ चे कलम ४७, ४८, ४९(अ), ५०, ५४, ५६ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ११९ सह मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १२५ (ई), ११७, ८३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आयशर वाहन क्र. एम.एच १० डी टी ७०८५ हे दि. ०७.११.२०२५ रोजी बी.एन.एस. कलम १०६(३) अन्वये बंधपत्र घेवून आरोपीच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच, आरोपींविरुद्ध मा. न्यायलयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

ज्या गोरक्षकांमार्फत पोलीसांना गोतस्करीबाबत माहिती दिली जाते त्यांचा जबाब नोंदविण्यात येउन गोतस्करांवर योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाते. गोतस्करीतील प्राण्यांना गोशाळेकडे सुरळीतपणे पाठविण्यात येत असून, यामध्ये कोणतीही अडचण निर्माण झालेली नाही.

अवैधपणे गोवंश मांसाची तस्करी, वाहतूक करणा-यांवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा सन १९७६ व प्राण्यांना निदर्यतेने वागविण्यास प्रतिबंध सन १९६० बी.एन.एस.२०२३ नुसार गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येते.

गोवंश हत्या आणि तस्करी केल्याबाबत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) कायद्याअंतर्गत सन २०२५ मध्ये एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आले असून २२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**********************************

३०४५

**महाराष्ट्र विधानसभा सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**श्री. मनोज देवानंद कायंदे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३०४५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे चिखला ता.लोणारजिल्हा बुलढाणा येथे अंगणवाडीच्या मोकळ्या जागेत 3 फेब्रुवारी २०२६ रोजी अज्ञातइसमाने अनाधिकृतपणे छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा बसविण्यात येणे,तथापि सामाजिक कार्यासाठीची एकमेव जागेच्या अडचण निर्मान होतअसल्याने पोलीसप्रशासन व गावकऱ्यांमध्ये या दरम्यान बैठक घेण्यात येणे,पोलिसांकडून अज्ञातइसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणे,पोलीस प्रशासनाकडून पुतळा सुरक्षित ठिकाणी हलविणे संदर्भात कार्यवाही सुरू असणे,दरम्यान तेथील दोन गटांत हाणामारी होऊन घटनेला जातीयवादाचे स्वरूप प्राप्त होणे,घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक स्वतः उपस्थित असतानाही घडलेला दुर्दैवी प्रकार,परिस्थिती हाताबाहेर जात असताना पोलिसांनी तात्काळ जमावबंदी लागू करणे आवश्यक असतानाही त्यामध्ये जाणीवपूर्वक दिरंगाई करणे,पोलिस प्रशासनाच्या निष्काळजीपनामुळे गाव परिसराबाहेरील हजारो लोकांचा सातत्याने 3दिवस जमाव गावामध्ये जमणे अश्लील व प्रक्षोभक जातीय तेढ निर्माण होतील अशी भाषणे करणे,मध्यरात्रीच्या वेळेला रस्त्यावरील गाड्यांची तोड फोड होणे,गावातील इतर सर्व जातीधर्माच्या घरांवर दगड फेक होणे,पोलीस प्रशासनाच्या या संशयास्पद भूमिकेमुळे आणि हलगर्जीपणामुळेच वाद विकोपाला जाऊन गावात जातीय तेड निर्माण होणे,या संघर्षात प्रत्यक्ष सहभागी नसलेल्या अनेक निर्दोष व्यक्तींवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाप्रती निर्माण झालेला संताप,याप्रकरणाची SIT मार्फत उच्चस्तरीय चौकशी व सर्व संबंधित व्यक्तीसह संबंधित अधिकाऱ्यांचे CDR तपासून,दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन निरपराध व्यक्तींवरील गुन्हे तातडीने मागे घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

ग्राम चिखला काकड, ता.लोणार, जिल्हा बुलढाणा या गावी दिनांक ०३/०२/२०२६ चे १८.०० वाजे पासुन ते दिनांक ०४/०२/२००२६ चे सकाळी ०५.०० वाजे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: स्मारक ३१०२/८८४/(प्र.क १२२) २००२/२९ दिनांक ०२/०२/२००५ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे कोणतेही पालन न करता, , विहित पुर्वपरवानगी अगर ना हरकरत न घेता, ग्रामपंचायतीच्या मालकीच्या

ROTA/H-2024 — 700-3-2026 1

जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा अनधिकृतपण बसविला आहे. भविष्यात पुतळयाची विटबंना होवू नये याकरीता सुरक्षेची कोणतीही दक्षता न घेता पुतळा बसविला असल्याने, भविष्यात पुतळयाची विटंबना होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो, अशी ग्रामपंचायत अधिकारी, गट ग्रामंपचायत चिखला-खंडाळा यांनी दिनांक ०७/०२/२०२६ रोजी बिबी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. या तक्रारीस अनुसरून अप क्र ३६/२०२६ कलम ३२९ (३) भारतीय न्याय संहिता सह कलम ११ महाराष्ट्र पुतळयांच्या पवित्र भंगास प्रतिबंध अधिनियम १९९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

तद्नंतर, दिनांक २०/०२/२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाच्या ठिकाणी बांधकाम करणार आहेत, अशी माहिती संरपंच, ग्रामपंचायत चिखला यांनी दिल्याने, पोलीस तेथे गेले असता ग्राम चिखला येथे अंगणवाडी परिसरात पुतळ्या जवळ मराठा व वंजारी समाजातील स्त्री व पुरुष अशी अंदाजे २५० ते ३०० लोकांची गर्दी जमा झाली होती. त्याच ठिकाणी दोन्ही समाजाची बैठक घेण्यात आली व गावातील नागरिकांना सविस्तर माहिती देवून कोणीही कायदा हातात घेवून गैरकायद्याचे कृत्य करणार नाही असे शांतता राखण्याचे आवाहन केले होते. परंतु, अचानक महिलांमध्ये शिवीगाळ व भांडण होवून त्या भांडणात पुरुषांचा समावेश होवून वाद झाल्याने, पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी प्रसंगावधान राखून लागलीच दोन्ही गटातील लोकांना एकमेकांपासून बाजूला करुन कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही.

तद्नंतर, दिनांक २१/०२/२०२६ रोजी सदर घटनेतील महिलेचे कपडे फाटल्याबाबत व्हिडिओ सोशल मिडिया व्दारे प्रसारित झाल्याने, पुतळ्याजवळ गावातील तसेच आजूबाजूचे गावातील लोकांनी लागलीच गर्दी जमवून घोषणाबाजी केली. सदरची घटना ही अत्यंत संवेदनशील असल्याने, मौजे चिखला या संपूर्ण गावाच्या हद्दीमध्ये व परिसरात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राखण्याच्या दृष्टीने तात्काळ प्रभावाने उपविभागीय दंडाधिकारी मेहकर यांनी दिनांक २२/०२/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहीता कलम १६३ नुसार दिनांक २२/०२/२०२६ रोजीचे सांयकाळी ०७.०० वा. पासून ते दिनांक २६/०२/२०२६ रोजीचे सकाळी ११.०० वा.पावेतो ग्राम चिखला येथे जमावबंदी आदेश लागू करण्यात आला होता. सदर प्रकरणी जमावबंदी आदेश लागू करण्यास विलंब करण्यात आलेला नाही.

तसेच, दि. २१/०२/२०२६ रोजी आरोपींनी चिखला गावातील दोन इसमांच्या घरावर दगड फेकून खिडक्यांच्या काचा फोडल्या व गल्लीतील काही मोटार सायकलींची तोडफोड केली अशा तक्रारीवरून पोलीस स्टेशन बिबि येथे अप.क्र. ५२/२०२६ कलम ११८(१),७४,११५(२),१८९(२), १९१(२),१९१(३), १९०,३३३,१२५,३२४(४),३५२.३५१ (२)

H|2024 2

भारतीय न्याय संहिता सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये दिनांक २५/०२/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त गावातील रस्त्यावर गाडयाची मध्यरात्री तोड़फोड झाल्याबाबत पोलीस स्टेशन बिबी येथे तक्रार प्राप्त झालेली नाही.

विनापरवानगी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवल्यानंतर गावात शांतता राखण्याच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनाने दि.०४/०२/२०२६ व दिनांक ०७/०२/२०२६ रोजी शांतता संमितीच्या बैठक घेतल्या आहेत. तसेच, दि. १८/०२/२०२६ रोजी मा. तहसिलदार, लोणार व पोलीस यांनी गावातील नागरिकांची एकत्र शांतता बैठक घेतली आहे. दिनांक २०/०२/२०२६ रोजी घडलेल्या घटनेत पोलीसांनी तात्काळ कार्यवाही करून लोकांना शांततेचे आवाहन केले व कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही. तसेच, संपूर्ण गावाच्या हद्यीमध्ये व परिसरात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राखण्याच्या दृष्टीने उपविभागीय दंडाधिकारी, मेहकर यांनी दिनांक २२/०२/२०२६ रोजीचे सांयकाळी ०७ वाजल्यापासून दिनांक २६/०२/२०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत चिखला गावात जमावबंदी आदेश लागू केला होता.

********************************

H/2024 9

महाराष्ट्र विधानसभा

५८

सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ५४९

श्री. अशोक पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"भांडुप पश्चिम येथे मार्शल एस. आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो) या प्रकल्पामध्ये २० झोपडी धारकांना बेकायदेशीर रित्या पात्र केल्याबाबत सन २००० पूर्वीच्या खोट्या सर्वे पावत्या दाखवून भांडुप महावितरण चे कार्यकारी अभियंता श्री.संजय बोरकर तसेच इतर यांनी आधार कार्ड वरील असलेला बाहेरील पत्ता मतदार यादीत नाव नसणे तसेच शिधापत्रिकेमध्ये देखील नाव नसतानाही सन २००० पूर्वीचे वीज मीटर बसून केलेले नियमबाह्य काम २० रहिवाशांना लालसेपोटी पात्र करण्यासाठी ५१ झोपडी धारकांच्या एस.आर.ए. मध्ये ही २० खोटी प्रकरणे दाखवून अशा एकूण ७१ झोपड्या दाखवून तीन पट एफ.एस.आय. अधिकचा मिळवला असणे, शासनाची सुमारे ५० कोटीची फसवणूक अधिकाऱ्यांना हाताशी धरून या विकासकाने केलेली असणे, एम.आर.टी.पी. ऍक्ट १९६६ अंतर्गत नोटीस येऊनही या विकासकाने आदेशासं न जुमानता सदरील सदनिका वाटप केल्या या प्रकरणात विधानसभा सदस्य यांनी वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही केलेली नाही तरी या गंभीर प्रकरणात तातडीने उचित कार्यवाही करावी अशी अपेक्षा करतो पुनर्विकासाच्या वादातुन रहिवाशावर विकासकाचा हल्ला दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजी भांडुपच्या उषानगर परिसरातील बादल या इमारतीचा पुर्नविकास रखडल्याचा तक्रारीने या विकासकाने रहीवाशी रमेश मोहन यांना लोखंडी रॉडने मारहाण केली रहीवाशी गंभीर जखमी झाले तसेच इमारतीमधील रहीवासी आजही भयभीत असणे याबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मौजे भांडुप येथील न.भू.क्र.२००, २००/१ ते ४७ या खाजगी मिळकतीवर मार्शल एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना दि.२४/०९/२०२० रोजी स्विकृत करण्यात आलेली आहे. या मिळकतीच्या सर्वेक्षणानुसार त्यावर ७१ झोपड्यांचे प्रारुप परिशिष्ट-२ तत्कालीन उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, भांडूप यांनी दि.१७/०३/२०२१ रोजी प्रसिध्द केले होते. तद्नंतर प्रचलित शासन तरतूदीनुसार अंतिम परिशिष्ट-२ दि.१६/०७/२०२१ रोजी पारीत केलेले आहे. त्यापैकी २० झोपडीधारकांच्या पात्रतेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा यांनी संबंधित झोपडीधारकांची दि.०२/१२/२०२५ व दि.०६/०२/२०२६ रोजी सुनावणी आयोजित केलेली होती. त्यामध्ये सदर २० झोपडीधारकांच्या विजदेयकांची पडताळणी करुन दि.१२/०२/२०२६ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशानुसार १५ झोपडीधारकांची विजदेयके ही अर्हता दिनांक ०१.०१.२०११ नंतरची असल्याने त्यांना अपात्र करण्यात आलेले आहे.

तर ३ झोपडीधारक सशुल्क पात्र, १ झोपडीधारक विजदेयकानुसार पात्र ठरला आहे. तसेच एका झोपडीधारकास अपीलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलामध्ये पात्र केले आहे.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम ३३ (१०) उपखंड ३.१२ (C) अन्वये परिशिष्ट-२ मधील सर्व झोपडीधारकांचा योजनेमध्ये समावेश करण्यात येतो. तसेच, उपखंड ३.८ अन्वये प्रति हेक्टर ६५० इतकी झोपडयांची / सदनिकांची घनता गृहीत धरुन ४.०० इतका चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) देणेबाबत तरतूद आहे. त्याअनुषंगाने सदर योजनेतील झोपडीधारकांच्या संख्येच्या अनुषंगाने प्रति हेक्टर ६५० इतकी झोपडीधारकांची घनता प्राप्त करण्याकरीता १२ झोपडीधारकांची संख्या कमी पडत असल्याने १२ प्रकल्पग्रस्त सदनिका (PAP) सदनिका गृहीत धरुन योजनेस झोपु प्राधिकरणामार्फत परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. सबब, अतिरिक्त झोपड्या दर्शवून विकासकास अतिरिक्त चटईक्षेत्र दिल्याचे दिसून येत नाही.

झोपु प्राधिकरणामार्फत दि.२२/१२/२०२५ रोजी सदर योजनेतील एकूण ६१ सदनिकांचे ऑनलाईन लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात आलेले आहे. त्यापैकी ११ झोपडीधारक हे सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा यांच्या दि.१२/०२/२०२६ रोजीच्या आदेशान्वये अपात्र ठरले असल्याने सदर झोपडीधारकांचे सदनिका वाटप रद्द केले आहे.

आनंद नगर बादल सहकारी गृहनिर्माण संस्थेचे रहिवाशी श्री.रमेश मोहन यांना सदर संस्थेचे विकासक मे. शर्मा कन्स्ट्रक्शन कंपनी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स (श्री. विनोद शर्मा) यांनी दि.२९/०१/२०२६ रोजी मारहाण केली असून सदर विकासकाविरुध्द दि.३०/०१/२०२६ रोजी भांडूप (पश्चिम) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

************************************

**लक्षवेधी सूचना क्र. २६०७**

**श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २६०७.**

"नाशिक येथील सर्वे नं.७५९/ए/२, ७५९/ए/३ व ७५९/ए/४ यांचे एकुण क्षेत्र १६०००.०० चौ. मीटर या मिळकतीचे मालक व भागिदार यांनी नाशिक महापालिकेकडून दि. ५ नोव्हेंबर, २०१९ रोजी एम.एन.डी./बी.पी./सी.डी.७३१ अन्वये बांधकाम नकाशा मंजूर करुन घेतलेला असणे, सदर मिळकतीवर नाशिक शहरात सेंट्रल पार्क अपार्टमेंट या नावाने एकुण १० इमारतीचे बांधकाम करण्यात येणे, सदरचा गृहनिर्माण प्रकल्प हा रेरा कायद्यान्वये दि. २ जानेवारी, २०२० रोजी नोंदणीकृत असणे, सदर प्रकल्पाचा बांधकाम नकाश मंजूर करतेवेळी तो प्रधानमंत्री आवास योजना अर्बनच्या नियमानुसार नाशिक महानगरपालिकेकडून नोंदणीकृत करण्यात आलेला नसणे, प्रधानमंत्री आवास योजना अर्बन योजनेंतर्गत तयार करण्यात आलेली घरे ई.डब्ल्य.एस./एल.आय.जी. (ईकोमॉमिकल व्हिकर) ई.डब्ल्य.एस. सेक्शन व अल्प उत्पन्न गटातील नागरीकांसाठी माफक दरात घरे मिळावीत यासाठी असणे, सदर गृहनिर्माण प्रकल्पाचा बांधकाम नकाशा मंजूर करतेवेळी या इमारती प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत येत असल्याची बाब लपवून ठेवण्यात येणे, कागदपत्रांची फेरफार करण्यात येणे, गोरगरीबांना माफक दरात घरे विकण्याची परवानगी असतांना आर्थिकदृष्ट्या श्रीमंत लोकांना प्रकल्पातील घरे विकल्याची बाब निदर्शनास येणे, सदरच्या प्रकल्पामधील एफ विंग मधील प्लॉट नं.१३०१ ही मिळकत इन्होवा रबर्स प्रा.लि. कंपनीला दि. ७ मार्च, २०२२ रोजी (दस्त क्र.२७३३/२०२३) विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, संबंधित विकासकाविरुध्द गंगापूर, जि.नाशिक पोलीस स्टेशनमध्ये दि.१७ फेब्रुवारी, २०२५ रोजी फसवणूकीची तक्रार करण्यात येणे, शासनाने उक्त प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन दोषी विकासकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

नाशिक येथील सर्वे नं.७५९/ए/२, ७५९/ए/३ व ७५९/ए/४ येथील भूखंडावर सेंट्रल पार्क अपार्टमेंट या नावाने एकूण १० इमारती असून सदर इमारती या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत येत असल्याची बाब लपवून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील व्यक्तींची घरे बेकायदेशिररित्या श्रीमंत लोकांना विकली असल्याची तसेच त्यामध्ये सेंट्रल पार्क अपार्टमेंट येथील एफ विंग मधील फ्लॅट नं. १३०१ इन्होवा रबर्स प्रा.लि. या कंपनीला विकला असल्याची तक्रार गंगापूर पोलीस स्टेशन, ता.नाशिक, जि.नाशिक येथे दि.१७.०२.२०२५ रोजी प्राप्त झाली होती. तथापि, विचाराधीन भूखंड अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने दि.१८.०२.२०२५ रोजी सदर तक्रार अर्ज अंबड पोलीस ठाणे, नाशिक शहर यांच्याकडे पुढील चौकशीसाठी पाठविण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी अंबड पोलीस स्टेशनमार्फत पुढील चौकशी करण्यात येत आहे.

(ROTA) H/1465-1 (700-3-26)

नाशिक येथील सर्वे नं.७५९/ए/२, ७५९/ए/३ व ७५९/ए/४ येथील भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ १६००० चौ.मी. इतके आहे. सदर भूखंडावर प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत बांधकामास मंजूरी देण्यात आलेली नाही. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेची राज्यात दि.०९.१२.२०१५ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. तथापि, विचाराधीन भूखंडावरील मूळ बांधकामास नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी दि.२४.११.२००३ रोजी बांधकाम परवानगी दिली होती. त्यामुळे सदर बांधकाम परवानगी अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी) अत्यल्प उत्पन्न गटाची (EWS) घरे बांधण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी तत्कालीन विकास नियंत्रण नियमावली-१९९३ नुसार सदर भूखंडावर ३६४६९.४७ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळास दि.२४.११.२००३ रोजी प्रथम परवानगी दिली होती. तद्नंतर सुधारीत परवानगी दि.०५.११.२०१९ व ३१.०३.२०२२ रोजी दिली आहे. सदर प्रकल्पांतर्गत १० इमारती असून एकूण ६७२ सदनिका आहेत. सदर प्रकल्पास पूर्णत्वाचा दाखला (भोगवटा प्रमाणपत्र) दि.२८.१०.२०२५ रोजी देण्यात आला आहे.

**************

H/1465

**लक्षवेधी सूचना क्र. ११२६**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**" श्री. सुनिल प्रभू, श्री. शंकर जगताप, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती ज्योती गायकवाड, श्री. अतुल भातखळकर, श्री. अमीन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. साजिद पठाण, श्री. मोहन मते, श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११२६ पुढीलप्रमाणे आहे" :-**

"अल्पसंख्याक व औकाफ विभागाचे कार्यभार पाहणारे राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री, अजित पवार यांचे दिनांक २८ जानेवारी,२०२६ रोजी अपघाती निधन झाले असणे, दिनांक २८ ते ३० जानेवारी, २०२६ या शासकीय दुखवटा कालावधीत अल्पसंख्याक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिल्याचा गैरप्रकार दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी उघडकीस येणे, यापुर्वी माहे आक्टोंबर,२०२५ मध्ये तत्कालीन अल्पसंख्याक मंत्री यांनी सदरहू शाळांचा दर्जा देण्याच्या प्रस्तावांना स्थगिती देण्यात येऊन, सर्व प्रस्ताव प्रत्यक्ष शाळांची पाहणी करुनच द्यावेत असे आदेश देण्यात येणे, त्यांनतर अल्पसंख्यांक विभागाचा कार्यभार तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी स्वता:कडे घेणे, परंतु दुर्देवाने त्यांच्या निधनानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अर्थपूर्ण व्यवहार करुन, आरटीई कायदा, टीईटी सक्ती, देणग्यांची मुभा, पदोन्नती प्रक्रियेत सवलत, प्रवेशाचे स्वनिर्मित नियम आदी अधिकार संस्थाना लाभ मिळवून देण्यासाठी सदरहू ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या प्रस्तावांना बेकायदा मंजूरी दिल्याचा प्रकार घडणे, सदरहू प्रकरणी मा. मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांनी स्थगिती देऊन चौकशीचे आदेश देण्यात येणे, परंतु अद्याप यावर चौकशी होऊन सबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाकडून कोणतीच कारवाई न होणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..........................................................................................................................................

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार, मा.उपमुख्यमंत्री (अल्पसंख्याक विकास विभाग) यांचे निवेदन**

राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री यांचे दिनांक २८.०१.२०२६ रोजी निधन झाल्याने सामान्य प्रशासन विभागाने दि. २८.०१.२०२६ रोजी दि. २८.०१.२०२६ ते दि. ३०.०१.२०२६ पर्यंत शासकीय दुखवटा जाहीर केला होता. यानुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले.

१. ज्या सर्व इमारतींवर राष्ट्रीय ध्वज नियमीतपणे फडकवला जातो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर ठेवण्यात यावा, याची खात्री करावी.
२. या कालावधीत कोणतेही अधिकृत मनोरंजन कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत.
३. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित आशाताई अनंतराव पवार यांच्या दु:खद निधनामुळे बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांना सुटी जाहीर केली आहे.

दिनांक २८ ते ३० जानेवारी, २०२६ या शासकीय दुखवटा काळात तत्कालीन उपसचिव तथा सक्षम प्राधिकारी यांनी एकूण १६ शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र निर्गमीत केले आहेत. तसेच सदर १६ अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्थांअंतर्गत एकूण ३६ शाळा व महाविद्यालये आहेत.

अल्पसंख्यांक विकास विभागाचे तत्कालिन मा. मंत्री महोदय यांनी त्यांच्या दि.१२ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दि.०१ ऑगस्ट, २०२५ पासून अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्यात आलेल्या शैक्षणिक

संस्थांमध्ये क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे किंवा कसे, विद्यार्थ्यांना क्रिडा साहित्य, क्रिडांगणे/उपलब्ध आहेत किंवा कसे, तसेच अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांनी क्रिडा स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल प्राप्त करून घ्यावा व सदर अहवाल मा. मंत्री , क्रिडा व युवक कल्याण या कार्यालयास सादर करावा. तसेच पुढील आदेशापर्यंत सदर शैक्षणिक संस्थाच्या अल्पसंख्यांक दर्जा मान्यतेस स्थगिती देण्यात यावी.

तसेच यापुढील कालावधीत अर्जदार शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्यापूर्वी क्रिडाविषयक मुद्यांबाबत संबंधीत शैक्षणिक संस्थांनी पूर्तता केल्याचा अहवाल अल्पसंख्यांक विकास विभागाने मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांना सादर केल्यानंतरच व त्याबाबतची क्रीडा मंत्रालयाची खात्री झाल्यानंतरच सदर अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी, असे निदेश देण्यात आले होते. तथापि तदनंतर,तत्कालीन मा. मंत्री महोदय यांच्या मान्यतेनेच दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी, तत्कालीन उपसचिव, कार्यासन-५ यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि.२७.०५.२०१३ मधील मुद्या क्र. १० (i) अन्वये अल्पसंख्याक संस्थेच्या शाळांना शालेय शिक्षण विभागाच्या राईट ऑफ चिल्डेन टू फ्री ऍन्ड कम्पलसरी एज्युकेशन ऍक्ट, २००९ च्या कलम (१) मधील तरतुदीनुसार कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक शाळांना पहिली तसेच पूर्व प्राथमिक वर्गाच्या प्रवेशासाठी २५ टक्के वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक नाही. तथापि, कायम विनाअनुदानीत अल्पसंख्याक शाळांनी आपल्या इच्छेनुसार अल्पसंख्याक वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत, असे नमूद आहे. तसेच अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि.२७.०५.२०१३ मधील मुद्या क्र.१० (iv) (ब) नुसार अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागांवर त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना तसेच उर्वरित ५० % जागांवर बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. तसेच ५०% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरताना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग इ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

क) विनाअनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१% प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. तसेच उर्वरित जागांवर बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. तसेच उर्वरित जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या स्वेच्छेने समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती विमुक्त जाती विशेष प्रवर्ग इ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देता येईल, अशी तरतूद आहे.

अल्पसंख्याक विकास विभाग, शासन परिपत्रक दि.०४.०५.२००९ अन्वये भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५ च्या खंड (५) अन्वये असे विहित करण्यात आले आहे की, अनुच्छेदामधील किंवा अनुच्छेद १९ चा खंड (१), उपखंड (छ) यामधील कोणत्याही गोष्टीमुळे, नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या किंवा अनुसूचित जाती व अनुसुचित जनजाती यांच्या उन्नतीकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. मात्र, अशी तरतूद अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांखेरीज अन्य खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये मग त्या राज्यांकडून अनुदान प्राप्त

होणाऱ्या असोत अगर नसोत प्रवेश देण्याशी संबंधित असावयास हवी. सदर खंडाव्दारे विहित केलेली तरतूद विचारात घेता असे स्पष्ट होते की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था या भारतीय संविधानाच्या कलम १५ मधील खंड (५) च्या कक्षेमधून वगळण्यात आल्या आहेत. दि बॉम्बे इन्स्टिट्युशन फॉर डेफ अॅड म्युटस आणि इतर विरुध्द समाजकल्याण विभाग व इतर, रिट याचिका क्र.४८९/१९९५ या न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.२४.०९.२००१ रोजी असा न्याय निर्णय दिला आहे की, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना संस्थेमधील कर्मचारी भरतीमध्ये आरक्षण ठेवण्याचे निर्देश देणे म्हणजे भारतीय घटनेच्या अनुच्छेद ३० (१) अंतर्गत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना असलेल्या अधिकारांवर गंभीर अतिक्रमण केल्यासारखे आहे. सबब असे निर्देश ग्राह्य धरता येणार नाहीत. याच न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी असेही निरिक्षण नोंदविले आहे की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३० (१) अंतर्गत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असलेले अधिकार, या संस्थांना शासनाकडून जरी संपूर्ण सहाय्य व आर्थिक मदत मिळत असली तरी अबाधित राहतील. मा. उच्च न्यायालयाने अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या अधिकारांबाबत वेळोवेळी दिलेले न्यायनिर्णय विचारात घेऊन शासन राज्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्या भरतीमध्ये कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागू करता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे.

यानुसार शासन निर्णय दि.२७.०५.२०१३ नुसार संस्था प्रचलनाच्या अधिकाराबाबत असे नमूद केले आहे की, संबंधी धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा मान्यता प्राप्त अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस त्यांच्या व्यवस्थापनावर शिक्षण व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करण्याचा अधिकार असेल. तथापि संबंधित शिक्षक व कर्मचारी यांनी शासनाच्या संबंधित विभाग अथवा प्राधिकरण यांनी ठरविलेले शैक्षणिक पात्रता, अनुभव व पात्रता चाचणी (NET, SET, व TET) इत्यादी तरतूदी यांची पूर्तता केली पाहिजे.

सदर प्रकरणी विविध प्रसिध्दी माध्यमे व समाज माध्यमे यामध्ये प्रसारीत बातम्यांची त्वरीत दखल घेत प्राथमिक कार्यवाहीचा भाग म्हणून तातडीने सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७.०२.२०२६ च्या आदेशानुसार, श्री मिलींद शेणॉय, उपसचिव / सक्षम प्राधिकारी यांची अल्पसंख्याक विकास विभागाच्या बाहेर बदली करण्यात आली असून त्यांना दुसरा कोणताही विभाग दिलेला नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२०.०४.२०२६ च्या आदेशानुसार अल्पसंख्याक विकास विभागाच्या बाहेर बदली करण्यात आली. तसेच सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. सदर चौकशी नि:पक्षपातीपणे होण्यासाठी संबधीत कार्यासनातील अन्य कर्मचारी यांची विभागात अन्य विभागांमध्ये बदली करण्यात आलेली आहे.

मा. मुख्य सचिवांच्या दि. १७.०२.२०२६ रोजीच्या टिपणीन्वये विभागास प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने सदर टिपणीसोबत जोडलेल्या यादीतील नमूद सर्व २० शैक्षणिक संस्थांना प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रांना सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांच्या दि २४.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आलेली आहे. अल्पसंख्याक विकास विभागाच्या दि १८.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र प्रक्रीयेस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे.

************************************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. धर्मरावबाबा आत्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९५५ पुढीलप्रमाणे आहे:-

"चंद्रपूर जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश फुंड यांनी गेल्या साडेतीन वर्षात निविदा प्रक्रिया व कामातील अंदाजपत्रकात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करणे, चंद्रपूर जिल्हा स्टेडीयम व जिल्ह्यातील तालुका संकुलनातील केलेल्या व करण्यात येत असलेल्या विकास कामात नियमबाह्य कामे करुन लाखो रुपयांचा गैरप्रकार करणे, स्वमर्जितील आर्किटेक सुधीर श्रीवास्तव यांच्याकडूनच सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करुन घेणे व हे अंदाजपत्रक तयार करतांना अनावश्यक कामे समाविष्ट करुन शासनाकडून करोडो रुपयाचा निधी उकळणे, स्वमाजितील कंत्राटदार एम.आर.ढोबळे आणि त्याच्या कंपनीस जास्तीत जास्त काम मिळण्यासाठी निविदा प्रक्रियेत घोटाळा करणे, क्रीडा अधिकाऱ्याने चंद्रपूर जिल्ह्यातील काही तालुक्यात जागा उपलब्ध नसताना सध्या याच आर्किटेकच्या मार्फतीने अंदाजपत्रक तयार करणे व या कामाचे निविदा प्रक्रिया राबून ढोबळे या कंत्राटदारासोबत अग्रीमेंट करणे, करोडो रुपयांची अनावश्यक कामे करुन याच कंत्राटदाराच्या नावे करोडो रुपयांचा देयके मंजूर करणे, जिल्हा क्रीडा अधिकारी पुंड, आर्किटेक श्रीवास्तव व ढोबळे या त्रिकुटानीं मिळून क्रीडा संकुलनातील कामात गैरप्रकार करुन शासनाची फसवणूक करुन करोडो रुपयांचा घोटाळा केले असताना सुद्धा याबाबत कोणतीही चौकशी होत नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष त्यामुळे या प्रकरणी फुंड यास निलंबित करुन या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यामार्फतीने चौकशी करुन संबंधित आर्किटेक व कंत्राटदारावर कार्यवाही होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

---

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री क्रीडा व युवक कल्याण

महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा धोरणांतर्गत प्रत्येक विभागीय, जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुले उभारण्याची येत असुन शासन निर्णय दि.२३.०३.२०२२ नुसार नविन जिल्हा क्रीडा संकुलासाठी रु.२५००.०० लक्ष व जे पुर्ण/प्रगतीपथावर/अपुर्ण अवस्थेत त्यासाठी रु.१५००.०० लक्ष इतकी अनुदान मर्यादा आहे. जिल्हा क्रीडा संकुल समितीमध्ये पालकमंत्री जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष, संबंधित जिल्हाधिकारी हे उपाध्यक्ष, संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी हे सचिव असतात. सदर समितीच्या मान्यतेने जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामाच्या निविदा प्रसिध्द करण्यात येतात.

जिल्हा क्रीडा संकुलात जलतरण तलाव अद्यावतीकरण करणे, बॅडमिंटन हॉलचे अद्यावतीकरण करणे इ. कामे जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या वतीने करण्यात येत आहेत. संकुलातील जलतरण तलाव अद्यावतीकरण करणे, बॅडमिंटन हॉलचे अद्यावतीकरण करणे या कामाचे आराखडे व अंदाजपत्रक समितीचे वास्तुशास्त्रज्ञ मे. श्रीवास्तव ॲन्ड असो. नागपुर यांचे कडुन तयार करण्यात आले असून त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची रितसर तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर खुली ई- निविदा प्रक्रीया राबवुन कंत्राटदाराची निवड करण्यात आली होती. त्यास जिल्हाधिकारी तथा समितीचे उपाध्यक्ष यांची मान्यता घेऊन कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदर कामे पुर्ण झालेले असून येथे मोठ्या प्रमाणात खेळाडू सराव करीत आहेत.

जिल्हा क्रीडा संकुलातील क्रीडा सुविधांचे काम संकुल समितीचे वतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून करण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रशासकीय इमारत, आवार भिंत,

मल्टीपर्पज हॉल, मुलामुलीचे वसतीगृह इ. कामाचा समावेश आहे. सदर कामाची ई-निविदा कार्यकारी अभियंत्ता सार्वजनिक बाधकाम विभाग क्र. २ चंद्रपूर यांनी राबवुन कार्यारंभ आदेश त्यांचेस्तरावर देण्यात आलेले आहेत. प्रथम टप्यातील बांधकामामध्ये प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मल्टीलेव्हल हॉलचे फाऊंडेशनची कामे प्रगतीपथावर आहे. सदर कामाचे मुल्य रु. ५७ कोटी इतके असून सद्यस्थितीत शासनाने रु.३ कोटी निधी वितरित केला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण १५ तालुका क्रीडा संकुले असून बल्लारपूर येथील क्रीडा संकुल पूर्ण झालेले आहे. तसेच चिमुर, नागभिड, सिंदेवाही, ब्रम्हपुरी, वरोरा, कोरपना, राजुरा, मुल, पोंभुर्णा, इ. तालुका क्रीडा संकुलांना प्राप्त निधीतून विकास कामे तालुका क्रीडा संकुल समित्तीचे वतीने करण्यात येत आहेत. तर भद्रावती, गोंडपिंपरी तालुका क्रीडा संकुलांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या असून निधी अभावी अद्याप कामास सुरूवात केलेली नाही.

सावली तालुक्यातील क्रीडा संकुलासाठी मौजा चकपिरंजी येथे १६ एकर जागेवर समितीच्या वतीने ई-निविदा प्रक्रीया राबवून कंत्राटदार निश्चीत करण्यात आलेला होता. तथापि, स्थानिक गावकरी व खेळाडूंचा त्याठिकाणी क्रीडा सुविधा निर्माण करण्यास विरोध असल्याने समिती अध्यक्ष यांचे वतीने काम थांबविण्यात आले होते. सावली तालुका मुख्यालयी सुयोग्य जागा मागणीची प्रक्रीया करण्यात आलेली असून वनविभागाची जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील तालुका क्रीडा संकूल येथील बांधकामे संबंधित तालुका क्रीडा समितीद्वारे वास्तुविशारद नियुक्त करुन त्यांच्या मार्फत अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेवून ई-निविदा प्रक्रीया करुन कामे केलेली आहेत. तसेच सदर कामाची देयके संबंधित तालुका क्रीडा संकुल समितीद्वारे अदा करण्यात आलेली आहेत.

-------------------

लक्षवेधी सूचना क्र.१९६५

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन**

श्री. संतोष बांगर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९६५ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र राज्यातील हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील मौजे, फुटाना येथील आंतरराष्ट्रीय अंध महिला क्रिकेटपटू कुमारी गंगा कदम ही मागील सात वर्षांपासून राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी करत असणे, मागील चार वर्षापासून महाराष्ट्र अंध महिला क्रिकेट संघाची उप कर्णधार म्हणून जबाबदारी सांभाळत असणे, गेल्या दोन वर्षात भारतीय अंध महिला संघात निवड होऊन भारताचे प्रतिनिधित्व करत आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये सहभाग नोंदविणे, अलीकडेच पार पडलेल्या पहिल्या अंध महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने विजेतेपद पटकावताना तिचे मोलाचे योगदान राहिलेले असणे, तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्याचे मुख्यमंत्री तसेच विविध मान्यवरांकडून सन्मान करण्यात आलेला असणे, महाराष्ट्र राज्याच्या विद्यमान क्रीडा धोरणानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकरी व आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद असणे, सदर खेळाडूंना नोकरी देण्याबाबत शासनाकडे क्रीडा विभागामार्फत प्रस्ताव पाठवण्यात येणे, तरीही सदर खेळाडूस अद्याप पर्यंत त्याबाबत निर्णय न होणे त्यामुळे सदर खेळाडूस शासकीय मान-सन्मान, आर्थिक पुरस्कार व थेट शासकीय नोकरी देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. उपमुख्यमंत्री तथ मंत्री, क्रीडा व युवक कल्याण**

वर्ल्ड ब्लाइंड क्रिकेट लिमिटेड (WBC) आणि क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडिया (CABI) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला प्रथम टी-२० अंध महिला क्रिकेट विश्वचषक, २०२५ भारत आणि श्रीलंका या दोन देशांमध्ये यशस्वीरित्या पार पडला. या ऐतिहासिक स्पर्धेत भारतीय महिला संघाने अपराजित राहून विजेतेपद पटकावले आणि जागतिक स्तरावर तिरंगा फडकवला. भारतीय संघाने या स्पर्धेत एकही सामना न गमावता अजिंक्यपद मिळवले. संघाची कर्णधार श्रीमती दीपिका टी.सी. आणि उपकर्णधार श्रीमती गंगा कदम यांच्या नेतृत्वाखाली संघाने प्रत्येक सामन्यात वर्चस्व गाजवले. या देदीप्यमान यशामुळे जागतिक स्तरावर भारताचा व पर्यायाने महाराष्ट्र राज्याचा गौरव झालेला आहे.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ अंतर्गत आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तसेच राज्याचे नाव उज्वल करणा-या पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याची योजना कार्यन्वित आहे. त्यानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध

H-0073 450 Rota

क्रीडा स्पर्धा तसेच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना राज्य शासनाकडून रोख पारितोषिक देऊन गैरविण्यात येते.

भारतीय अंध महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार श्रीमती गंगा संभाजी कदम या महाराष्ट्रातील हिंगोली येथील निवासी आहेत. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते भारतीय संघाच्या या अत्युकृष्ट कामगिरीचा गौरव दि. १९ डिसेंबर, २०२५ रोजी वर्षा निवासस्थानी करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या वेळी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्रीमती गंगा कदम यांना रु.५०.०० लक्ष (अक्षरी रु. पन्नास लक्ष) इतकी रोख पारितोषिक देण्याची घोषणा केली होती. त्यानुषंगाने दि.१० मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्रीमती गंगा कदम यांना रोख पारितोषिकाची रक्कम रु.५०.०० लक्ष मंजूर करण्यात आली आहे. तसेच, रोख पारितोषिकाची रक्कम शासनस्तरावरून आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आली आहे.

राज्याचे नाव उज्वल करणाऱ्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती शासन निर्णय दि.०९.०७.२०२४ मधील निकषांनुसार पात्रता तपासून देण्यात येते. श्रीमती गंगा कदम यांना थेट नियुक्ती देण्यासाठीचा अहवाल दि. १६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. याबाबत दि.०९.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित समितीपुढे ठेऊन समितीच्या शिफ़ारशीसह अंतिम निर्णय होताच नियुक्तीबाबत विहित प्रक्रियेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

---------------

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. मनोज घोरपडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४९४ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्राच्या मातीतील शान असलेली 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेचा जो पोरखेळ झाल्यामुळे महाराष्ट्रातल्या हजारो मल्लांचे भविष्य अंधारात सापडले असणे, ग्रामीण भागातील मल्लांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, कुस्ती या रांगड्या आणि पारंपरिक खेळाचे संवर्धन व्हावे आणि पैलवानांच्या कष्टाला नोकरी व सन्मानाचे फळ मिळावे, या उदात्त हेतूने कुस्तीमहर्षी स्व.मामासाहेब मोहोळ यांनी १९५३ साली 'महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेची स्थापना केलेली असणे, ज्या स्पर्धेने राज्याला एकापेक्षा एक दिग्गज मल्ल आणि देशाच्या कुस्तीत महाराष्ट्राचा दबदबा निर्माण केला असणे, सद्यःस्थितीत राज्यात तब्बल ४ वेगवेगळ्या 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धा घेण्याची चढाओढ लागली असल्याचे निदर्शनास येणे, त्यातील १.महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचा एक गट, २.राज्यकुस्तीगीर परिषदेचा दुसरा गट ३. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ हा देखील गेली काही वर्षे स्पर्धा घेत असून आता ४.आजवर केवळ 'हिंदकेसरी' स्पर्धा घेणारी मातीतली संघटनादेखील यावर्षी 'महाराष्ट्र केसरी' घेणार म्हणून मैदानात उतरलेली असणे, या ४ पैकी नेमकी कोणती 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धा खऱ्या अर्थाने अधिकृत आणि शासकीय मान्यताप्राप्त आहे हे शासनाने तातडीने जाहीर करावे आणि हा संभ्रम कायमचा दूर करण्याची नितांत आवश्यकता तसेच, २०२१ पासून ज्या खेळाडूंवर अन्याय व त्यांचे रखडलेले मानधन आणि शासकीय नोकरीतील क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी त्वरित पूर्ववत करण्यासाठी शासनाने तातडीने दखल घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री, क्रीडा व युवक कल्याण

महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा संस्कृतीमध्ये कुस्ती या पारंपरिक आणि रांगड्या खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण भागातील हजारो तरुण मल्लांसाठी कुस्ती हा केवळ खेळ नसून तो त्यांच्या उपजीविकेचा, सामाजिक प्रतिष्ठेचा आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे.

कुस्तीमहर्षी स्व. मामासाहेब मोहोळ यांनी कुस्ती या खेळाचे संवर्धन व संघटनात्मक बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने १९५३ साली महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेची स्थापना केली. या परिषदेच्या माध्यमातून १९६१ पासून आधुनिक स्वरुपातील "महाराष्ट्र केसरी" स्पर्धेची परंपरा सुरु झाली. या स्पर्धेत माती आणि गादी (मॅट) अशा दोन विभागांमध्ये कुस्ती खेळली जाते आणि दोन्ही विभागांतील विजेत्यांमध्ये अंतिम लढत घेऊन विजेत्याला "महाराष्ट्र केसरी" हा मानाचा किताब तसेच मानाची चांदीची गदा प्रदान करण्यात येते. या स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्राला अनेक नामवंत मल्ल मिळाले असून त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्याचा गौरव वाढविला आहे.

H-0040 460 20ta

दरवर्षी महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन अधिकृत एकविध कुस्ती खेळ संघटनेद्वारे आयोजित करण्यात येते. सद्यस्थितीत राज्यात कुस्ती या खेळाच्या १) महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद, २) महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद, ३) महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ, ४) भारतीय शैली कुस्ती संघटना (माती) या चार संघटनांकडून "महाराष्ट्र केसरी" स्पर्धा आयोजित करण्याचा दावा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

सन १९६१ साली स्थापन झालेली महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद ही संघटना २०२२ पर्यंत अधिकृत मानली जात होती व त्यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारी महाराष्ट्र केसरी स्पर्धा हीच अधिकृत मानली जात होती. तथापि, सन २०२२ मध्ये भारतीय कुस्ती महासंघाने काही प्रशासकीय कारणास्तव या परिषदेची मान्यता रद्द केली, ज्यामुळे या संघटनेच्या अधिकारांवर कायदेशीर मर्यादा आल्या. त्यानंतर महाराष्ट्र कुस्तीगीर संघास भारतीय कुस्ती महासंघाने मान्यता दिली आहे.

शासन निर्णय दि.२८ मे २०२५ नुसार राज्य अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा ही भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न राष्ट्रीय फेडरेशनशी संलग्न असलेली व महाराष्ट्र ऑलिम्पिक समितीशी (MOA) संलग्न राज्यातील एकविध खेळ राज्य संघटनेद्वारे आयोजित केलेली असणे आवश्यक आहे. जर राज्य संघटनेस MOA ची मान्यता नसेल, तर ती IOC/OCA शी संलग्न आंतरराष्ट्रीय फेडरेशनने मान्यता दिलेल्या राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असणे आवश्यक आहे. तसेच राज्य संघटनेवर वाद असल्यास आंतरराष्ट्रीय फेडरेशनने मान्यता दिलेल्या राष्ट्रीय संघटनेने अधिकृत केलेली कार्यकारिणी अथवा तदर्थ समिती (Ad-hoc Committee) स्पर्धा घेण्यास अधिकृत ठरतात. त्यानुसार महाराष्ट्र कुस्तीगीर संघास भारतीय कुस्ती महासंघाची संलग्नता/मान्यता आहे आणि भारतीय कुस्ती महासंघास आंतराष्ट्रीय कुस्ती महासंघाची मान्यता दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ या संघटनेमार्फत आयोजित केलेल्या स्पर्धामध्ये सहभागी खेळाडू शासनाच्या योजनांचे लाभ मिळण्यास पात्र ठरतात.

कुस्ती या खेळाच्या अधिकृत संघटनेमार्फत आयोजित केलेल्या स्पर्धामधील हिंद केसरी, रुस्तुम-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी आणि महाराष्ट्र केसरी या किताब विजेत्या कुस्तीगीरांना दिनांक ६ मार्च २०१० व सुधारीत दि.४ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वयोवृद्ध खेळाडू मानधन योजनेअंतर्गत प्रति महिना रुपये १५,००० मानधन देण्यात येते. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात खेळाडू मानधनाकरीत एकूण रु.१,५९,५८,०००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच, अधिकृत स्पर्धेतील पात्र खेळाडूंची क्रीडा प्रमाणपत्र आरक्षणासाठी ग्राह्य धरण्यात येतात व त्यांची पडताळणी केली जाते. कुस्ती या परंपरागत खेळाच्या संवर्धनासाठी तसेच राज्यातील मल्लांच्या हितसंरक्षणासाठी शासन सकारात्मक व आवश्यक ती कार्यवाही करण्यास कटिबद्ध आहे.

--------

लक्षवेधी सूचना क्र.१६०२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री. निलेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१६०२ पुढीलप्रमाणे आहे :-

"सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण, देवगड, वेंगुर्ला च्या समुद्रकिनारी मच्छीमारांनी मासे सुकवणे, खारवणे, आणि विक्रीसाठी उभारलेल्या झोपड्या काढून टाकण्याबाबत महसूल प्रशासनाकडून नोटीसा बजावण्यात आल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये उघडकीस येणे, यापुर्वीही अनेकदा नोटीसा महसूल प्रशासनाकडून बजावण्यात आलेल्या असणे, झोपड्या काढून टाकण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून व्यवसाय करणा-या स्थानिक मच्छीमारांच्या कुटुंबावर ओढावलेली उपासमारीची वेळ, सदरहू समुद्रकिनारी असलेली जागा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या मालकीची असल्याने सदर जागा भाडेतत्वावर दिल्यास शासनाने ठरवलेल्या दरानुसार व्यावसायिक मच्छीमार भरण्यास तयार असणे, मच्छीमारांनी आपला व्यवसाय आणि उदरनिर्वाह सुरक्षित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व शासनाकडे केलेली असणे, सातत्याने नोटीसा बजावण्यात येत असल्यामुळे मच्छीमारांमध्ये प्रचंड असंतोषाचे व संतापाचे वातावरण असणे, याबाबत तात्काळ तोडगा काढण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने योग्य निर्णय घेऊन शासन स्तरावर कार्यवाही करुन मच्छीमार बांधवाना दिलासा देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी (MCZMA) व डिस्ट्रिक्ट कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी (DCZMC) समितीच्या आढावा बैठकीमध्ये CRZ क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम केलेबाबतच्या प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवळी आढावा घेणेत येतो. त्यानुषंगाने, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी यांच्याकडे CRZ क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम केलेबाबत प्राप्त झालेले तक्रार अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग यांचेकडून उपविभागीय अधिकारी कार्यालय, कुडाळ यांचेकडे चौकशीसाठी पाठविण्यात आलेले होते. त्यानुसार तहसिलदार, मालवण यांनी ४७, मुख्याधिकारी, नगर परिषद, मालवण यांनी ६०, गट विकास अधिकरी, पंचायत समिती, मालवण यांनी १३१ अशी सीआरझेड क्षेत्रात अनधिकृत बांधकाम झाले असल्याचे नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या स्थळपाहणी अहवालामध्ये CRZ क्षेत्रामधील एकूण २३८ प्रकरणामध्ये समुद्र किनारी पक्के व कच्चे बांधकाम (पत्रा शेड / झोपडी / बाथरुम / सिमेंट चौथरा / कच्ची झोपडी / शौचालय / चिरेबंदी सिमेंट पत्रा शेड / चिरेबंदी गडगा / मेडीवर ग्रीन नेट व कोबा / बांबुची तात्पुरती शेड / RCC सिमेंट शेड, निवास पर्यटन, मत्स्य विभाग इत्यादी) आढळून आलेली आहेत. सदरची बांधकामे ही CRZ क्षेत्रात केलेली असून समुद्र किनारी आहेत.

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी (MCZMA), पर्यावरण व हवामान बदल विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दि. २६ फेब्रुवारी, २०२४ चे पत्रान्वये CRZ क्षेत्रातील अतिक्रमणाबाबत करावयाच्या कार्यवाहीची SOP देणेत आलेली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांचे कार्यालयाकडील दि. ०२.०२.२०२६ व दि. १०.०२.२०२६ अन्वये अतिक्रमण धारकांना नोटीसा काढणेत आलेल्या आहेत. त्यानुषंगाने सुध्दा CRZ क्षेत्रातील अतिक्रमणाबाबत स्थळपाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत तहसीलदार, मालवण तसेच मुख्याधिकारी, नगरपरिषद, मालवण यांना कळविण्यांत आलेले होते. उक्त SOP मधील सुचनेनुसार

CRZ क्षेत्रात अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण केलेबाबत नोटीस देऊन १५ दिवसात त्यांचा खुलासा घेणे आवश्यक होते. CRZ क्षेत्रात अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण केलेल्या एकूण २३८ अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण धारकांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे मांडणेसाठी दि. १६.०२.२०२६ व दि. २५.०२.२०२६ रोजी समक्ष सुनावणी घेणेत आलेली होती / आयोजित करणेत आलेली होती. उक्त सुनावणीस ३९ अतिक्रमणधारक उपस्थित राहिलेले होते. उपस्थित काही अतिक्रमणधारकांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. परंतु, त्यांनी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅचोरीटी मुंबई यांचेकडील नाहरकत दाखले सादर केलेले नाहीत.

श्री. आनंद हुले यांनी CRZ क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणावर कार्यवाही होत नसल्याने मा. राष्ट्रीय हरीत, न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे दावा क्रमांक ८२/२०२५ दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये मालवण, चिवला आणि दांडी बीच लगत असलेल्या CRZ मधील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. सदर दाव्यात मा. राष्ट्रीय हरित लवाद प्राधिकरण, पुणे यांनी दि. २४.०७.२०२५, दि.१८.०८.२०२५, दि.१०.०९.२०२५, दि.१०.११.२०२५ रोजी सुनावणीमध्ये श्री. आनंद हुले यांनी दिलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने CRZ क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणेबाबत व प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबत मा. राष्ट्रीय हरित लवाद प्राधिकरण यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे मालवण नगर परिषद हद्दीतील किनारपट्टीवरील तसेच देवबाग, तारकर्ली, वायरी, दांडी, चिवला बीच या गांवामधील CRZ क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणावर कार्यवाही करणेकामी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग कार्यालयाकडून फेर स्थळपाहणी करणेस कळविण्यात आलेले आहे. सदरचे सर्वेक्षण हे व्यापक स्वरूपांचे असून तहसीलदार, मालवण यांनी शासकीय जमिनीवरील CRZ क्षेत्रात अनधिकृत ४७ बांधकाम, मुख्याधिकारी, नगरपरिषद, मालवण यांनी चिवला बीच क्षेत्रात अनधिकृत ६० बांधकाम व गट विकास अधिकारी, पंचायत समिति, मालवण यांनी देवबाग, वायरी, तारकर्ली इ. क्षेत्रात १३१ बांधकामे झाले असल्याचे नमूद केलेले आहे. सद्यस्थितीत सर्वेक्षणाचे काम पुर्ण झालेले नसून सुरू आहे. मा. राष्ट्रीय हरीत, न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे दाखल दावा क्रमांक ८२/२०२५ मध्ये सुनावणीची पुढील तारीख दिनांक ११/०६/२०२६ रोजी आहे.

महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी (MCZMA), पर्यावरण व हवामान बदल विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दि. २६ फेब्रुवारी, २०२४ चे पत्रान्वये CRZ क्षेत्रातील अतिक्रमणाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत निर्गमित करण्यात आलेल्या SOP अनुषंगाने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते. तसेच, मालवण स.नं. ७२४, क्षेत्र १.३६.२० हे. आर ही मिळकत सॉल्ट डिपार्टमेंटची (केंद्र शासन) यांची असून मत्स्य विभागाकडून सदरहू मिळकतीवर मच्छिमारांना मासे सुकविण्यासाठी चौथेरे बांधून देण्यात आलेले आहेत.

*****

लक्षवेधी सुचना क्र. २३५८

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यातील नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत केले जात असणे, जीवनाश्यक वस्तूंच्या पुरवठ्यामध्ये पारदर्शकता यावी, आणि पात्र लाभार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचा लाभमिळावा याकरीता स्वस्त धान्य दुकानांमध्ये वस्तूंचा पुरवठा करतेवेळी लाभार्थ्यांची ओळख व खात्री पटण्यासाठी ई-पॉस मशिनचा वापर केला जात असणे. सदरच्या ई-पॉस मशिन व अनुषंगिक सुविधा भाडे तत्वावर उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने जुलै २०२२ मध्ये निविदा प्रक्रिया सुरु करून ऑक्टोंबर २०२३ मध्ये कार्यादेश दिले असणे, या कामकाजाकरीता निवड झालेल्या M/s Linklwell Telesystem Pvt.Ltd., Hyderabad व M/s OASYS Cybernatics Pvt. Ltd. यांनी खोटी माहिती सादर करून तसेच त्यांच्यांवर झालेल्या कारवाया दडवून शासनाची दिशाभूल करून फसवणूक केलेली असणे, सदर कंपन्या विविध राज्यांमध्ये काळया यादीत असणे, M/s OASYS Cybernatics Pvt. Ltd. या कंपनीवर सुध्दा हिमाचल प्रदेश शासनाने कारवाई केल्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP(C) No.६५३१/२०२५ मध्ये दि.२४/११/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाव्दारे स्पष्ट होत असणे, याप्रकरणी मंत्रालयातील काही अधिकारी व कर्मचारी यांचा हस्तक्षेप असणे व सदर कंपनीला काम मिळवून देण्यासाठी कार्य करत असणे,त्यामुळे या दोन्ही कंपन्यांचे कामकाज तात्काळ काढून घेण्यात यावे व संबंधित अधिकारींवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी कारवाई करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री ( अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण ) यांचे निवेदन

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानातील शिधावस्तूंचे वितरण करतांना लाभार्थ्यांची बायोमॅट्रीक ओळख पटवून ई-पॉस उपकरणाद्वारे शिधावस्तू वितरण करण्याचा निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दि. १८ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

राज्यातील रास्तभाव दुकानांमध्ये ई-पॉस मशिन बसविणे व त्याची देखभाल व दुरूस्ती करण्याकरीता संबंधित System Integrator यांच्यासोबत दि.०४.०३.२०२४ रोजी करार करण्यात आला. तसेच या विभागाच्या दि.११.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे गट निहाय Iris Scanner सह ई-पॉस मशिन बसविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

| गट | System Integrator |
|---|---|
| गट १- (पुणे-औरंगाबाद विभाग) | M/s Linkwell Telesystems Pvt. Ltd. |
| गट २- (नागपूर- अमरावती विभाग) | M/s Integra Micro System (P) Ltd. |
| गट ३- (कोकण-नाशिक विभाग व मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र ) | M/s Oasys Cybernetics Pvt. Ltd. |

M/s Linklwell Telesystem Pvt.Ltd व M/s OASYS Cybernatics Pvt. Ltd. या कंपनीवर मध्य प्रदेश व हिमाचल प्रदेश शासनाने कारवाई केली असून, सदर माहिती या दोन्ही कंपन्यांनी महाराष्ट्र शासनापासून जाणीवपूर्वक दडवून शासनाची फसवणूक केलेली असल्याने त्यांच्याकडून काम काढून घेऊन फौजदारी कारवाई करण्याबाबत मा.वि.स.स. यांनी दि.२३.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये या विभागास तक्रार केली आहे.

मा.विधानसभा सदस्य यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मध्य प्रदेश, सिक्कीम व हिमाचल प्रदेश या राज्यांकडून दि.०९ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली आहे. तसेच M/s Linklwell Telesystem Pvt.Ltd व M/s OASYS Cybernatics Pvt. Ltd. यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. सदर खुलाशाच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याकरीता विभागस्तरावर कार्यवाही सूरू आहे.

**************************************

**लक्षवेधी सूचना क्रमांक:-२०२५**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री. रविशेठ पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०२५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"रायगड जिल्ह्यातील सुधागड (पाली) तालुक्यातील इको सेन्सिटिव्ह झोन मधून सुधागड (पाली) तालुक्यातील ५२ महसुली गावे वगळण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींकडून केली जात असल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, सदरची ५२ महसुली गावे इको सेन्सिटिव्ह झोन मधून वगळली जात नसल्याने मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ मुंबई व ठाणे या शहरात स्थलांतरित होत असणे, सदरची ५२ महसुली गावे इको सेन्सिटिव्ह झोन मधून वगळणेबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

---

श्री. गणेश नाईक — मा. मंत्री (वने)

निवेदन

भारतातील पश्चिम घाट हे जगातील अतिसमृध्द जैवविविधता क्षेत्रापैकी (Mega Biodiversity Hotspot) एक असून महाराष्ट्रातील पश्चिम घाट क्षेत्राला सह्याद्री रांगा असे म्हणतात. महाराष्ट्रातील पश्चिम घाट क्षेत्राचे क्षेत्रफळ सुमारे ५८,४०० चौरस किलोमीटर असून ते राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये पसरले आहे.

सन २०१२ मध्ये श्री. माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील पश्चिम घाट इकोलॉजिकल एक्सपर्ट पॅनेल (WGEEP) यांनी प्रथमत: पश्चिम घाटाचे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र निश्चित केले. त्यानंतर डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय कार्यकारी गटाने (HLWG) पश्चिम घाटातील देशभर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रासाठी विशिष्ट निकष लागू करून आणि नैसर्गिक लॅन्डस्केप असलेली विशिष्ट गावांचा समावेश करुन सन २०१३ मध्ये पश्चिम घाटातील प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचा (ESA) अहवाल केंद्र शासनाकडे सादर केला असून त्यास केंद्र शासनाने तत्वतः मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुसार आतापर्यंत उच्चस्तरीय कार्यकारी गटाने सुचविल्याप्रमाणे पश्चिम घाटातील पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (ESA) जाहीर करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतुदींनुसार खालीलप्रमाणे प्रारुप अधिसूचना प्रकाशित केल्या आहेत.

| अ.क्र. | प्रारुप अधिसूचना क्रमांक | प्रारुप अधिसूचनेचा दिनांक |
|---|---|---|
| १ | पहिली प्रारुप अधिसूचना | १० मार्च, २०१४ |
| २ | दुसरी प्रारुप अधिसूचना | ४ सप्टेंबर, २०१५ |
| ३ | तिसरी प्रारुप अधिसूचना | २७ फेब्रुवारी, २०१७ |
| ४ | चौथी प्रारुप अधिसूचना | ३ ऑक्टोबर, २०१८. |
| ५ | पाचवी प्रारुप अधिसूचना | ६ जुलै २०२२ |
| ६ | सहावी प्रारुप अधिसूचना | ३१ जुलै, २०२४ |

सदर प्रारुप अधिसूचनांमध्ये रायगड जिल्ह्यामधील सुधागड तालुक्यातील सुमारे ७७ गावांचा समावेश आहे.

वरील सर्व अधिसूचना या केवळ प्रारुप अधिसूचना असून त्यावर स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक रहिवाशी यांचेकडून प्राप्त हरकती व सूचना शासनामार्फत वेळोवेळी केंद्र शासनास सादर करण्यात आल्या आहेत. परंतु केंद्र शासनाकडून याबाबतची अंतिम अधिसूचना अद्यापपर्यंत प्रसिध्द करण्यात आलेली नाही. स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक रहिवाशी यांचेकडून प्राप्त हरकतींचा व सुचनांचा विचार करुन लवकरात लवकर अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्याबाबत केंद्र शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

********

# महाराष्ट्र विधानसभा सन २०२६ च्या पहिल्या (अर्थसंकल्पिय) अधिवेशनातील

## लक्षवेधी सुचना क्र.१८२५

**श्री. अतुल भातखळकर, श्री. राजु नारायण तोडसाम व श्री. मंगेश रमेश चव्हाण, वि.स.स, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२५ पुढीलप्रमाणे आहे-:**

"राज्यात १० वी आणि १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना, अनेक केंद्रांवर पायाभूत सुविधांचा भीषण अभाव असल्याचे निदर्शनास येत असणे, त्यामध्ये, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील यशवंत विद्यालयात विद्यार्थ्यांना बसण्यास जागा पुरत नाही म्हणून चक्क लग्नाच्या मांडवात बसवून परीक्षा घेत असल्याचे धक्कादायक वास्तव निदर्शनास येणे, तसेच, एकीकडे शासन 'कॉपीमुक्त परीक्षा' मोहिमेचा दावा करत असताना, दुसरीकडे १० टक्क्यांहून अधिक परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नसणे, तसेच, १२ वीच्या परीक्षेत सामूहिक कॉपीची ६ प्रकरणे उघड झाली असून, अमरावती विभागात ५३ गैरप्रकार तर पुणे, नागपूर, लातूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई व नाशिक अशा विविध ठिकाणी गैरप्रकार नोंदवले गेले असणे, त्यामध्ये, परीक्षा केंद्रावरील स्थानिक प्रशासन आणि शाळांच्या मुख्याध्यापकांनी पायाभूत सुविधांची मागणी वेळेत न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, त्यामुळे, बीडमधील मांडवामध्ये घेत असलेल्या परीक्षेसाठी जबाबदार असलेल्या केंद्र संचालकांवर आणि संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, सर्व केंद्रांवर तातडीने सीसीटीव्ही आणि अन्य सुरक्षा व्यवस्था उभारण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज असणे, तसेच, सामूहिक कॉपी रोखण्यासाठी भरारी पथकांचे कार्य अधिक सक्षम करण्यासाठी नवीन यंत्रणा राबवण्याबाबत व भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी पूर्व नियोजन करून शाळांच्या पायाभूत सुविधांची जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया"

## मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी करावयाचे निवेदन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रुवारी मार्च २०२६ परीक्षा दिनांक ११.०२.२०२६ ते १८.०३.२०२६ या कालावधीत आयोजित केल्या आहेत. सदर परीक्षेसाठी संपूर्ण राज्यात इ.१२ वी साठी ३३८७ परीक्षा केंद्रे असून इ.१० वी साठी ५१११ परीक्षा केंद्रे आहेत.या सर्व परीक्षा केंद्रांवर परीक्षांचे आयोजन सुयोग्य रितीने व प्रभावीपणे होण्यासाठी राज्य मंडळामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत असतात.

राज्यात इ.१२ वी साठी ३३८७ परीक्षा केंद्रापैकी ३२०६ परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे बसविण्यात आले होते. तसेच इयत्ता १० वी च्या ५१११ परीक्षा केंद्रांपैकी ४९५७ केंद्रावर CCTV बसविण्यात आले होते. इतर उपाययोजनांमध्ये बोर्डाच्या परीक्षा निकोप व सुरक्षीत वातावरणात होण्यसाठी विविध सर्व परीक्षा केंद्रावरील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची अदलाबदल करण्यास कळविले होते, परंतु विविध मुख्याध्यपक व शिक्षक संघटनांनी केलेल्या मागणीनुसार सर्व परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचारी न बदलता त्याऐवजी ज्या परीक्षा केंद्रावरील वर्गखोल्यांमध्ये १०० टक्के CCTV बसविण्यात आले नाहित त्या केंद्रावरील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व इतर सर्व कर्मचारीवर्गाची अदलाबदल करण्यास मंजुरी देण्यात

आली होती. तसेच विभागीय मंडळामार्फत उच्च माध्यमिक व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ सुरू होण्यापूर्वी परीक्षेचे सुरळीत संचलन होण्याच्या दृष्टीने सर्व मुख्याध्यापक व प्राचार्य तसेच केंद्रसंचालक यांच्या संयुक्त सभा जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या उपस्थितीमध्ये घेण्यात आलेल्या आहेत. सदर सभेमध्ये परीक्षा संचालनाबाबत तक्रारी व अडचणी बाबतचे निराकरण करण्यात येवून परीक्षेच्या अनुषंगाने सर्व भौतिक सुविधाबाबत उपाययोजना करण्याबाबत सुचविण्यात आले होते.

परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार टाळण्यासाठी व परीक्षेचे सुरळीत संचलन होण्यासाठी परीक्षा काळात परीक्षा केंद्रांना भेटी देण्याकरिता शासनाकडून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कार्यकारी अभियंता, प्राचार्य-जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचा समावेश असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे सदस्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले होते. परीक्षेपूर्वी सर्व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात येवून सभेमध्ये परीक्षा केंद्रावरील भौतिक सुविधा, सीसीटीव्ही, कॉपीमुक्त वातावरणामध्ये परीक्षा पार पाडणे याबाबीच्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले होते. तसेच परीक्षा केंद्रावर गैरप्रकार, सामुहिक कॉपी, तोतया विद्यार्थी इ. सारखे गैरमार्ग होऊ नये म्हणून मंडळामार्फत भरारी पथके, बैठे पथकांची नियुक्ती करण्यात आलेली होती. तसेच परीक्षा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, शिस्त व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले असून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे रेकॉर्डिंग जतन करून ठेवणेबाबतही कळविण्यात आले होते.

दिनांक २०.०२.२०२६ रोजी परीक्षा केंद्र क्र.२०५६ यशवंत विद्यालय, कुर्ला ता.जि.बीड येथे इ.१० वीच्या परीक्षेस मराठी विषयाच्या पेपरला एकूण २९३ विद्यार्थी प्रविष्ठ असल्याने व या विद्यार्थ्यांची बैठे व्यवस्था नसल्याने मुख्याध्यापक तथा केंद्रसंचालक यांनी इमारतीच्या छतावर मंडप लावून त्यामध्ये ०४ दालने तयार करून १०० विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था केल्याचे चौकशी दरम्यान आढळून आले.या प्रकरणी मुख्याध्यापक यशवंत विद्यालय, कुर्ला ता. जि. बीड यांनी सदर परीक्षा केंद्रावरील बैठक व्यवस्थेबाबत अडचण येत असल्याबाबत किंवा वर्ग खोल्या अपु-या पडत असल्याबाबत मंडळाशी किंवा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बीड यांचेशी पत्रव्यवहार केला नाही, किंवा संपर्कही साधला नाही. याउलट सदर शाळेमध्ये ०७ वर्गखोल्या असतांना ११ वर्गखोल्या उपलब्ध असल्याबाबत मंडळाकडे सादर केलेल्या प्रपत्रामध्ये नमुद करून स्वाक्षरी केलेली आहे. मुख्याध्यापक यांनी विभागीय मंडळास खोटी, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती सादर केली असल्याचे स्पष्ट होते. यावरून केंद्रसंचालक यांनी याबाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांची गैरसोय केल्याचे स्पष्ट निदर्शनास आल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.बीड यांचे दि. २०.०२.२०२६ च्या पत्रान्वये श्री. राऊत ए. एम., मुख्याध्यापक तथा केंद्रसंचालक यशवंत विद्यालय, कुर्ला ता. जि. बीड (केंद्र क्रमांक-२०५६) यांना निलंबित करण्यात आले आहे.तसेच यशवंत विद्यालय, कुर्ला ता. जि. बीड हे केंद्र सन फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या परीक्षेपासून कायमस्वरूपी बंद

करण्यात येईल. उपरोक्त केंद्रावरील विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये म्हणून जवळची शाळा जि.प.के.प्रा. शाळा, कुर्ला ता. जि.बीड येथे बैठक व्यवस्था करण्यात आली होती. तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रुवारी- मार्च २०२६ परीक्षे दरम्यान आढळुन आलेल्या गैरप्रकारांवर प्रकरण निहाय mass copy करणा-यांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापुर, ता. कन्नड येथील mass copy प्रकरणात २४ जणांविरुध्द गुन्हा दाखल केलेला असून २१ जणांना निलंबित करण्यात आलेले आहे. जालना जिल्हयातील मंठा तालुक्यातील केंद्रात पर्यवेक्षकांना निलंबीत करण्यात आले आहे.तसेच या परीक्षांमध्ये दोषी आढळुन आलेल्या व्यक्तींवर गुन्हे नोंदविणे, मुख्याध्यापक/शिक्षक/कर्मचारी यांच्यावर प्रकरण निहाय प्रशासकिय कार्यवाही करणे,निलंबीत करणे याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.दोषी व्यक्तींवर व विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. तसेच मंडळ नियमावली नुसार विद्यार्थ्यांवर कार्यवाही करण्यात येणार आहे.

फेब्रुवारी- मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेतील गैरप्रकार परिणामकारक पध्दतीने रोखण्यासाठी तसेच परीक्षा कॉपीमुक्त व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी मंडळाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सीसीटीव्ही व तांत्रिक यंत्रणांचा वापर प्रभावीपणे करण्यात आले आहे. जिल्हा दक्षता समितीकडे काही ठिकाणी सीसीटीव्हीचा ॲक्सिस देण्यात आल्यामुळे तसेच सीसीटीव्ही सारख्या तांत्रिक यंत्रणांचा वापर वाढविल्यामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले आहे. परीक्षा केंद्रावर परीक्षाभिमुख, शांततामय व तणावमुक्त वातावरण निर्माण होण्यास मदत झालेली आहे. गैरमार्गाचा वापर करणाऱ्या विद्यार्थी व इतर यंत्रणावर प्रतिबंधात्मक आळा बसलेला आहे. भरारी पथकाच्या भेटीच्या पूर्वीची व नंतरची परीक्षा केंद्राची परिस्थिती सीसीटीव्ही फुटेज मध्ये पाहता येत असल्यामुळे गैरमार्गाचा वापर करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक आळा बसलेला आहे. गैरमार्गाचा वापर करणाऱ्या विद्यार्थी व परीक्षा केंद्रांवरील कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या शिक्षेमुळे प्रतिबंधात्मक जरब बसली आहे.

****************************************************************

<u>विधान सभा लक्षवेधी सूचना क्र. २७५९</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२६ चे प्रथम ( अर्थसंकल्पिय ) अधिवेशन

**श्री. मंगेश चव्हाण, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २७५९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक विकास मंडळ संचालित जयहिंद माध्य. व उच्च माध्य. विद्यालय व आदर्श प्राथ. विद्यालय चाळीसगाव, जि. जळगाव या संस्थेचे सचिव श्री. अशोक हरी खलाणे व जयहिंद माध्य. व उच्च माध्य. विद्यालयाचे प्रा. अभिजीत खलाणे व आदर्श प्राथ. विद्यालयाचे प्रा. संजय सोनवणे यांनी संगमताने डिसें. २००६ पासून १६ शिक्षकांच्या वेतनातून दरमहा बेकायदेशीररीत्या कपात केलेली असणे, महत्त्वाच्या पदांवर कुटुंबातीलच सदस्यांची नियमबाह्यरीत्या नियुक्ती करणे, काम न करता पगाराच्या स्वरूपातून मोबदला घेऊन शासनाची फसवणूक केलेली असणे, याप्रकरणी १६ कर्मचारी वर्गाने त्यांच्या विरोधात चाळीसगाव पोलीस स्टेशनमध्ये व शिक्षण विभागात तक्रार करणे, शिक्षण विभागाने याची दखल घेऊन चौकशी केलेली असणे, परंतु, संस्थाचालकाने या कामी कोणतेही सहकार्य केले नसून व चौकशी समितीस सहकार्य देखील केलेले नसणे, शिक्षण विभागाने केलेल्या चौकशीमध्ये संस्थाचालक दोषी असणे व त्यांच्यावर दोषारोपसिद्ध होणे, संस्था चालकावर झालेल्या फौजदारी स्वरूपातील कार्यवाहीनुसार तीन ते साडेतीन महिने सदरील संस्थाचालक कारागृहात असणे, चौकशी समितीने अहवाल शासन पाठवीणे, त्या-अंतर्गत शिक्षण संचालक, पुणे यांनी सुनावणी घेऊन तोच चौकशी अहवाल व अभिप्राय कायम ठेवून पुढील कार्यवाहीसाठी शिक्षण आयुक्त यांच्याकडे पाठविला असणे व त्यानुसार मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांच्या समोर सुद्धा सुनावणी झालेली असणे, सदर संस्थेची तक्रार शासनाकडे केली म्हणून संस्थेचे सचिव यांनी आकस व सूडबुद्धीने एकूण १६ कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्तीचे बेकायदेशीर आदेश काढणे, गेल्या १४ महिन्यांपासून सदरील कर्मचाऱ्यांची सेवा समाप्ती करण्यात आल्याने त्यांना वेतन मिळत नसल्याने सर्वच परिवारांच्या सदस्यांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असणे, यासंबंधी संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे, शासनाकडून दिरंगाई होत असल्याने सदर कर्मचारी वर्गाने आत्मदहन करण्याचा दिलेला इशारा, सदर शिक्षक कर्मचारी यांना सेवेवर कायम करून व त्यांच्या कुटुंबाचा होत असलेला उदर निर्वाहचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी व संस्थेची मान्यता रद्द करावी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही".

## निवेदन
## (मा.श्री.दादा भुसे, शालेय शिक्षण मंत्री)

महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक विकास मंडळ संचलित, जयहिंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चाळीसगांव जि. जळगांव या संस्थेचे सचिव श्री अशोक हरी खलाणे व जयहिंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालयाचे प्रा. अभिजीत खलाणे यांनी संगनमताने १६ शिक्षकांच्या वेतनातून दरमहा बेकायदेशीररित्या कपात केली असल्याचे चौकशी दरम्यान निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र खाजगी

शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ नुसार शाळेवर कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनांतून अशा प्रकारची कपात करण्याबाबत कोणतीही तरतूद आढळून येत नाही. तसेच, कोणत्याही अधिनियमात, नियमात तसेच विभागाद्वारे निर्गमित केलेल्या कोणत्याही शासन निर्णयाद्वारे अशा प्रकारची मुभा/स्वातंत्र्य कोणत्याही संस्थेस अनुज्ञेय नाही. तसेच, सदर संस्थेच्या पदाधिकारी यांनी मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देतांना सेवाज्येष्ठ शिक्षकांकडून हेतुपुरस्कर त्यांची ना-हरकत लिहून घेऊन सेवाकनिष्ठ शिक्षकांस मुख्याध्यापक पदावर पदोन्नती दिल्याचे निदर्शनास आले आहे. संस्थेच्या पदाधिकारी यांनी कारभारामध्ये गंभीर स्वरूपाची प्रशासकीय व वित्तीय अनियमितता केली असल्याचे दिसून आले आहे. संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत पोलिस स्टेशन मध्ये भारतीय दंड विधानाचे कलम ४२० तसेच अन्य कलमांतर्गत प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला असून पोलीस तपासाअंती गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी जयहिंद माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय चाळीसगांव, जि. जळगांव या शाळेवर प्रशासक नेमणेबाबत दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.) यांचे कार्यालयात दि.३०.०१.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात येऊन जयहिंद माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय चाळीसगांव, जि. जळगांव या शाळेवर प्रशासक नियुक्त करणेबाबत दि.१२.२.२०२५ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत. संबंधीत संस्थेने महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ कलम ३(४) मधील तरतुदीनुसार मा. मंत्री, शालेय शिक्षण यांच्याकडे अपिल दाखल केले. यांप्रकरणी मा. मंत्री महोदय यांच्या दालनामध्ये झालेल्या सुनावणीअंती सदर अपिल फेटाळण्यात आले. तथापि, संबंधीत संस्थेने प्रशासक नियुक्तीच्या आदेशास मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे आव्हान देत रिट याचिका क्र. १०१०६/२०२५ दाखल केली आहे. या न्यायालयीन प्रकरणी मा. न्यायालयाने प्रशासक नियुक्ती आदेशास स्थगिती दिली आहे.

श्री. श्रावण मांगो महाजन व १५ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी वेतन देयकातून परस्पर होणारी खंडणी स्वरुपाची मासिक आर्थिक रक्कम कपात बंद होणेबाबत व कपात केलेली रक्कम व्याजासह परत मिळणेबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयास विनंती केली होती. सदर अर्जामध्ये नमूद तक्रारींची चौकशी धर्मादाय आयुक्त कार्यालय, जळगांव यांचे मार्फत करण्यात आली असून त्यांनी दि.६.०८.२०२५ रोजी आदेश पारित केले होते. सदर आदेशास संबंधीत संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. १६८७/२०२६ अन्वये आव्हान दिले आहे. तथापि, संबंधीत संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबतचा अर्ज शासनस्तरावर प्रलंबित नाही.

***************************

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२६ चे प्रथम अधिवेशन

ॲड.पराग अळवणी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"आरे दुग्ध वसाहत ही मुंबईच्या गोरेगाव (पूर्व) या भागात स्थित असणे, महाराष्ट्र राज्याच्या दुग्ध विकास विभागाकडून सन १९४९-१९५० साली सदर वसाहतीची स्थापना केलेली असणे. मुंबई शहराला आवश्यक दुध पुरवठा, किफायतशीर दरात उपलब्ध व्हावा म्हणून सदर वसाहतीची निर्मिती केलेली असणे. सदर वसाहत दुग्धविकास विभागाचे नियंत्रणाखाली असून, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून सदर वसाहतीचे व्यवस्थापन तसेच प्रशासन चालविले जात असणे. परंतु सदर वसाहतीमध्ये झालेली व सुरु असलेली अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे, नियमबाह्यरित्या जागेच्या वापरातील सुरु असलेला बदल, येथील अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ याअनुषंगाने सदर परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे तसेच अवैध धंद्यावर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी सदर वसाहतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस प्रशासन तसेच शासनाचे संबधित विविध विभाग यांच्याकडे तक्रारी करण्यात आलेल्या असणे, तरीही संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही केली जात नसणे. त्यानुसार आरे कॉलनीत सुरू असलेले अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्ये यावर कारवाई करणे, अनधिकृत अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करणे तसेच आरे वसाहतीच्या जागेबाबत निर्णय घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### श्री. अतुल सावे, मा. मंत्री (दुग्धव्यवसाय विकास) यांचे निवेदन

सन १९४९ मध्ये गोरेगाव पूर्व येथील एकूण ८ गावातील एकूण ३१६२.३२ एकर जमीन भूसंपादित करुन आरे दुग्ध वसाहतीची निर्मिती करण्यात आलेली आहे. मुंबई शहराला आवश्यक दूध पुरवठा किफायतशीर दरात उपलब्ध व्हावा म्हणून सदर वसाहतीची निर्मिती करण्यात आलेली आहे. आरे दुग्ध वसाहतीमध्ये सद्यस्थितीत दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या ताब्यात एकूण ११६५.१० एकर जमीन आहे. उर्वरित १९९७.२२ एकर जमीन यापूर्वी शासन मंजूरीने केंद्र व राज्य शासनाच्या विविध संस्थांना व इतर संस्थांना हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

आरे दुग्ध वसाहतीमध्ये २७ आदिवासी पाडे व इतर झोपडपट्टी पूर्वीपासून वसलेली आहे. आरे दुग्ध वसाहतीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी आरे यांचे कार्यालयाच्या सुरक्षा विभागामार्फत माहे जानेवारी २०२५ पासून माहे १५ मार्च २०२६ पर्यंत एकूण ५३६ निष्कासन कार्यवाहया करण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे नमुद केलेला आहे.

| अ.क्र. | महिना | निष्कासन कार्यवाहीची संख्या |
|---|---|---|
| १ | माहे जानेवारी २०२५ | ३५ |
| २ | माहे फेब्रुवारी २०२५ | ५८ |
| ३ | माहे मार्च २०२५ | ९५ |
| ४ | माहे एप्रिल २०२५ | १० |
| ५ | माहे मे २०२५ | २७ |
| ६ | माहे जून २०२५ | ८७ |
| ७ | माहे जुलै २०२५ | २६ |
| ८ | माहे ऑगस्ट २०२५ | २५ |
| ९ | माहे सप्टेंबर २०२५ | २० |
| १० | माहे ऑक्टोंबर २०२५ | २९ |
| ११ | माहे नोव्हेंबर २०२५ | २१ |
| १२ | माहे डिसेंबर २०२५ | २६ |
| १३ | माहे जानेवारी २०२६ | १० |
| १४ | माहे फेब्रुवारी २०२६ | १४ |
| १५ | १५ मार्च २०२६ | ५३ |
| | एकूण | ५३६ |
| | | एकूण गुन्हे नोंद - ०२ |

आरे दुग्धवसाहतीमधील अपुरे मनुष्यबळ तसेच नजीकच्या कालावधीमध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती विचारात घेता शासकीय जागेत होणा-या अतिक्रमणावर प्रभावीपणे प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडील ३३ सुरक्षा कर्मचारी बाहय यंत्रणेव्दारे ३ वर्षाच्या कालावधीसाठी घेणेकरिता कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

आरे दुग्ध वसाहती मधील पर्यावरण संवेदनशील क्षेत्रातील शासकीय जागेत अनधिकृत वृक्षतोड, झाडे कापणे तसेच कॉंक्रीटीकरण / अतिक्रमण होवू नये, याकरिता या कार्यालयाच्या सुरक्षा विभागामार्फत दैनंदिन वसाहत फेरी/गस्ती घालून शासकीय जमिनीचे व पर्यावरणाचे संरक्षण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

आरे दुग्ध वसाहतीमध्ये नियमबाह्यरित्या जागेच्या वापरातील सुरू असलेला बदल, येथील अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्ये याबाबत खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

१. सन १९४९ मध्ये गोरेगाव पूर्व येथील एकूण ८ गावातील एकूण ३१६२.३२ एकर जमीन भूसंपादित करण्यात आली होती. आरे दुग्ध वसाहतीमध्ये सद्यस्थितीत दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या ताब्यात एकूण ११६५.१० एकर जमीन आहे. उर्वरित १९९७.२२ एकर जमीन ही शासन मंजूरीने केंद्र व राज्य शासनाच्या विविध संस्थांना व इतर संस्थांना (चित्रनगरी प्रशासन, फोर्सवन प्रशासन, राज्य राखीव पोलीस बल क्र.८, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, महानंद डेअरी, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. इत्यादी संबंधीत संस्थेच्या मागणीनुसार शासन मंजूरीने महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदरच्या जागा महसूल व वन विभागामार्फत अटी व शर्ती निश्चित करुन संबंधीत विभागांना / संस्थांना हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत या जागा संबंधीत विभाग / संस्थांच्या नियंत्रणाखाली आहेत.

२. आरे दुग्ध वसाहतीमधील येथील अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्ये यावर प्रतिबंध घालण्यासाठी येथील विस्तीर्ण स्वरुपाचा परिसर हा १. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आरे पोलीस ठाणे, गोरेगांव मुंबई, २. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गोरेगांव पूर्व, मुंबई तसेच ३. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे यांचे कार्यक्षेत्रात असून या परिसरातील अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्यांवर आळा घालण्याची कार्यवाही आरे पोलीस ठाण्यामार्फत वेळोवळी करण्यात येते.

सदर वसाहतीमधील अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, परिमंडळ-१२, मुंबई अंतर्गत आरे पोलीस ठाणे हद्दीतील आरे दुग्ध वसाहतीचे क्षेत्रफळ हे ३१६२.३२ एकर परिसरामध्ये विस्तारीत आहे. सदर जागेमध्ये अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे, नियमबाहयरित्या जागेच्या वापराबाबत कारवाई करण्यासंदर्भात आरे दुग्ध

वसाहत प्रशासन, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून व आरे पोलीस ठाण्याकडून वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

आरे दुग्ध वसाहत परिसरात अवैध धंदे करण्याविरुध्द आरे पोलिस ठाण्याकडून खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| सन २०२४ | | सन २०२५ | | सन २०२६ अदयापपर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| अवैध धंदे | एकूण कारवाई | अवैध धंदे | एकूण कारवाई | अवैध धंदे | एकूण कारवाई |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ | १५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ | ०६ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ | ०७ |
| महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम | ०२ | महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम | २१ | महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम | ०१ |
| अंमली पदार्थ विरोधी गुन्हा | ०३ | अंमली पदार्थ विरोधी गुन्हा | ०३ | अंमली पदार्थ विरोधी गुन्हा | ०७ |

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा.श्री. किशोर पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१५६४**

## लक्षवेधी सूचना

" राज्यातील दिव्यांग व्यक्तीना सहायक साधनांचे वाटप प्रामुख्याने केंद्र शासनाच्या ADIP योजनेअंतर्गत व आमदार स्थानिकविकास निधीयोजना या मुख्य योजनांतून करण्यात येणे, सद्यःस्थितीत या दोन्ही योजनांमधील तरतूदींमध्ये विसंगती निर्माण झाल्याने मोठयासंख्येने गरजू दिव्यांग व्यक्ती लाभापासून वंचित असणे, केंद्र शासनाच्या ADIP योजनेअंतर्गत ८० टक्के व त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींनाच चार्जिंग इलेक्ट्रीक तीनचाकी सायकल देण्यात येणे व ४० ते ७९ टक्के दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना दोन्ही योजनेतून हातानी चालवणारी तीनचाकी सायकल देण्यात येणे, मात्र दिव्यांग कल्याण विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२५/प्र.क्र.७९/दिव्यांग कल्याण-०२ दि.२२.९.२०२५ नुसार हाताने चालवणारी तीनचाकी सायकाल देणे बंद करण्यात येणे, आमदार निधीतून प्रति लाभार्थी साहित्य खरेदीची मर्यादा १५ हजार रुपये असल्याने ४० ते ७९ टक्के दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीना ४० ते ५० हजार किंमतीची चार्जिंग इलेक्ट्रिक तीनचाकी सायकल देता येत नसणे, परिणामी हा ४० ते ७९ टक्के दिव्यांग व्यक्तीवर अन्याय असणे, याकरिता शासनाने केंद्र शासनाच्या ADIP योजनेअंतर्गत व आमदार निधीतून वैद्यकिय गरज व कार्यक्षमतेच्या आधारे हाताने चालविणारी तीनचाकी सायकल देण्याची तरतूद पुन्हा सुरु करावी, तसेच आमदार निधीतून १५ हजार रुपये असलेली मर्यादा वाढवून ५० हजार रुपये करण्याची जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जळगांव यांनी माहे फेब्रुवारी, २०२६ च्या सुमारास केलेली मागणी, होत असलेली मागणी, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मंत्री, दिव्यांग सक्षमीकरण महोदयांचे निवेदन

दिव्यांग व्यक्तींना सहायक उपकरणे उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने केंद्र शासनामार्फत "दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे (ADIP-Assistance to Persons with Disabilities for Purchase / Fitting of Aids / Appliances )" ही योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत दिव्यांग व्यक्तींना उपलब्ध करुन द्यावयाची सहायक उपकरणे / साधने भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (Artificial Limbs Manufacturing Corporation of INDIA (ALIMCO)) या केंद्र शासनाचा उपक्रम असलेल्या संस्थेमार्फत वितरीत करण्यात येतात.

भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (ALIMCO) या संस्थेमार्फत राज्यात वेगवेगळया ठिकाणी शिबिरे आयोजित करुन सदर शिबिरांमध्ये दिव्यांग व्यक्तींची तपासणी करुन त्यांच्या आवश्यकतेनुसार कृत्रीम अवयव किंवा सहायक उपकरणे / साधने उपलब्ध करुन देण्यात येतात.

केंद्र शासनाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनानुसार केंद्र शासनाच्या "दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे." या योजनेंतर्गत विविध प्रकारातील ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे प्रमाण असलेल्या दिव्यांग व्यक्तींना स्वयंचलीत तीनचाकी सायकल व स्वयंचलीत व्हिलचेअर उपलब्ध करुन देण्यात येते. भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (ALIMCO) या संस्थेमार्फत दिनांक १ जानेवारी, २०२३ ते २८ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत राज्यात आयोजित शिबीरे व त्याअंतर्गत तपासणी करुन दिव्यांग व्यक्तींना पुरविण्यात आलेल्या सहायक उपकरणांबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.:-

| वर्ष | आयोजित शिबिरांची संख्या | दिव्यांग लाभार्थ्यांची संख्या | लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या सहायक उपकरणांची संख्या | खर्चीत निधी |
|---|---|---|---|---|
| २०२३ | ७८ | ३८,८३८ | ६४,७७२ | ३२.९८ कोटी |
| २०२४ | ७६ | ११,२४७ | १८,०८४ | १०.४१ कोटी |
| २०२५ | ७० | ११,८५४ | १९,४२६ | १२.१४ कोटी |
| २०२६ (२८ फेब्रु. पर्यंत) | ४४ | ३७१३ | ५६७४ | ३.५७ कोटी |
| **एकूण** | **२४७** | **६५,६५२** | **१,०७,९५६** | **५९.१२ कोटी** |

दिव्यांगांसाठी सहायक उपकरणे / साधने उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने दिनांक १० ऑगस्ट, १९८९ रोजीच्या शासन निर्णयानुसार "दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे (Provide Assistive Devises to PwDs.)" ही राज्य शासनाची योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यास त्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार कृत्रिम अवयव व साधने याचा पुरवठा करण्यात येतो.

तीन चाकी हाताने ओढणाऱ्या सायकलींमुळे दिव्यांग व्यक्तींच्या शरीरस्वास्थ्यावर प्रतिकुल परिणाम होत असल्याने तीन चाकी हाताने ओढणाऱ्या सायकलीचे वाटप करण्यात येऊ नये, अशी दिव्यांग कल्याण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था / संघटना आणि लोकप्रतिनिधीकडून मागणी होत होती. त्यास अनुसरुन दिव्यांग व्यक्तींना विविध योजनांतर्गत वितरित केल्या जाणाऱ्या तीन चाकी हाताने ओढणाऱ्या सायकलीचे वाटप करण्यात येऊ नये याची दक्षता घेणेबाबत सर्व प्रशासकीय विभाग, त्याअंतर्गत अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये आणि अन्य शासकीय/ निमशासकीय संस्था यांनी दक्षता घेणेबाबत शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

"आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दिव्यांग व्यक्तींना मदत करण्यासाठी विधीमंडळ सदस्य प्रती वर्षी कमाल रु. ३०.०० लक्ष च्या मर्यादेत निधी प्रस्तावीत करु शकतील. अशा प्रकारची मदत फक्त पात्र व्यक्तींना, तीन चाकी सायकल (बॅटरीद्वारे चालणारी), मोटरद्वारे / बॅटरीद्वारे चालणाऱ्या चाकाच्या खुर्च्या आणि कृत्रिम अवयव खरेदीकरीता दिली जाईल, यासाठी वैयक्तिक लाभाची मर्यादा रु. १५,०००/- आहे," अशी तरतुद नियोजन विभागाच्या दिनांक १२ जुलै, २०१६ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेली आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय नसलेल्या किंवा अनुज्ञेय असुन कमाल आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त रकमेच्या बाबींना / कामांना "विशेष बाब" म्हणून मान्यता देण्याचे अधिकार मा. मंत्री (नियोजन) यांना आहेत. त्यानुसार या कार्यक्रमांतर्गत पात्र दिव्यांग व्यक्तींना मदत करण्यासाठी रु.१५०००/- पेक्षा जास्त किमतीच्या प्रस्तावास "विशेष बाब" म्हणून मान्यता देता येते.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जळगांव यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्राव्दारे स्थानिक लोकप्रतिनिधींकडे आमदार स्थानिक विकास निधीतील दिव्यांगांच्या सहायक साहित्य खरेदी योजनेंतर्गत प्रती लाभार्थी खर्चाची मर्यादा रु. १५,०००/- वरुन रु. ५०,०००/- वाढविणेबाबत विनंती केली आहे.

तसेच याबाबत आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक लाभाची रु. १५,०००/- असलेली मर्यादा वाढविण्याबाबतची कार्यवाही नियोजन विभागाकडून करण्यात येत आहे.

*******

माहिती तंत्रज्ञान विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक - २८८०

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्रीमती श्वेता विद्याधर महाले, श्री. अमित विलासराव देशमुख, श्री. विजय सिद्रामप्पा देशमुख, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २८८० पुढीलप्रमाणे आहे -

"आजच्या प्रगत युगात इंटरनेट आणि समाज माध्यम हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक बनले असणे, प्रौढांसोबतच किशोरवयीन बालकांमध्ये वाढलेला स्क्रीन टाईम व समाज माध्यमाच्या अनियंत्रित वापरामुळे देशाचे आधारस्तंभ 'The Anxious Generation' (चिंताग्रस्त पिढी) बनत चालले असणे, रील स्क्रोलिंगमुळे स्मरणशक्तीचा ऱ्हास होत असणे, तसेच डोळे, मान व पाठदुखीचा त्रास होत असणे, 'सोशल व्हॅलेडेशन'च्या हव्यासापोटी तरुण मुले नैराश्य आणि आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांकडे वळत असणे, नॅशनल क्राईम रेकॉड्र्स ब्युरो (NCRB) २०२३ च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र सायबर गुन्ह्यांचे बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर असणे, २०२३ मध्ये ८१०३ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असणे, महिला व तरुणींचे ऑनलाईन लैंगिक शोषण, फोटो मॉर्फिंग, पोर्नोग्राफीचा अनिर्बंध प्रसार यामुळे महिला व मुलींची सुरक्षितता धोक्यात आली असणे, ऑस्ट्रेलिया सरकारने नुकतेच १६ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यम वापरावर बंदी घातली असणे, तसेच अमेरिका, फ्रान्स, नॉर्वे, डेन्मार्क, ब्राझील यांसह जगातील अनेक आघाडीच्या देशांनी मुलांच्या सोशल समाज माध्यम वापरावर नियंत्रणासाठी कठोर कायदे केले असणे, कर्नाटक राज्य सरकारनेही १६ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यमाच्या वापरावर बंदी घातली असणे, महाराष्ट्रानेही 'समाज माध्यम धोरण' आखणी करून १६ वर्षांखालील मुलांच्या समाज माध्यम वापरावर बंदी आणणे तसेच महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी डिजिटल सुरक्षा धोरण आखणे अत्यंत गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री ( माहिती तंत्रज्ञान ) यांचे निवेदन

राज्यात अल्पवयीन मुलांमध्ये सामाजिक माध्यमांचा वाढता वापर, ऑनलाईन गेम्स तसेच डिजिटल जाहिरातींचा प्रभाव याबाबत वित्त मंत्रालयाच्या अलीकडील आर्थिक सर्वेक्षणामध्ये अल्पवयीन मुलांसाठी सामाजिक माध्यमांच्या वापरावर वयोमर्यादा निश्चित करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे विविध मानसोपचार तज्ज्ञ संस्था व अभ्यासांमध्येही अल्पवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत असल्याचे

निदर्शनास आले आहे. सदर बाब विचारात घेऊन मा. मंत्री, माहिती व तंत्रज्ञान यांनी दि..०२/०२/२०२६ रोजीच्या पत्राद्वारे सदर विषयाचा अभ्यास करून शासनास शिफारशी/सूचना करण्यासाठी या विषयाशी संबंधित तज्ञ लोकांची टास्कफोर्स तयार करण्याबाबत विभागाला निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र राज्यात १८ वर्षांखालील सुमारे ४ कोटी मुले असून त्यांचा मानसिक, शैक्षणिक व सामाजिक विकास अबाधित रहावा ही शासनाची भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने या विषयाचा सर्वांगीण व सखोल अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आहे. मा. मंत्री, माहिती व तंत्रज्ञान यांच्या निर्देशानुसार, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध संबंधित क्षेत्रांमधील तज्ञ यांचा समावेश असलेली एक तज्ज्ञ टास्कफोर्स शासनामार्फत स्थापन करण्यात येत आहे.सदर टास्कफोर्स खालील बाबींचा अभ्यास करणार आहे :

- अल्पवयीन मुलांमधील सामाजिक माध्यम वापराचे स्वरूप व प्रमाण
- मानसिक, शारीरिक व शैक्षणिक परिणाम
- डिजिटल जाहिराती व ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा प्रभाव
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियामक चौकटींचा अभ्यास
- आवश्यक कायदेशीर, तांत्रिक व प्रशासकीय उपाययोजना

टास्कफोर्स विहित कालावधीच्या आत आपला अहवाल शासनास सादर करेल. त्यानंतर टास्कफोर्समार्फत प्राप्त शिफारसींच्या आधारे शासनाकडून मुलांचे संरक्षण तसेच शिक्षण, डिजिटल सक्षमीकरण व तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर अबाधित राहील, याबाबत पुढील आवश्यक निर्णय घेण्यात येईल. तसेच, राज्यातील महिलांविरुद्ध सायबर गुन्ह्यांची नोंद लक्षात घेता, महिला व मुलींच्या डिजिटल सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याबाबत शासन कटिबद्ध आहे.

********************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२६८६**

**मा. श्री. सुरेश धस, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २६८६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्य शासनाच्या कृषी आयुक्तालयातील आस्थापना शाखेत मोठ्याप्रमाणात गैरव्यवहाराचे चौकशी अहवाल चौकशी अधिकाऱ्यांकडून वेळेत प्राप्त होऊनही सदर चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांकडून आर्थिक देवाणघेवाण करून वर्षानुवर्ष विभागीय चौकशी सुरु न करणे तसेच मंत्रालयातील आस्थापना विभागामार्फत कृषीआयुक्त कार्यालयाकडून विभागीय चौकशीचे प्रस्ताव प्राप्त होऊनही मंत्रालयात विभागीय चौकशी वेळेत प्रस्तावित न करणे कित्येक दोषी अधिकाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात आल्याचे दिसून येणे,सेवानिवृत्त तत्कालीन कृषीसंचालक श्री.विकास पाटील येथील गैरव्यवहारात दोषी असताना त्यांच्याकडून सुमारे ३५.४४ लाख रुपयांची वसुली कृषी आयुक्तालयाने काढूनही शासनाने त्यांच्यावर सेवानिवृत्तीपर्यंत कोणतीही कारवाई न करता दोन पदोन्नत्या बहाल केल्यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असणे तसेच जलयुक्त शिवार अभियान यवतमाळ प्रकरणी २३ कोटी ६०लाख रुपयांच्या नुकसानीस जबाबदार असलेले तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी श्री.नाईक,श्री.सातपुते,श्री.कळसाईत यांच्यावर आजतागायत विभागीय चौकशी सुरु न करणे त्यांना पदोन्नत्या देण्यात येणे, गेल्या १० वर्षात प्राप्त झालेल्या चौकशी अहवालांची तारीखनिहाय माहिती नसणे, त्यापैकी किती प्रकरणांत विभागीय चौकशी सुरु न करणे वेळेत चौकशी न सुरु केल्यामुळे दोषी अधिकाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात असणे तसेच अशाप्रकारे आस्थापना शाखेतील गैरव्यवहारास जबाबदार अधिकाऱ्यांची पदोन्नती रोखून त्यांना पूर्वीच्या पदावर पदावनत करणे, चुकीच्या पद्धतीने पदोन्नत्या देणाऱ्या अधिकारी कायदेशीर कारवाई करणे, अशा गैरप्रकारांमुळे शासनाचे झालेले कोट्यावधी रुपयांचे नुकसान व्याजासह वसूल करणेबाबत करावयाची तातडीची कार्यवाही"

**मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

राज्य शासनाच्या कृषी आयुक्तालयातील आस्थापना विभागामध्ये विभागीय चौकशीच्या प्रकरणाबाबत विलंब झाल्याबाबतची वस्तुस्थिती आढळत नाही तसेच कृषि आयुक्तालयाने संबंधित

अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली असेल अशा प्रकरणात मंत्रालयीन स्तरावर विभागीय चौकशी नियम पुस्तिकेतील/प्रचलित तरतुदीनुसार तपासणी करून विभागीय चौकशी सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येते. अशा प्रकरणात मंत्रालयीन स्तरावर विलंब झाल्याची वस्तुस्थिती दिसून येत नाही.

सातारा जिल्हयात राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत गतीमान वैरण विकास कार्यक्रमामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत विभागीय कृषी सह संचालक, कोल्हापूर यांनी चौकशी करून चौकशी अहवाल दि. ३०/१२/२०१३ चे पत्रान्वये संचालक विस्तार व प्रशिक्षण, कृषी आयुक्तालय, पुणे यांना अहवाल सादर केला होता. सदरचे प्रकरणाच्या अनुषंगाने श्री.विकास पाटील, तत्कालीन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सातारा यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. श्री.विकास पाटील यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीशीच्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेल्या खुलाशावर विभागीय कृषी सहसंचालक, कोल्हापूर यांनी सादर केलेला चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची तपासणी करून, सदर प्रकरणी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथिल कृषी तज्ञांचे अभिप्राय घेण्याबाबत कृषि आयुक्तालयास कळविण्यात आले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी "श्री. विकास पाटील, तत्का. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सातारा यांनी योजनेचा उद्देश साध्य करण्यासाठी केलेले बदल व्यवहार्य व शेतक-यांचे हिताचे असल्याने प्रस्तुत प्रकणी अनियिमितता झाल्याचे निदर्शनास येत नाही" असे अभिप्राय दिले. त्याअनुषंगाने, श्री. विकास पाटील यांचेविरूध्द शासनास सादर केलेला विभागीय चौकशीचा प्रस्ताव मागे घेऊन त्यांचेविरूध्द कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करण्याची आवश्यकता नाही अशी शिफारस कृषि आयुक्तालयाकडून शासनास करण्यात आली. दरम्यानच्या काळात श्री पाटील सेवानिवृत्त झाल्याने म.ना. से. नियम १९८२ मधील नियम २७ (२) (बी) (दोन) अन्वये श्री. विकास पाटील यांचेवर विभागीय चौकशीची कार्यवाही अनुसरणे शक्य झाले नाही.

श्री. विकास पाटील यांना दि.१९.०८.२०१७ व दि.१९.११.२०२० रोजीच्या आदेशान्वये अनुक्रमे कृषि सहसंचालक व कृषि संचालक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदर पदोन्नती आदेश निर्गमित करतेवेळी श्री. पाटील यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित नव्हती.

जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्हयातील अनियमिततेच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांनी मार्गदर्शक सूचनांचा अवलंब न करता कामे केल्याचे निष्कर्ष काढून रक्कम रु.२३.४६ कोटीची वसुलपात्र असल्याचे निश्चित केले. जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दिनांक ०१/०५/२०१३ तसेच कृषी आयुक्तालयाचे संबंधित परिपत्रक दिनांक २९/०५/२०१३ यामध्ये नाला खोलीकरण नाला तळापासून (Nala Bed) ३ मीटर किंवा कठीण भूस्तरापर्यंत करण्याची तरतूद नमूद

आहे. त्यानुसार काही कामांमध्ये मार्गदर्शक सूचनांच्या भिन्न अर्थामुळे खोलीकरणाची कामे करण्यात आल्याचे तपासणीत दिसून आले. त्यानंतर संचालक (मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन) यांच्या पत्र दिनांक १९/०७/२०२३ अन्वये सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून नाला खोलीकरण करताना कठीण भूस्तरात (Hard Rock) खोदकाम करु नये व निर्धारित मर्यादेचे पालन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. वरील बाबींचा विचार करून सुधारित मार्गदर्शक सूचनांच्या आधारे वसुलपात्र रक्कम निश्चित करणे व सर्व जबाबदार अधिका-यांवर शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्री. प्रशांत नाईक व श्री. राहूल सातपुते यांना दि.०५.०४.२०२३ रोजीच्या आदेशान्वये अधिक्षक कृषि अधिकारी या संवर्गामध्ये पदोन्नती देण्यात आलेली आहे व श्री. दत्तकुमार कळसाईत यांना दि.१५.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये अधिक्षक कृषि अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदर पदोन्नती आदेश निर्गमित करतेवेळी श्री. नाईक, श्री. सातपुते व श्री. कळसाईत यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित नव्हती.

महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ संचालक, कृषी सहसंचालक, अधिक्षक कृषी अधिकारी या संवर्गात पदोन्नती देताना अधिका-यांविरूध्द कोणतेही विभागीय चौकशी सुरु नसलेबाबत तसेच कोणतेही शिक्षेचे अंमलाखाली नसलेबाबतची खात्री करुनच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०१.०८.२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आस्थपना मंडळ क्र.२/विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारसीनुसार पात्रता तपासून संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

*******

H|184|

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२४४४**

**मा. श्री. सुरेश धस, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४४४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"जालना जिल्ह्यातील पोकरा (नानाजी देशमुख कृषी संजीवनी) योजनेत शेड-नेट हाऊसेस योजनेबाबत विभागीय चौकशीत ३,२५८ शेड नेट हाऊस तपासले सुमारे ६४,९८,५९,३८५ रुपये (सुमारे रू.६४.९९ कोटी) वसुलीयोग्य घोषित करण्यात आले आहे; एकूण अनियमितीचा अंदाज सुमारे रू.६८ कोटी आहे. अनधिकृत लाभ वितरण, जुने शेडनेट नवे दाखवून निधी देणे, स्थानिक प्रमाणपत्रांद्वारे प्रशिक्षण प्रमाणपत्र देणे (पुणे/बारामतीऐवजी), बनावट/अनियमित लाभार्थी नोंदी व निधीचा गैरवापर आढळला असून मराठवाड्यात शेतकरी व कृषि विभागातील अधिकारी कर्मचारी संगनमताने भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त होत आहे. जालना येथील एका वर्ग दर्जाचे महिला अधिकारी यांचेवर दबाव आणून शारीरिक शोषण करून त्यांनाच दोषी ठरविले आहे परंतु सर्व दोषींवर निलंबन/चौकशी सुरू असल्याचे समजते. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई का होत नाही, हे स्पष्ट करावे. जालना जिल्ह्यातील, तसेच विभागाचे वरिष्ठ व मुंबईतील पोकरा कार्यालयातील अधिकारी यांच्यावरही जबाबदारी निश्चित करावी. आतापर्यंत वसूल रक्कम, खात्यांवर बंधन, मालमत्ता जप्ती व FIR (ठाणे, क्रमांक, कलमे) व पोलीस तपासाची सध्यस्थिती कळवावी. राज्यस्तरीय/CAG लेखापरीक्षण करावे; केंद्रीयृत प्रमाणपत्र सत्यापन, ई पोर्टल ऑडिट ट्रेल, दोन घटक प्रमाणीकरण व स्वतंत्र क्रॉस चेक करावे; विहित दिवसांच्या मर्यादेत आराखड्याने गुन्हेगारी कारवाई, वसुली व लाभार्थी संरक्षण सुनिश्चित करावे"

**मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन**

सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व इतर योजनेमध्ये मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन होऊन अनुदान वितरणामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने, दक्षता पथक, कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या मार्फत सदरील प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली. दक्षता पथक यांनी सादर केलेला प्राथमिक चौकशी अहवाल व प्रकल्प संचालक, नादेकृसंप्र, मुंबई यांच्या स्तरावर करण्यात आलेल्या लेखा परीक्षण अहवालानुसार रुपये २.५१ कोटी रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आले. प्राथमिक चौकशी अहवाल व लेखापरीक्षण अहवालाच्या आधारे श्रीमती शितल चव्हाण - माकर, तत्का. उप विभागीय

कृषि अधिकारी, जालना यांना शासन सेवेतून निलंबीत करण्यात आले व १) श्रीमती शितल चव्हाण - माकर, तत्का. उप विभागीय कृषि अधिकारी, जालना २) श्री. रामेश्वर भुते, तत्का. तालुका कृषि अधिकारी, भोकरदन तथा प्रभारी उप विभागीय कृषि अधिकारी, जालना ३) श्री. व्यंकट ठक्के, तत्का. तालुका कृषि अधिकारी, बदनापूर तथा प्रभारी उप विभागीय कृषि अधिकारी, जालना यांचेविरुध्द दि.२३.०९.२०२४ रोजी ज्ञापन व दोषारोप बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच ४) श्री. महेंद्र आचारे, तत्का. लेखा अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीच्या अनुषंगाने दि.२९.०७.२०२५ रोजी वित्त विभागाच्या मान्यतेने दोषारोप बजावण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सदर प्रकरणातील अन्य अपचारी कंत्राटी लेखा अधिकारी १) श्री. सुभाष उत्तमराव यशवंतकर व २) श्री. आकाश भास्कर टाक हे कंत्राटी स्वरूपात कार्यरत होते. त्यामुळे त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अनुसार शिस्तभंगाची कारवाई करता येणार नसल्याने, प्रथमत: त्यांना नोटीसा देऊन वसुलपात्र रक्कम भरण्यास कळविण्यात आले. सदरच्या रक्कमा न भरल्याने सदर कंत्राटी लेखा अधिकारी यांच्यावर भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम ४०८, ४०९, ४२० व ३४ नुसार पोलीस स्टेशन, सदर बाजार, जालना येथे गुरंनं ००९७/२०२६ दिनांक-१२/०२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी वरिल जबाबदार असलेल्या ४ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी करण्यासाठी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, छ.संभाजीनगर विभाग, छ.संभाजीनगर यांना "चौकशी अधिकारी" व कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना "सादरकर्ता अधिकारी" म्हणून नियुक्ती दि.०५.१२.२०२५ च्या आदेशान्वये करण्यात आली आहे. अद्याप चौकशी अहवाल शासनास अप्राप्त आहे.

तसेच जालना जिल्ह्यातील वर्ग - १ दर्जाचे महिला अधिकारी यांनी कोणताही दबाव अथवा त्यांचे शारीरिक शोषण केल्याची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

तक्रारदार यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जातील नमूद मुद्दांच्या अनुषंगाने १०० टक्के कामांची तपासणी करण्याचे निर्देश शासन व आयुक्तालय स्तरावरुन देण्यात आले. त्याअनुषंगाने विभागीय कृषि सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांच्या स्तरावरुन १८ पथके स्थापन करून ३२५७ शेडनेट गृहाची १०० टक्के क्षेत्रीय तपासणी करण्यात आली व दि. १४/१/२०२६ रोजी अंतिम अहवाल सादर केला आहे. सदरच्या अंतिम अहवालानुसार जायमोक्यावर शेडनेटगृह आढळून न येणे, अनुषंगिक घटक जाग्यावर आढळून न येणे, सांगाडा साहित्य मापदंडा प्रमाणे नसणे, ड्रिप फोगिंग सिस्टीम तांत्रिक निकषाप्रमाणे नसणे, अनुदान परिगणना बरोबर नसणे, देयक पूर्वसंमती पूर्वीचे असणे, क्षेत्रफळ कमी आढळून येणे अशा प्रकारच्या अनियमितता आढळूण

आलेल्या आहेत. चौकशी अहवालानुसार अनियमिततेची एकुण ६४.९२ कोटी एवढी रक्कम वसुलपात्र असल्याचे निदर्शनास आले आहे. या अहवालानुसार जाग्यावर आढळुन न आलेले ५१४ शेडनेट गृह आहेत, शेडनेट गृह जायमोक्यावर आढळून आलेले परंतु आनुषंगिक साहित्य जागेवर नसल्याने व इतर कारणामुळे वसूलपात्र असलेले शेडनेट गृह ८१० आहेत. त्याची वसूलपात्र रक्कम संबंधितांकडून वसुलपात्र असून, या वसुलपात्र रकमेसाठी संबधित अधिकारी, शेडनेट उभारणी करणारे सेवा पुरवठादार आणि लाभार्थी जबाबदार दिसून येत आहेत.

जालना जिल्हयातीतल शेतक-यांनी हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे, कृषी विज्ञान केंद्र बारामती या प्रशिक्षण संस्थाकडून प्रशिक्षण पूर्ण केलेले आहेत. संबधित संस्थाकडून शेतकरी उपस्थिती प्रमाणपत्र घेऊन खात्री करण्याची कार्यवाही सुरू आहे.

विभागीय कृषी सह संचालक छत्रपती संभाजीनगर यांनी सादर केलेल्या अंतिम तपासणी अहवालानुसार, शेडनेटगृहाच्या सेवापुरवठादारांच्या देयकाची जीएसटी विभागाकडून पडताळणी करण्याची कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, छ.संभाजीनगर विभाग, छ.संभाजीनगर व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांच्या स्तरावर करण्यात येत आहे. तसेच सदर अहवालानुसार जे अधिकारी दोषी आढळून आलेले आहेत त्यांना विभागीय कृषी सह संचालक छत्रपती संभाजीनगर यांनी रू. १,४६,४५,०६३/- इतक्या वसुलपात्र रकमेची नोटीशी दिलेल्या आहेत. तसेच, सदर अनियमिततेस जबाबदार उर्वरित अधिकारी व कर्मचारी यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी दोषारोपपत्र तयार करण्याची आणि सद्य:स्थितीत विभागीय चौकशी सुरू असलेल्या अधिकारी/कर्मचारी विरूध्द पुरक दोषारोप तयार करण्याची कार्यवाही विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांच्या स्तरावर सूरू आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पच्या बाबतीत विविध टप्प्यावरील डेस्क साठी प्रकल्प कार्यालयाचे दि. ०३/०७/२०१९ अन्वये संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत. मार्गदर्शक सूचनेमध्ये नमूद तांत्रिक निकषानुसार लाभार्थीने घटकाचे काम केल्याबाबतची खातरजमा कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन मोका तपासणी द्वारे केली जाते. तसेच पूर्ण झालेल्या घटकाचे प्रकल्पाच्या डीबीटी ॲपद्वारे भौगोलीक स्थानांकनासह फोटो घेतले जातात. मोका तपासणी अंती प्रस्ताव योग्य आढळून आल्यास लेखाधिकारी स्तरावर संपूर्ण अनुदान प्रस्ताव तसेच मोका तपासणी अहवाल, शिफारस केलेली अनुदानाची रक्कम याची पडताळणी केली जाते व उपविभागीय कृषी अधिकारी स्तरावरून अनुदान अदायगी DBT प्रणालीद्वारे लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात वर्ग करण्यास अंतिम मंजुरी दिली जाते. त्यानुसार शेडनेटगृह या घटकाच्या बाबतीत लाभार्थी अर्जास पूर्वसंमती देणे, मोका तपासणी करणे व अनुदान अदायगीस अंतिम मंजुरी देणेबाबतचे अधिकार उपविभागीय कृषी अधिकारी यांना देण्यात आले आहेत. वैयक्तिक लाभांच्या घटकांच्या बाबतीत मंजुरीचे सर्व अधिकार

प्रकल्प स्तरावरून निर्गमित मार्गदर्शक सुचनेनुसार क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

या प्रकल्पांतर्गत कार्यान्वित असलेली डीबीटी प्रणाली डेटा सुरक्षा आणि पारदर्शकतेच्या प्रगत मानकांवर आधारित आहे. डीबीटी प्रणाली विकसित झाल्यानंतर केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान (Meity) मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार डीबीटी प्रणालीचे सायबर सिक्युरिटी ऑडिट करण्यात आले आहे. त्याबाबतचे प्रमाणीकरण झालेनंतरच डीबीटी प्रणाली प्रत्यक्ष वापरासाठी सुरु करण्यात आली आहे. सदर प्रणालीमधील प्रत्येक कृतीचा 'एंड-टू-एंड' ऑडिट लॉग जतन केला जातो. यामध्ये वापरकर्त्याचा आयडी, क्रिया (Action), अपलोड केलेले दस्तऐवज आणि मंजुरीचा टप्पा यांसारखी माहिती टाईम-स्टॅम्पसह डेटाबेसमध्ये संग्रहित केली जाते. अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी सदर प्रणालीमध्ये सुरक्षा स्तर विकसित केले आहेत. अधिकाऱ्यांसाठी युजर आय डी + पासवर्ड आणि मोबाईल-आधारित ओ.टी.पी. अशा दुहेरी सुरक्षा प्रणालीचा वापर केला जातो. लाभार्थी लॉगिनसाठी आधार संलग्न ओ.टी.पी. किंवा बायोमेट्रिक प्रमाणीकरण तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. लाभार्थ्यांच्या सत्यापनासाठी केंद्रीयकृत आधार प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. प्रकल्पांतर्गत डीबीटी प्रणालीवरील सर्व डेटा हा सुरक्षित रुपात साठविला जातो.

जागतिक बँकेसोबतच्या कर्ज कराराअन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (CAG) यांचे वतीने प्रकल्पाचे दरवर्षी मा. महालेखाकार कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत बाह्यलेखापरिक्षण केले गेले आहे.

प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या DBT प्रणाली मध्ये शेतकऱ्यांना अग्रीस्टॅक फार्मर आय डी वापरून अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना अर्ज करण्यासाठी ७/१२ व ८-अ हे दस्तावेज सादर करण्याची आवश्यकता नाही. तसेच MahaDBT प्रणालीमधून शेतकऱ्यांनी यापूर्वी लाभ घेतलेल्या विविध शासकीय योजनेच्या लाभाची माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांना लाभ देण्यापूर्वी पडताळणीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सदरच्या योजनेमध्ये लाभापासून कोणत्याही शेतकऱ्याला वंचित ठेवण्यात आलेले नाही अथवा डावलण्यात आलेले नाही. प्रकल्पाच्या टप्पा १ अंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये ९६,०१२ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ७८६.१९ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला त्यामध्ये प्रामुख्याने शेडनेट या घटकासाठी ३२५८ शेडनेटगृहासाठी लाभार्थ्यांना रुपये २६६.४३ कोटी लाभ देण्यात आला आहे. त्याच प्रमाणे कृषि व्यवसाय घटकासाठी ११५९ लाभार्थ्यांना रुपये १३९.६ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे.

H/1842 *******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.2671

मा. श्री. सुरेश धस, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०5 अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 2671 पुढीलप्रमाणे आहे:-

"कृषी विभागातील तत्कालीन विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती श्री. प्रमोद लहाळे व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर श्री. शंकर तोटावर यांच्याविरुद्ध कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी तसेच श्री. शंकर तोटावर यांच्याविरुद्ध महिलेचे लैंगिक शोषण करण्याचा प्रयत्न केल्याबाबतची गंभीर तक्रार शासनाकडे सादर करूनही संबंधितांकडून आर्थिक देवाणघेवाण करून सदर प्रकरणे दडपून टाकल्याचे दिसून येणे, श्री. शंकर तोटावर यांच्याविरुद्ध धाराशिव, लातूर, वाशिम, वर्धा, अमरावती येथील गैरकारभाराबाबत असंख्य तक्रारी प्राप्त होऊनही त्यांना निलंबित न करणे व विभागीय चौकशीत दोषी असतनाही लहाळे यांना दोषारोप न सादर करणे, श्री. प्रमोद लहाळे यांच्याविरुद्ध असंख्य तक्रारी प्राप्त होऊनही त्यांना चौकशी न करता सेवानिवृत्तीचा लाभ देण्यात आल्याचे दिसून येणे, श्री. लहाळे यांचे दोषारोप आणि चौकशीत दोषी आढळून आलेले असतानाही त्यांना दोन पदोन्नती बहाल केल्या जाणे, अशा प्रकारे गंभीर स्वरूपाच्या भ्रष्टाचार व लैंगिक शोषणाच्या तक्रारी असतानाही संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करणे व त्यांना संरक्षण देणे, याबाबतीत श्री. प्रमोद लहाळे सध्या सेवानिवृत्त यांचेवर फौजदारी कारवाई व श्री. शंकर तोटावर यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्याची तसेच लैंगिक शोषणाच्या प्रकरणात महिलेची योग्य न्याय मिळवून देण्याची आवश्यकता आणि यासंदर्भात शासनाची प्रतिक्रिया"

मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन

कृषि विभागातील विविध योजनांमधील गैरव्यवहार आणि शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी बेकायदेशीरपणे सुरु केलेल्या कृषि निविष्ठा व उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्रे यांच्या चौकशीसाठी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आणि कृषि विभागाच्या विविध योजनांमधील गैरव्यवहारासंबंधी प्राप्त गंभीर स्वरुपाच्या इतर तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशीसाठी दि. ४ नोव्हेंबर २०२५ च्या शासन आदेशान्वये श्री. निरंजन कुमार सुधांशु, भाप्रसे, महासंचालक यशदा, पुणे यांची विशेष चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच कृषी विभागातील तत्कालीन विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती श्री. प्रमोद लहाळे व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर श्री. शंकर तोटावर यांच्याविरुद्धचे प्राप्त तक्रार अर्ज

प्राथमिक चौकशी करण्यासाठी कृषी आयुक्तालयाचे पत्र दि. ०६/११/२०२५ अन्वये श्री.निरंजन कुमार सुधांशु, भाप्रसे, महासंचालक यशदा, पुणे यांचेकडे वर्ग करण्यात आले. श्री.निरंजन कुमार सुधांशु, भाप्रसे, महासंचालक यशदा, पुणे यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल दि.२०.०१.२०२६ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यावर कार्यवाही कार्यान्वित आहे.

सन 2023 - 24 च्या निवडसूचीतून महाराष्ट्र कृषि सेवा गट - अ अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातून कृषि सहसंचालक संवर्गात पदोन्नती प्रस्तावात श्री.तोटावार हे विचारक्षेत्रातील अधिकारी होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आस्थापना मंडळ क्र.2 यांच्या दि.26.08.2024 रोजीच्या बैठकीमध्ये श्री.तोटावार यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू असल्यामुळे त्यांचे पदोन्नती प्रकरण मोहोरबंद पाकीटात ठेवण्याचा निर्णय आस्थापना मंडळाने घेतला आहे.

श्री.प्रमोद लहाळे, तत्कालीन उप विभागीय कृषी अधिकारी यांना दि.१२/३/२००८ रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आली, त्यावेळी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु नव्हती.

श्री.लहाळे हे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी या पदावर असताना दि.23.09.2024 रोजीच्या शासन आदेशान्वये "सक्त ताकीद ही शिक्षा देण्यात आली तसेच शासनाला झालेल्या रु.२५,९४८/- इतक्या आर्थिक नुकसानीची वसुली त्यांच्या वेतनातून करण्यात यावी" असेही आदेशित करण्यात आले आहे. सबब, श्री.लहाळे यांची विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या दि.01.08.2019 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आस्थापना मंडळ क्र.2 च्या शिफारसीनुसार पात्रता तपासून त्यांना विभागीय कृषी सह संचालक या पदावर दि.१५/१०/२०२४ रोजी पदोन्नती देण्यात आली आहे.

श्री. प्रमोद लहाळे, तत्कालीन विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती हे दि.३१/०७/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम २३ नुसार भविष्य निर्वाह निधीची ९० टक्के रक्कम, तसेच वित्त विभागाच्या दि. २७ मे १९९२ शासन निर्णयानुसार देणे अनिवार्य असलेली गट विमा योजनेची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच आयुक्तालयाने प्रस्तावित केल्यानुसार श्री.लहाळे यांच्याविरुध्द सद्य:स्थितीत विभागीय चौकशी सुरु/प्रस्तावित नसल्याने शासन परिपत्रक दि.१८/१२/२०२५ मधील तरतूदीनुसार, दि.01.01.2026 च्या शासन पत्रान्वये श्री.लहाळे यांना ना-चौकशी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

H/1839 - 10

*******

<u>गृह (परिवहन) विभाग</u>
<u>लक्षवेधी सूचना क्र.१०७२</u>

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२६ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा.श्री.संदिप क्षीरसागर,श्री.रोहित पवार,श्री.अभिजीत पाटील वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०७२ खालीलप्रमाणे आहे.:-

"महाराष्ट्राची जीवनवाहिणी असलेल्या एस टी महामंडळात, ३० रुपयांत नास्त्याची योजना गुंडाळून ठेवून प्रवाशांना घाणेरडे खाद्यपदार्थ देऊन लुटणऱ्या हॉटेल मालकांना थांबा देऊन हव्या तेवढ्या बसेस हॉटेलवर थांबविण्यासाठी प्रचंड आर्थिक उलाढाल होणे, जयेश बामणेला ह्याकरिता नियमबाह्यरित्या महाव्यवस्थापक करणे, बामणेने भ्रष्टाचाराच्या पैशातून मिळविलेल्या बेहिशोबी मालमत्तेची चार वर्षापासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चौकशी करीत असणे, बामणे विरोधात बार्शीच्या कार्यकर्त्यांने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांकडे दि. ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी तक्रार केलेली असणे, महामंडळाने यामिनी जोशी व इतरांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७-अ नुसार चौकशीची परवानगी दिलेली असणे, जोशीचीच अकार्यकारी पदावर बदली होणे, नाशिक विभाग नियंत्रक असताना ठक्कर बिल्डरचा फायदा व महामंडळाचे नुकसान यामिनी जोशीने केल्याचे सिध्द होऊनही जोशीला बडतर्फी ऐवजी ताकिद देऊन सोडणे, महामंडळातील भ्रष्टाचाराच्या एसआयटी चौकशीची तसेच वेगवेगळया कारणास्तव एसीबी चौकशी चालू असलेल्यांना अकार्यकारी पदावर बदलून त्यांची बढती रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

## निवेदन

### {श्री.प्रताप सरनाईक,मा.मंत्री (परिवहन)}

राष्ट्रीय / राज्य महामार्गावरील रा.प. बसेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रवासा दरम्यान नैसर्गिक विधीची व खानपानाची सोय व्हावी याकरिता रा.प. महामंडळाने खाजगी हॉटेल / मोटेलच्या ठिकाणी अधिकृत हॉटेल थांबे देण्याबाबत वेळोवेळी धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सद्यस्थितीत कार्यरत असलेले अधिकृत हॉटेल थांब्यांना परिपत्रक क्र.०३/२०१८ मधील अटी व शर्तीनुसार थांबे निश्चित करण्यात आले होते. सदर कार्यपद्धतीमध्ये

प्रवाशांना रु.३०/- मध्ये चहा व नाश्त्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. कालानुरूप हॉटेल / मोटेल कार्यपद्धतीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करून नव्याने सुधारित हॉटेल /मोटेल कार्यपद्धती ०५/२०२५ निर्धारित करण्यात आलेली आहे. सदर कार्यपद्धती तयार करताना सद्यस्थितीतील महागाई व इतर सर्व बाबी विचारात घेता, रा.प.प्रवाशांना रु.४०/- मध्ये चहा व नाश्ता उपलब्ध करून देण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

रा.प. महामंडळाने विविध मार्गांवर खाजगी हॉटेलच्या ठिकाणी अधिकृत थांबे निर्धारित केलेले आहे. सदर अधिकृत हॉटेल थांब्यांच्या ठिकाणी प्रवासी जनतेस कोणत्याही स्वरूपाची तक्रार (निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ असणे, प्रसाधनगृहे स्वच्छ नसणे, रा.प. प्रवाशांना रु.४०/- मध्ये चहा व नाश्ता उपलब्ध करून न देणे, इत्यादी स्वरूपाच्या तक्रारी) प्राप्त झाल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करून संबंधित हॉटेल चालकांवर संबंधित विभागांमार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

श्री.जयेश बामणे, रा.प.महामंडळ यांच्या विरुध्द तक्रार प्राप्त झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाकडे श्री.बामणे यांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्यास परवानगी मागितली होती, त्यानुसार गृह विभागाने दि.१६.०१.२०२३ रोजीच्या पत्रानुसार श्री. जयेश बामणे तत्कालीन उपमहाव्यवस्थापक (मा. व.त), रा.प.महामंडळ यांच्या मालमत्तेची उघड चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार श्री.बामणे,उपमहाव्यवस्थापक (नियोजन व पणन) यांच्या मालमत्तेची उघड चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात येत आहे.

तद्नंतर रा.प.महामंडळाच्या दि.२०.१.२०२३ रोजीच्या आदेशानुसार महाव्यवस्थापक (नियोजन व पणन), मध्यवर्ती कार्यालय, मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.जयेश बामणे यांना सोपविण्यांत आला होता.परंतू रा.प.महामंडळाने दि.०५.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री.जयेश बामणे यांची महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) रा.प.मध्यवर्ती कार्यालय,मुंबई या पदाचा सोपविण्यात आलेला अतिरिक्त कार्यभार कायम ठेऊन, उपमहाव्यवस्थापक (नियोजन व पणन) (अकार्यकारी) म्हणून नेमणूक करण्यात आली व त्यांचे प्रशासकीय व आर्थिक अधिकार गोठविण्यात आले आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्या दि.१०.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये दि.०५.०२.२०२६ रोजीच्या तक्रार अर्ज ला.प्र.वि. मुंबई विभाग येथे प्राप्त झालेला आहे. अर्जामधील आक्षेपानुसार अर्ज गैरअर्जदार श्री.जयेश बामणे यांचे विरुध्द सुरु असलेल्या उघड चौकशी क्र.०१/२०२३ मध्ये सामाविष्ठ करण्यात आला असून, सदर प्रकरणाची चौकशी सुरु असल्याचे कळविले आहे.

मा.ना.श्री.जयकुमार गोरे, मा.मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अधिकारी व इतर यांचेविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागास सादर केलेल्या तक्रार अर्जास अनुसरुन, संबंधितांविरुद्ध चौकशी / पुसतपास करण्यास दि.१३.०२.२०२५ अन्वये अधिकारी तथा लोकसेवक यांचेवर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाप्रकरणी चौकशी करण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ कलम १७ (अ) अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

श्रीमती यामिनी जोशी यांची दि.०३.११.२०२५ अन्वये प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.नियंत्रण समिती क्र.१ (मुंबई प्रदेश) या पदावरुन उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) (अकार्यकारी), भोसरी, पुणे या पदी प्रशासकीय बदली करण्यांत आली आहे. दि.०५.०४.२०१४ ते दि.१३.०३.२०१८ या कालावधीत विभाग नियंत्रक या जबाबदारी कार्यरत असतांना, बसस्थानकावर (सी.बी.एस.ठक्कर बाजार-नविन बसस्थानक) असलेल्या स्वच्छतागृहाच्या

प्रचालनाकरीता निविदा प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या. सदर निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने न्यायालयील प्रकरणांचा पाठपुराव्यासंबंधित पत्रव्यवहार, विभागीय अभियंता (स्थापत्य) यांचेवर सक्षम नियंत्रण नसल्याची बाब वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प.नाशिक विभाग यांनी सादर केलल्या अहवाल क्र.२०१, दि.२१.०८.२०१८ अन्वये प्रथमदर्शनी निदर्शनास आली होती. श्रीमती जोशी यांचा या प्रकरणात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे लक्षात येत नसल्याने तसेच तसा निष्कर्ष सुरक्षा व दक्षता अधिकारी यांनी सुद्धा काढलेला नसल्याने अहवालात नमूद केल्यानुसार त्यावेळी असलेल्या सिंहस्थ कुंभमेळयाची कामे लक्षात घेता झालेल्या पर्यवेक्षकीय शैथिल्याबाबत त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशीची कारवाई करणे योग्य होणार नसल्याने श्रीमती जोशी यांना यापुढे पर्यवेक्षणात योग्य ती खबरदारी घेण्याची समज आदेश क्र.६६६, दि.३१.१२.२०२१ अन्वये देण्यात आली असून प्रकरण नस्तीबद्ध करण्यात आले.

रा.प.महामंडळातील भ्रष्टाचाराच्या एसआयटी चौकशीची तसेच वेगवेगळ्या कारणास्तव एसीबी चौकशी चालू असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांना बढती देण्यांत आलेली नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

******

गृह (परिवहन) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१९५३

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२६ (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९५३ खालीलप्रमाणे आहे. :-**

**"अमरावती जिल्ह्यातील ता. वरुड येथील मौजा. राजुरा बाजार येथे दि. १८/०२/२०२६ रोजी शिवाई ई बस व ऑटो यांच्या भीषण अपघात होऊन यामध्ये ऑटोरिक्षामधील ४ जणांचा जागीच मृत्यू होणे तर ३ जण गंभीर जखमी झाले असणे, सदर बस ही खाजगी कंपनीची असल्यास संबंधित वाहन चालकास केवळ ०८ ते १० दिवसांचे अल्पकालीन प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे समजणे, तसेच या चालकांच्या प्रशिक्षणाची पडताळणी कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात आलेली नसणे, त्यामुळे सदरहू अपघाताची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे, भविष्यात अशा प्रकारचे अपघात टाळण्यासाठी परिवहन विभागाने ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज, तसेच या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबाना शासनाकडुन किमान २० ते २५ लक्ष रुपये आर्थिक मदत देण्याबाबत मागणी होत असणे, रस्त्यावरील सुरक्षा व्यवस्था, वेग मर्यादा व वाहतुक नियंत्रण व चालकास हेडफोन बंदी, (गाडी चालवतांना हेडफोन वापरुन गाणे ऐकणे) मद्यप्राशन करत असल्यास चाचणी करणे याबाबत स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून सदर शिवाई खाजगी बस भरती प्रक्रियेची पूर्ण चौकशी करून यात दोषी असणा-या अधिकाऱ्यावर व चालकांवर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

### निवेदन

### {श्री.प्रताप सरनाईक,मा.मंत्री (परिवहन)}

दि १८.०२.२०२६ रोजी अंदाजे १०.३० वा. रा.प. वर्धा विभागातील वर्धा आगाराची ई- शिवाई बस क्र. एम एच ४९ बीझेड ९४३६ वरुड ते वर्धा या मार्गावर धावत असताना वरुड राजूराचे दरम्यान राजूराचे जवळ तीन चाकी ऑटो रिक्षाला समोरासमोर धडक लागून प्राणांतिक स्वरुपाचा अपघात झाला आहे. त्यामध्ये ५ जणाचा मृत्यु झाला असून २ जखमी आहेत. सदर अपघात हा ऑटो चालक व रा.प.चालक यांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन न केल्यामुळे झाला असुन, सदर अपघातास दोघेही चालक जबाबदार आहेत. सदर अपघाताचा वरुड पोलिस स्टेशन अंतर्गत पंचनामा करण्यात आला आहे.

मे ई व्ही ट्रान्स (एम एस आर) प्रा. लि. यांचेसोबत महामंडळाने केलेल्या करारातील तरतूद क्र.७ Driver Criteria and responsibility of operator नुसार खाजगी बसेसवरील चालकाची नेमणुक

करताना चालकाची ADTT (Automated Driver test track) वर चाचणी घेणे अथवा सदर विभागात ADTT (Automated Driver test track) उपलब्ध नसल्यास विभागीय अधिकाऱ्यांची समिती निश्चित करुन सदर समिती मार्फत चालकाची वाहन चाचणी घेऊन पात्र चालकाची रा.प. वाहनचालक म्हणुन नेमणुक करण्यात येते.सदर तरतूदीनुसार अपघाग्रस्त बसवरील चालकाची समितीमार्फत पडताळणी करुनच त्यांना रा.प. वाहन चालक म्हणुन नियुक्त करण्यास विभागाकडुन परवानगी देण्यात आली होती. करारातील कलम क्र. ७.९ नुसार चालकाचे वर्तन /वागणूक योग्य नसल्यास सेवा समाप्त करणेबाबत नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार सदर अपघातानंतर अपघातास जबाबदार अपघातग्रस्त बसचे चालकाची सेवा बसपुरवठादाराने समाप्त केलेली आहे.

सदर अपघातात त्रयस्थ वाहन ऑटोरिक्षा मधील व्यक्ती मृत व जखमी झाल्या असुन जखमी व्यक्ती किंवा मृत व्यक्तींचे वारसदार यांचेकडुन नुकसान भरपाई वसुलीकरीता रा.प. महामंडळाविरोधात अद्याप पर्यंत कोणताही दावा न्यायालयात दाखल करण्यात आलेला नाही.

रा.प. महामंडळाच्या अपघात विषयक कार्यप्रणालीनुसार त्रयस्थ वाहनासोबत झालेल्या अपघाताबाबत वाहतूक खाते परिपत्रक क्र. २०/२०१६ मधील मुद्दा क्र. ड नुसार खालील प्रमाणे तरतूद आहे.

• त्रयस्थ वाहन अंतर्गत दुचाकी ३ चाकी, ४ चाकी इ कोणत्याही प्रकारच्या इंधनाचा वापर करुन चालविण्यात येत असलेले यांत्रिकी वाहनांचा समावेश होतो.

• सामान्य स्थायी आदेश क्र. ११५३, दि. १९.०६.१९९० नुसार त्रयस्थ वाहन व रा.प. बस अपघात प्रकरणी त्रयस्थ वाहनातील व्यक्तीला रा.प. महामंडळामार्फत तात्कालीक मदत दिली जात नाही.

• त्रयस्थ वाहन आणि रा.प. बस यांचा अपघात झाल्यास त्रयस्थ वाहनातील अपघात ग्रस्तांना मोटार वाहन (सुधारीत) कायदा १९९४ मधील कलम १४० मधील सुधारीत रक्कमेनुसार दोष नसण्याच्या (नाकसुर) तत्वानुसार अपघात नुकसान भरपाईची मागणी करण्यासाठी पी फॉर्म देण्याची तरतूद आहे.

रा.प. महामंडळ व ई व्ही ट्रान्स (एम एस आर ) प्रा.लि (पुरवठादार) यांच्या मधील झालेल्या कराराअन्वये, अपघातामुळे प्रभावित पक्षांद्वारे स्थापन केलेल्या कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कारवाईमुळे उद्भवलेल्या कोणत्याही दायित्वासाठी तसेच तृतीय पक्षांद्वारे उद्भवणाऱ्या दाव्यासाठी रा.प महामंडळ जबाबदार राहणार नाही. नुकसान भरपाई बाबतची संपुर्ण जबाबदारी ही पुरवठादाराची राहील. बस पुरवठादारने अपघात झाल्यास रा.प महामंडळास तातडीने सुचित करावे व दुखापत झालेल्या व्यक्तींना वैद्यकीय मदत देण्यात यावी, अशी करारात तरतूद आहे.

रा.प. वाहतूक खाते परिपत्रक क्र. १४/२०२३ नुसार रा.प. बस चालकांना वाहन चालवित असताना (स्टेअरींगवर असताना) भ्रमणध्वनीचा वापर करण्यास प्रतिबंध करण्याबाबत सुचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच रा.प. महामंडळाकडुन संशयीत मद्यपान चालक /वाहक यांची तपासणी करण्याच्या अनुषंगाने विशेष तपासणी मोहीमा वारंवार राबविण्यात येतात. तसेच आगारांकडुन चालकांची अल्कोटेस्ट उपकरणाद्वारे वेळोवेळी मद्यपान तपासणी करण्यात येते.

******

गृह (परिवहन) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१९५७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२६ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**मा.श्री. मनोज घोरपडे,वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९५७ खालीलप्रमाणे आहे.:-**

**"ग्रामीण भागातील दळणवळणाचे मुख्य साधन ST बस असणे. अपुऱ्या ST बस मुळे शालेय विध्यार्थी/विध्यार्थीनी यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे. लाडक्या बहिणींना प्रवासाचा त्रास होत असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (ST महामंडळ) यांच्यामार्फत राज्यामध्ये वाहन चालकांची भरती करणे आवश्यक असणे, जेणेकरून ग्रामीण भागातील नागरिकांना याचा लाभ होणे, विद्यार्थी तसेच जेष्ठ नागरिक महिलांना दिव्यांगांना ५० टक्के सवलतीची स्कीम लागू केली असून वाहन चालकांच्या अभावामुळे गाड्यांच्या फेऱ्या कमी होणे व याचा लाभ पर्यायाने नागरिकांना न मिळणे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट असणे, सोबतच राज्यामध्ये महामंडळाकडे वाहने जास्त असणे, परंतु ग्रामीण भागामध्ये प्रवासाचे मुख्य साधन एस. टी असणे, परंतु शहरांमध्ये न चालणाऱ्या गाड्या ग्रामीण भागात लावल्याने त्या वारंवार बंद पडत असणे, त्यामुळे ग्रामीण भागासाठी नवीन एसटी बसची सोय होणे गरजेचे असणे,वाहनचालकांची संख्या कमी असणे, तरी तत्काळ शासनाने भरती करण्याबाबत करावयास व नवीन ST बस देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."**

## निवेदन

{श्री.प्रताप सरनाईक,मा.मंत्री (परिवहन)}

रा.प.महामंडळाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये २९.३४ लाख विद्यार्थ्यांना शालेय पासेस वितरित करण्यात आले आहेत. अहिल्याबाई होळकर सवलत योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील ५ वी ते १२ वी पर्यंतच्या मुलींना शाळेत जाण्यासाठी मोफत पास उपलब्ध करुन देण्यात येतात. या योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये २४.६१ लाख पासेस देण्यात आले आहेत. रा.प. महामंडळामार्फत सद्यस्थितीत दैनंदिन ३०,१७७ शालेय फेऱ्या चालविण्यात येत असून या फे-यांद्वारे शालेय विद्यार्थ्यांची प्रवासाची सोय करण्यात येते. याव्यतिरिक्त चालनात असणाऱ्या इतर फेऱ्यांमधून देखील शालेय विद्यार्थी प्रवास करतात. तसेच मानव विकास योजनेअंतर्गत मानव विकास निर्देशांक उंचविण्याकरिता १२५ तालुक्यात ग्रामीण भागातील मुलींना १२ वी पर्यंत

शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून ८७२ स्वतंत्र बसेसद्वारे दैनंदिन सुमारे ५४२१ फेऱ्यांद्वारे ७२४४२ विद्यार्थीनींना गावापासून शाळेपर्यंत मोफत वाहतूकीची सुविधा अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. शिक्षण विभाग, शाळा/महाविद्यालयीन मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी, पालक तसेच सन्माननीय लोकप्रतिनिधी यांच्या मागणीची तातडीने दखल घेऊन फेऱ्या सुरु करण्यात येतात.

शासन निर्देशानुसार विद्यार्थ्यांना विद्यार्थी मासिक पास योजनेमध्ये ६६.६७% ,अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील ५ वी ते १२ वी पर्यंतच्या मुलींना शाळेत जाण्यासाठी १००%, ६५ वर्ष ते ७५ वर्षापर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांना सर्व प्रकारच्या बसेसमध्ये ५०%, ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना सर्व प्रकारच्या बसेसमध्ये १००% सवलत, ४० टक्क्यापेक्षा जास्त दिंव्यांगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना रा.प. महामंडळाच्या साध्या व निमआराम बसेसमध्ये ७५ टक्के तसेच शिवशाही आसनी बसेसमध्ये प्रवास भाडयात ७० टक्के सवलत देण्यात येते. तसेच सर्व महिलांना सर्व प्रकारच्या बसेसमध्ये ५०% सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

रा.प.महामंडळामध्ये चालक/वाहक पदातील रिक्त मनुष्यबळामुळे दैनंदिन सरासरी २८९५ चालक व ३७०७ वाहक यांना डबल डयुटी (अतिकालिक भत्ता) कामगिरीसाठी वापर करण्यात येत आहे. दैनंदिन वाहतुकीसाठी आवश्यक असणाऱ्या नियोजित फेऱ्या चालविण्यासाठी चालक व वाहक पदातील इच्छुक कर्मचाऱ्यांना डबल डयुटी कामगिरी देवून कमतरता पुर्ण करण्यात येत आहे.

रा.प. महामंडळाच्या वाहन ताफ्यातील सर्व वाहने सुस्थितीत रहावी यासाठी विविध कार्यशाळांमध्ये विविध प्रकारची देखभाल केली जाते. यामध्ये दैनिक देखभाल, दशदिनी देखभाल व डेपो डॉकिंग आगार कार्यशाळेत केले जाते. तसेच विभागीय कार्यशाळेमध्ये आरटीओ पासिंग, आरटीओ प्रकारचे काम, पुन:स्थितीकरण हे वाहन देखभालीचे नियतकालिक कार्यक्रम करून वाहनांचा ताफा सुस्थितीत ठेवण्यात येतो. महामंडळाकडून गतवर्षी काढण्यात आलेल्या ई-निविदेच्या अनुषंगाने मे. अशोक लेलँड यांचेकडून २६४० नवीन साध्या तयार बसेस पैकी २५७२ बसेस महामंडळाच्या वाहन ताफ्यात जमा झालेल्या आहेत. महामंडळाकडून यापुढील कालावधीमध्ये ३००० नवीन तयार वाहने खरेदी करण्याबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे व सदर ई-निविदा ही अंतिम टप्प्यात आहे. तसेच ५००० नवीन तयार वाहने खरेदी करण्याबाबत ही ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारणाबाबत गठीत करण्यात आलेल्या दि.२५.०८.२०२१ रोजीच्या उपसमितीच्या बैठकीमध्ये सरळसेवा भरतीबाबत घातलेले निर्बंध उठवून चालनिय पदे सरळसेवेने भरण्याबाबत च्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा नियम ०५-अन्वये लक्षवेधी सूचना क्र .१४६५

सन २०२६ चे ( पहिले) अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री. संजय मेश्राम , वि.स .स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -105 अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्र. १४६५ खालीलप्रमाणे आहे.**

"नागपूर येथील वैनगंगा नदीवरील गोसेखुर्द धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्याने बॅकवाटरचे पाणी आवरमारा, कुजगा, चिचघाट (चापेगडी) येथील शेकडो एकर शेतात शिरल्याने गहू, चना यासारखी रब्बी पिके सडून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असल्याचे दि.१९/१/२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे. येथे गावाला पाणीपुरवठा करणारी यंत्रणाही २० फूट पाण्याखाली गेल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर होणे, येथील ग्रामसथ मागील दोन दशकांपासून या आपत्तीचा सामना करीत असणे, त्यामुळे बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, पाण्याखाली गेलेली सर्व शेतजमीन बुडीत क्षेत्र म्हणून जाहिर करुन कायमस्वरुपी मोबदला द्यावा, वाढीव कुटूंबांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक २ हजार चौरस फुटांचे प्लॉट देऊन पुनर्वसन प्रक्रिया राबवावी, गावाला कायमस्वरुपी आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आदी येथील ग्रामस्थांच्या मागण्या असतानाही त्यावर शासन कारवाई करीत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना "

---

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

नागपूर येथील वैनगंगा नदीवरील गोसेखुर्द धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्याने आवरमारा, कुजबा व चिचघाट (चापेगडी) या गावांच्या परिसरात निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

बॅकवॉटरमुळे शेतीक्षेत्रात पाणी शिरणे : गोसेखुर्द धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्यानंतर आवरमारा, कुजबा व चिचघाट या गावांच्या शेतजमिनीत काही प्रमाणात बॅकवॉटरचे पाणी शिरल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, संबंधित क्षेत्र पूर्वीच गोसेखुर्द प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरिता संपादित केलेले असून, संपादित जमिनीत पिके घेण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. यासंदर्भात पूर्ण संचय पातळीपर्यंत पाणी भरल्यानंतर महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) यांच्यामार्फत उपग्रह प्रतिमा प्राप्त करण्यात आल्या असून ड्रोन सर्वेक्षणही करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षणांच्या आधारे सविस्तर चौकशी सुरू आहे. संपादित क्षेत्र शासनाच्या अधिकारात असून सदर शेतकऱ्यांना भूसंपादन मोबदला देखील दिलेला आहे यास्तव शेत पिकांचे नुकसान भरपाई अनुज्ञेय ठरणार नाही.

पिक नुकसानीबाबत कार्यवाही : ज्या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या शेतातील पिके प्रकल्पाच्या पाणीसाठ्यामुळे बाधित झाली आहेत, अशा प्रकरणांत तहसील कार्यालय व कृषी विभागामार्फत पंचनामे

लक्षवेधी सूचना क्र.१३३९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा.डॉ. तुषार राठोड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-

"सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आजारांचे निदान योग्य प्रकारे होऊन रुग्णांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी निदानात्मक चाचण्या (Diagnostic tests) बाह्य यंत्रणेद्वारे करण्याचा निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र यांनी सन २०१६ मध्ये घेतला असणे, या निर्णयानुसार एचएलएल लाईफकेअर लिमिटेड या संस्थेच्या कंपनीमार्फत सार्वजनिक रुग्णालयांमध्ये विविध चाचण्या करण्याची जबाबदारी देण्यात आली असणे, सदर संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या सेवांबाबत अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या असणे, सन २०२१ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या निविदेत पूर्वीच्या दरापेक्षा सुमारे ३० टक्के अधिक दराने बिल सादर करण्यात येत असून त्यामुळे शासनावर दरवर्षी अंदाजे रुपये ५८ ते १०० कोटींचा अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे करारानुसार सेवा दिल्या जात नसून निदानात्मक चाचण्यांची गुणवत्ता योग्य नसणे, चाचण्यांचे अहवाल वेळेत मिळत नसून, गुणवत्ता नियंत्रणाची कार्यवाही न होणे, प्रयोगशाळांना एनएबीएल मान्यता नसणे, डॉक्टरांनी सुचविलेल्या चाचण्यांव्यतिरिक्त इतर चाचण्या दाखवून बिलात वाढ करणे, कर्मचारी अपूर्ण प्रशिक्षित असणे अशा गंभीर बाबी राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे यांच्या तपासणीत निदर्शनास आल्या आहेत या सर्व प्रकारामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची गुणवत्ता खालावत असून सर्वसामान्य रुग्ण, गर्भवती माता व नवजात बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**श्री. प्रकाश आबिटकर मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये निदानात्मक चाचण्या (Diagnostic tests) बाह्य यंत्रणेद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे. याद्वारे प्राथमिक आरोग्य केंद्रावर ३९ चाचण्या, ग्रामीण रुग्णालय स्तरावर ५२ चाचण्या, उपजिल्हा रुग्णालयात ७४ प्रकारच्या चाचण्या तर जिल्हा रुग्णालयात ८२ प्रकारच्या चाचण्या करण्यात येतात. तसेच १० प्रकारच्या विशिष्ट चाचण्या सुद्धा करण्यात येतात. या सेवांची व्याप्ती नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य केंद्र व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या संस्थांपर्यंत वाढविण्यात आली. त्यामुळे सर्व स्तरावर रुग्णांना तपासणी सुविधा उपलब्ध झाली आहे.

सन २०१७ मध्ये करण्यात आलेल्या करारानुसार प्रयोगशाळा चाचण्यांचे मूळ दर व वार्षिक ३% दरवाढीनुसार सन २०२१ पर्यंत १२% दरवाढ झालेली होती. तर सन २०२८ पर्यंत ३०% दर वाढ होणे अपेक्षित आहे.

मे. एचएलएल लाइफ केअर लि. यांच्या मार्फत तपासण्या करण्यासाठी एकूण १३७ प्रयोग शाळा स्थापना करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी एकूण ५ प्रयोग शाळा या NABL प्रमाणित आहेत. मे.एचएलएल लाइफ केयर लि. यांच्यामार्फत स्थापन करण्यात आलेल्या प्रयोगशाळांमधील चाचण्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी या कार्यालयाच्या मान्यतेने मेडीलॅब डायग्नोस्टिक सेंटर या Third Party (NABL) लॅब सोबत करार करण्यात आला आहे. त्यानुसार मे.एचएलएल लाइफ केयर लि. यांच्यामार्फत करण्यात आलेल्या चाचण्या मेडीलॅब डायग्नोस्टिक सेंटर यांच्यामार्फत तपासून घेण्यात येतात. सदर गुणवत्ता तपासणी नियमितपणे करण्यात येवून अहवाल दरमहा मे. एचएलएल लाइफ केयर लि. यांच्यामार्फत आयुक्त आरोग्य सेवा या कार्यालयास सादर करण्यात येतो.

मे.एचएलएल लाईफ केयर लि. यांच्या सोबत करण्यात आलेल्या करारानुसार सदर प्रकल्पासाठी चाचण्यांचा अहवाल हा qualified Pathologists/Bio-chemist/Microbiologist मार्फत स्वाक्षांकित करून उपलब्ध करून देण्यात येतो. तसेच प्रत्येक आरोग्य संस्थेत प्रशिक्षित Phlebotomist यांची नमुने गोळा करण्यासाठी नेमणूक करण्यात येते आणि त्यांचे प्रशिक्षण मे.एचएलएल लाईफ केयर लि. यांच्यामार्फत घेण्यात येते. मे.एचएलएल लाईफ केयर लि. यांच्यामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या मनुष्यबळाची माहिती वेळोवेळी मागविण्यात येते व तपासण्यात येते. मे.एचएलएल लाईफ केयर लि. यांच्यामार्फत करण्यात येणा-या प्रयोगशाळा चाचण्यांचे अहवाल हे त्यांच्यामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या Pathologist यांच्या स्वाक्षरीने देण्यात येतात.

प्रत्येक चाचण्यांचे TAT ठरलेले आहे आणि त्यानुसार प्राप्त न झालेल्या अहवालांना विलंब आकार आकारण्यांत येतो व देयकातून त्याची रक्कम वजा करण्यात येते. मे.एचएलएल लाईफ केयर लि. यांच्यामार्फत पुरविण्यात येणा-या लॅबोरेटरी सर्विसेस अंतर्गत आतापर्यंत खालीलप्रमाणे रुग्णांनी लाभ घेतला आहे.

| अ .क्र. | आर्थिक वर्ष | रुग्ण संख्या | चाचण्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | फेब्रुवारी -२०१७ ते मार्च-२०१७ | १३९ | ३८८ |
| २ | एप्रिल-१७ ते मार्च -२०१८ | २३३०६२६ | ५४३३९१३ |
| ३ | एप्रिल-१८ ते मार्च -२०१९ | ६४१४५३० | १४७७०७७३ |
| ४ | एप्रिल-१९ त मार्च -२०२० | ९२४०००५ | २२१३३८७९ |
| ५ | एप्रिल-२० ते मार्च -२०२१ | ६२३००८२ | १८५८१२७४ |
| ६ | एप्रिल-२१ ते मार्च -२०२२ | ७९९०८८६ | २७५७९३२५ |
| ७ | एप्रिल-२२ ते मार्च -२०२३ | ९७३४१९४ | ३५११८०९३ |
| ८ | एप्रिल-२३ ते मार्च -२०२४ | १०९९६१४३ | ४४८६७६४९ |
| ९ | एप्रिल-२४ ते मार्च -२०२५ | १२६५९२६७ | ६०८९०२८५ |
| १० | एप्रिल-२५ ते फेब्रुवारी-२०२६ | १२५३८२९६ | ६७०३६७५३ |

राज्य आरोग्य संसाधन केंद्र, पुणे, येथील चमूने यांनी राज्यातील चार जिल्ह्यात (ठाणे, पुणे, नाशिक व कोल्हापूर) येथील विविध स्तरावरील आरोग्य संस्थांची तपासणी केली असता, त्यांच्या प्राथमिक अहवालानुसार खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

- मे.एचएलएल लाईफ केयर लि. यांच्यामार्फत करारानुसार सेवा दिल्या जात आहेत.
- चार जिल्ह्यांपैकी एका जिल्ह्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्रातील चाचणीच्या अहवालात त्रुटी आढळून आल्या.
- अहवालानुसार रुग्णांना चाचणी अहवाल वेळेत मिळण्याचे प्रमाण हे ९७% ते ९९% आहे (सहा महिन्यांच्या माहितीच्या विश्लेषनावरून). भेटी दिलेल्या चार आरोग्य केंद्रांमध्ये मे.एचएलएल लाईफ केयर लि. यांच्यामार्फत करण्यात येणा-या एकूण चाचण्यांपैकी ३ ते ४ चाचण्यांचे अहवाल वेळेत प्राप्त होत नसल्याबाबत निरीक्षण नोंदविले आहे.

सदरील निरीक्षणांच्या आधारे या सेवांचे पुनर्विलोकन करण्यात येत आहे.

*********

लक्षवेधी सूचना क्र. २२६६

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**
**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

श्री. रवी राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२६६ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यातील अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात पल्लवी भूषण गुडदे या नवविवाहितेचा कथित वैद्यकीय हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर व संतापजनक आहे. दि. १६ जानेवारी, २०२६ रोजी ऑपरेशनदरम्यान भूल दिल्यानंतर त्या कोमात गेल्याचा आरोप असून संबंधित वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व भूलतज्ञ यांनी आवश्यक दक्षता घेतली नसणे, असे नातेवाईकांचे म्हणणे आहे. मृतक पल्लवीचे वडील श्री. विनायक संपतराव मोहने यांनी दि.१९/०२/२०२६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींना लेखी निवेदन दिले असून लोकप्रतिनिधींनीही त्याच दिवशी विद्यमान मुख्यमंत्र्यांकडे तातडीने कारवाईची मागणी केली असणे, सदर प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन शासनाने तात्काळ स्वतंत्र व निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याची आवश्यकता, चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी व डॉक्टरांवर मनुष्यवधासह लागू असलेल्या कलमान्वये गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याने रुग्णालयातील वैद्यकीय प्रक्रियेचे पुनरावलोकन करून जबाबदारी निश्चित करणे व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कडक मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

---

मा. श्री. प्रकाश अबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन:-

पल्लवी भूषण गुडधे वय २८ वर्षे / स्त्री ही (G३P२८२ with ७.४ weeks for MTP+TL) साठी दिनांक १२.०१.२०२६ रोजी दुपारी ०१:५० वा. जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथे भरती झाली. रुग्णास १३.०१.२०२६ रोजी Spinal (Saddle) Anaesthesia या भुलीव्दारे MTP (वैद्यकिय गर्भपात) करून दिनांक १४.०१.२०२६ रोजी सोनोग्राफी मध्ये No e/o RPOCS असा रिपोर्ट आल्यानंतर, दि.१६.०१.२०२६ रोजी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करिता (TL) Post करण्यात आले. रुग्ण व रुग्णाच्या नातेवाईकांची संमती व रुग्णाच्या तपासण्या आणि Physician Fitness नंतर रुग्णास ऑपरेशन थिएटर मध्ये नेण्यात आले. रुग्णपत्रिकेनुसार रुग्णास दिनांक १६.०१.२०२६ रोजी भूलतज्ञां द्वारे पूर्व तपासणी (PAC) करून दुपारी २:५५ वा. Spinal Anaesthesia पाठीच्या कण्यामध्ये सुई देऊन भुल देण्यात आली. त्यावेळी रुग्णास झटके आले व ती बेशुद्ध झाली. रुग्णाच्या नातेवाईकांना रुग्णाच्या गंभीर परिस्थिती बद्दल सूचना देण्यात आली व लगेच रुग्णास ऑक्सिजनवर अतिदक्षता विभाग (ICU) जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे संदर्भित करण्याचा निर्णय घेण्यात आला. रुग्णास दिनांक १६.०१.२०२६ रोजी सायंकाळी १७:३० वाजता जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील ICU मध्ये भरती करण्यात आले, रुग्णास Ventilator वर ठेवून औषधोपचार सुरू करण्यात आला. रुग्णास सांयकाळी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील स्त्रीरोगतज्ञांनी उपचार दिला. सायंकाळी ७.०० वाजता जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील भूलतज्ञांनी रुग्णास तपासुन औषधोपचार केला तसेच रुग्णाच्या आवश्यक तपासण्या करण्यात आल्या. यावेळी रुग्ण बेशुद्ध होती.

रुग्णास १६.०१.२०२६ रोजी रात्री १०:२५ वाजता डॉक्टरच्या सल्ल्याविरुद्ध नातेवाईकांनी स्वतः खाजगी रुग्णालयात (रेडियंट हॉस्पीटल अमरावती) स्थलांतरित केले. रुग्णाचा रेडियंट रुग्णालयात दिनांक २३.०१.२०२६ रोजी दुपारी १२:३० ला मृत्यु झाला.

सदर मृत्यू बाबत प्राप्त तक्रारी नुसार जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सामान्य रुग्णालय, अमरावती यांच्या स्तरावरुन सदर प्रकरणाची विस्तृत चौकशी करणे करिता ९ सदस्यीय चौकशी समितीची स्थापना करण्यात आली. सदर तक्रारीच्या विस्तृत व सखोल चौकशीच्या अनुषंगाने समितीने एकुण ४५ कर्मचाऱ्यांच्या बयाणांची नोंद केली. चौकशी समितीच्या अंतिम अहवालानुसार दोषी आढळुन आलेल्या डॉ. अनुप बोंद्रे, भुलतज्ञ, IPHS व डॉ. अपूर्वा कडु, स्त्रीरोगतज्ञ IPHS यांच्या सेवा समाप्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच त्यांचे विरुद्ध पोलिस स्टेशन राजापेठ येथे अपराध क्र ८९/२०२६ क. १०६(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. डॉ. प्रियंका राखाडे, स्त्रीरोगतज्ञ IPHS खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांच्या सेवा समाप्तीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांना सादर करण्यात आला आहे. चौकशी समितीच्या प्राथमिक अहवालानुसार डॉ. अनुप वनसकर यांचा खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांच्याविरुद्ध प्रशासकीय शिस्तभंग कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी श्रीमती सुनिती सुशिलराव हरणे, परिसेविका OT इंचार्ज यांनी कर्तव्यात कसुर केल्यामुळे त्यांचे निलंबनाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. श्रीमती अंजली गभणे अधिपरिचारिका, श्रीमती भाग्याश्री अवघडे अधिपरिचारिका, श्री. अमर कामठे अधिपरिचारिक, कु. सेलिना डेव्हिड उडियार अधिपरिचारिका, श्रीमती श्रद्धा गायकवाड अधिपरिचारिका, श्रीमती पल्लवी पाथ्रीकर, अधिपरिचारिका यांचेवर प्रशासकीय कारवाई करणेबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरण हे जिल्हा वैद्यकीय निष्काळजी तक्रार समिती (District Medical Negligence Board) यांचे समक्ष ठेवण्यात येवून समितीचा अभिप्राय पोलिस स्टेशन राजापेठ अमरावती (श) यांना पुढील कायदेशीर कारवाई करिता पाठविण्यात आला आहे.

जिल्हा वैद्यकीय निष्काळजी तक्रार समिती (District Medical Negligence Board) तसेच जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय अमरावती यांचे स्तरावरुन सदर प्रकरणी गठीत रुग्णालयीन चौकशी समितीच्या अंतिम अहवालानुसार दोषी आढळून आलेल्या डॉ. अनुप बोंद्रे, भुलतज्ञ, IPHS यांचे बाबत उचित कार्यवाही करणे बाबत अध्यक्ष/प्रशासक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना त्यांची कर्तव्ये योग्यरितीने जबाबदारीने पार पाडण्याबाबत वेळोवेळी सुचना देण्यात येत आहेत.

*********

**लक्षवेधी सूचना क्र.२७१७**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**मा.श्री. राजकुमार बडोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-**

"गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील फुटाळा गावातील तलावात दि.०३.०३.२०२६ रोजी सागर आणिक गहाणे व प्रणय गोवर्धन गहाणे हे तलावात बुडणे, त्यांना लगतच्या सौंदड ग्रामीण रुग्णालयात तातडीने उपचारासाठी हलविणे, परंतु, रुग्णालयात ऑक्सीजन सिलेंडर उपलब्ध नसणे, रुग्णांना वेळीच जिल्हा रुग्णालयात हलविण्यासाठी ॲब्युलन्स उपलब्ध न झाल्यामुळे मुलांचा मृत्यू झाल्याचा गावकऱ्यांचा आरोप असल्याने ३०० ते ४०० लोकांनी ग्रामीण रुग्णालयात जाऊन घेराव करणे, रुग्णालयात अपुरे डॉक्टर वर्ग व शवविच्छेदन गृह सुरु नसणे, एक्स रे टेक्नीशीयन नसल्यामुळे एक्स रे बंद असणे, रुग्णालयात योग्य पाणी पुरवठा सोयी नसणे, मृतांच्या कुटूंबाला प्रत्येकी १० लक्ष रुपये देण्यात यावे व संबंधीत वैद्यकीय अधिक्षकांचे निलंबन करण्यात यावे या मागणीसाठी लोकांनी आंदोलन करणे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली, प्राथमिक आरोग्य केंद्र इळदा अशा अनेक ठिकाणी असलेला अपुरा कर्मचारी व अपुऱ्या सोयी सुविधा, उपजिल्हा रुग्णालय सडक-अर्जुनी व अर्जुनी मोर मंजूर होऊन त्यावर संथगतीने होणारी कार्यवाही व गोंदिया जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील ग्रामीण रुग्णालये व प्रा.आ.केंद्र व उपकेंद्रातील अपुरा कर्मचारी व सोयी सुविधांचा अभाव, परिणामी जनतेत पसरलेला असंतोष लक्षात घेता आरोग्य केंद्रात कर्मचारी व सोयीसुविधा तत्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

---

**श्री. प्रकाश आबिटकर, मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन**

नागपूर परिमंडळांतर्गत असलेल्या गोंदिया जिल्हयातील सौंदड येथे दि.०३.०३.२०२६ रोजी सागर आणिक गहाणे व प्रणय गोवर्धन गहाणे हे तलावात बुडाले, त्यांना लगतच्या सौंदड ग्रामीण रुग्णालयात तातडीने उपचारासाठी सकाळी ११.३० वाजता आणले असता रुग्णालयात डॉ.रणजित बघेले (वैद्यकीय अधिकारी, एमबीबीएस), कु. सिमा पटले (अधिपरिचारिका), श्री मंगेश कोदाणे (कक्षसेवक) व श्री लेकराम ब्राम्हणकर (सुरक्षा रक्षक) हे कर्तव्यावर हजर होते. दोन्ही बालकांची प्रकृती अति गंभीर असल्यामुळे तेथील कार्यरत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्यावर अनुषंगिक औषोधोपचार (CPR, OXYGEN, SUCTION व औषोधोपचार ) करुन पुढील उपचाराकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथे दुपारी १२.३० वाजे दरम्यान संदर्भित करण्यात आले. तेथील १०२ रुग्णावाहीका ही बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, गोंदिया येथे गर्भवती मातेला घेऊन आलेली होती व १०८ रुग्णवाहीका ही देखील बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, गोंदिया

येथील गरोदर स्त्री रुग्णाला घेऊन नागपुर येथे गेलेले होते. तेथील परिस्थिती लक्षात घेता नागरीकांच्या सहकार्याने १ रुग्णाला खाजगी रुग्णवाहीकेमध्ये ऑक्सिजन सह व दुसऱ्या रुग्णाला उपलब्ध असलेल्या पोलीस वाहनामध्ये ऑक्सिजन सह संदर्भित करण्यात आले.

आकृतीबंधानुसार मंजूर असलेल्या पदांनुसार ग्रामीण रुग्णालय, सौंदड जि. गोंदिया येथील वर्ग-१ ते वर्ग-४ पदे भरलेली असुन ग्रामीण रुग्णालय, सौंदड जि. गोंदिया येथील मंजुर भरलेल्या व रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदांचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक, गट-अ, **वर्ग-१** | १ | १ | ० |
| २ | वैद्यकिय अधिकारी, **गट-अ** | ३ | ३ | ० |
| ३ | अधिपरिचारिका | ७ | ७ | ० |
| ४ | प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी | १ | १ | ० |
| ५ | क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी | १ | १ | ० |
| ६ | प्रयोगशाळा सहाय्यक | १ | १ | ० |
| ७ | दंत शल्यचिकित्सक | १ | ० | १ |
| ८ | सहाय्यक अधिक्षक | १ | १ | ० |
| ९ | कनिष्ठ लिपीक | २ | २ | ० |
| १० | औषधी निर्माण अधिकारी | १ | १ | ० |
| ११ | वर्ग-४ | ६ | ६ | ० |
| १२ | वर्ग-४ सफाईगार | २ | २ | ० |
| | **एकूण** | **२७** | **२६** | **१** |

ग्रामीण रुग्णालय, सौंदड जि. गोंदिया येथील शवविच्छेदन गृहामध्ये डागडुजी प्रस्तावीत असल्यामुळे तेथील शवविच्छेदन करणे सद्यःस्थितीत बंद असून डागडुजी पुर्ण झाल्यावर शवविच्छेदनगृह सुरु करण्यात येईल. रुग्णालयात प्रयोगशाळा सेवा, नियमित सुरु असून रुग्णालयात एक्स-रे मशिन उपलब्ध आहे. परंतु क्ष-किरण यंत्र कार्यान्वित होण्याकरिता आवश्यक असलेले साधन सामुग्री सिआर (कॅम्पुटर रेडिओग्राफी) सिस्टिम ही सन २०२५-२६ मध्ये डि.पी.सी. अंतर्गत मंजुर झालेली असून खरेदीची प्रकिया सुरु आहे. सिआर (कॉम्प्युटर रेडिओग्राफी) सिस्टिम उपलब्ध झाल्यावर क्ष-किरण सेवा पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करणे शक्य होईल तसेच रुग्णालयात पाणी पुरवठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

गोंदिया जिल्हयातील ग्रामीण रुग्णालय, अर्जुनी मोरगांव ३० खाटांचे ५० खाटा मध्ये तसेच ग्रामीण रुग्णालय, सडक अर्जुनी ३० खाटांचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन झालेले आहे. अर्जुनी मोरगांव येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व निवासस्थान बांधकामाकरीता ढोबळ अंदाजपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सडक अर्जुनी १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व निवासस्थान बांधकामाकरीता ढोबळ अंदाजपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा

रुग्णालय, गोंदिया यांच्या दि.२०.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, गोंदिया यांना कळविण्यात आले आहे.

जिल्हयातील अतिदुर्गम भागातील ग्रामीण रुग्णालय, देवरी, चिचगड, सडक अर्जुनी, मोरगांव अर्जुनी, नवेगांव बांध, सौंदड, सालेकसा, या पैकी ग्रामीण रुग्णालय, चिचगड, मोरगांव अर्जुनी, सडक अर्जुनी, सौंदड, देवरी येथील वैद्यकीय अधीक्षक, वर्ग-१ यांची पदे भरलेली आहेत. ग्रामीण रुग्णालय, सालेकसा, नवेगांव बांध येथील वैद्यकीय अधिक्षकांची पदे रिक्त आहेत. तसेच जिल्हयातील वैद्यकीय अधीक्षक, वर्ग-१ या पदांची एकूण १२ पैकी ७ पदे भरलेली आहेत व उर्वरित ५ पदे रिक्त आहेत.

जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र, चिखली व प्राथमिक आरोग्य केंद्र, ईळदा येथे ५ नियमीत कर्मचारी कार्यरत असुन बाहय यंत्रणेमार्फत ८ पदे भरलेली आहेत. दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी व प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे पद रिक्त असुन सदर पदे बाहययंत्रणेमार्फत भरण्याची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र येथे सर्व सोयी सुविधा उपलब्ध असून, गोंदीया जिल्ह्यातील अतिदुर्गम ४ तालुक्यातील मंजुर, भरलेले व रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे आहे. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पुढील भरती वर्षात शासनाचे धोरणानुसार करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | पदांचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी, **गट-अ** | २४ | २४ | ० |
| २ | वैद्यकिय अधिकारी, **गट**-ब | २२ | २२ | ० |
| ३ | मानसेवी वैद्यकीय अधिकारी | ८ | ८ | ० |
| ४ | आरोग्य सहाय्यक | ४८ | ४३ | ५ |
| ५ | आरोग्य सहाय्यक (महिला) | २२ | २२ | ० |
| ६ | आरोग्य सेवक | ९७ | ७४ | २३ |
| ७ | आरोग्य सेविका | २१४ | १७५ | ३९ |
| ८ | वाहन चालक | २४ | २४ | ० |
| | **एकूण** | **४५९** | **३९२** | **६७** |

वरील नमुद वस्तुस्थितीनुसार ग्रामीण रुग्णालय, सौंदड येथे उपचाकरिता दाखल झालेले दोन्ही बालकांची प्रकृती अति गंभीर अवस्थेत होती व तेथील कार्यरत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्यावर उपचार केला असून पुढील उपचाराकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथे संदर्भित केले. ग्रामीण रुग्णालय, सौंदड येथे मनुष्यबळ व रुग्णसेवा सुविधा पुरेशा असून उपलब्ध सर्व सुविधांसह रुग्णालयात दाखल रुग्णांवर आवश्यक ते सर्व उपचार करण्यात येतात. त्यामुळे रुग्णांच्या सेवेमध्ये निष्काळजीपणा झालेला नाही.

*********

लक्षवेधी सूचना क्र.२७६४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा.श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-

"स्व. इंदिरागांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय व महिला व बाल रुग्णालय यांचे २.७० एकर उपलब्ध जागेमध्ये असणे, सदर उपजिल्हा रुग्णालयास १०० वरून २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात येणे, असे असतांनाही या रुग्णालयात अद्याप यंत्रसामुग्री, उपकरणे व साधनसामुग्रीचा असलेला तुटवडा, त्यामुळे रुग्णांना अत्यावश्यक सोयी-सुविधा, मशिनरी उपलब्ध होत नसल्याने अन्य खाजगी रुग्णालयात जाण्याची आलेली वेळ, त्यामुळे त्यांना बसत असलेला आर्थिक भुर्दंड, रुग्णालयास तात्काळ यंत्रसामुग्री, उपकरणे व साधनसामुग्री पुरविणेबाबत तसेच नवीन रुग्णवाहिका देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेला पत्रव्यवहार, अदयाप पत्राची दखल न घेणे, सावर्जनिक आरोग्य विभाग यांनी श्रेणीवर्धन करुन २०० खाटांचे करण्यात आलेले असून आवश्यक यंत्रसामुग्री, उपकरणे व साधन सामुग्री खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता देणे, परंतु अदयाप एकही निविदा उपलब्ध न झाल्याने फेरनिविदा काढण्याची प्रक्रीया सुरु असणे व तात्काळ मंजूर २५७ पदे भरती करण्याची आवश्यकता, तसेच २०० खाटांचे महिला व बाल रुग्णालयचे आकृतीबंधानुसार १८९ पदनिर्मिती प्रस्ताव शासनाकडे सादर होणे, सदर प्रस्ताव अंदयाप मंजूरी न मिळणे, उपरोक्त दोन्ही रुग्णालये एकाच जागेत / परिसरात असल्याने रुग्णांना एकाच ठिकाणी सर्व उपचार मिळणे सोईस्कर होणे, त्याचबरोबर रुग्णालयातील कर्मचाऱ्याकरिता निवासस्थानाची असलेली आवश्यकता, आपात्कालीन परिस्थितीत डॉक्टर, कर्मचारी, परिचारिका यांची गरज भासल्यास उपलब्ध व्हावेत याकरिता रुग्णालयानजीक कर्मचारी निवासस्थान उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, सध्याची भिवंडी शहराची वाढती लोकसंख्या पाहता सदरहू दोन्ही रुग्णालयांची असलेली महत्वाची गरज पाहता या रुग्णालयास तात्काळ सोयी-सुविधा, पदभरती, कर्मचारी, डॉक्टर निवासस्थान, तसेच यंत्रसामुग्री, उपकरणे व साधनसामुग्रीचा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

---

श्री. प्रकाश आबिटकर मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. रुग्णालय - २००७/प्र.क.३९४/०७/आरोग्य-४ दिनांक ८.२.२०११ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे १०० खाटांचे स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय सार्वजनिक आरोग्य विभागास हस्तांतरण करण्यात आलेले आहे.

स्व. श्रीम. इंदिरा गाधी स्मृती रुग्णालय भिवंडी हे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय दिनांक ०१.१०.२०११ पासून कार्यान्वित आहे. शासन निर्णय दिनांक १७.१.२०१३ अन्वये मंजूर केलेल्या बृहत

आराखड्यामध्ये या रुग्णालयाचे १०० खाटांवरून २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यात येऊन शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ अन्वये २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धित आरोग्य संस्थाकरीता २५८ पदनिर्मिती करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय दिनांक २२.०८.२०२५ अन्वये राज्यातील नवनिर्मित आरोग्य संस्थांसाठी लागणारे यंत्र सामुग्री व वैद्यकीय उपकरणासाठी रु.८९,०७,४५,१२०/- एवढ्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रशासकीय मान्यतेनुसार खरेदीची कार्यवाही महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणा मार्फत सुरु आहे. तसेच कुशल/अकुशल पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच वर्ग-१ व गट अ, वर्ग-३, वर्ग-४ ची नियमित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

रुग्णवाहिका सुविधेबाबत

स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय भिवंडी येथे चार रुग्णवाहिका उपलब्ध असून चारही रुग्णवाहिका सद्यस्थितीत पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. गंभीर गरोदर माता व आवश्यक रुग्णांना पुढील वैद्यकीय उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे व कळवा रुग्णालय तसेच मुंबई येथे निशुल्क शासकीय रुग्णवाहिकांमधूनच संदर्भित करण्यात येत आहे.

१०२ क्रमांकाच्या टोल फ्रि रुग्णवाहिका व महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकिय सेवा प्रकल्पांतगर्त १०८ क्रमांकाच्या टोल फ्रि रुग्णवाहिकेमार्फत गंभीर रूग्ण, गरोदर माता व आवश्यक रुग्णांना संदर्भित करण्यात येते.

माता व बालसंगोपन केंद्र (MCH)

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय भिवंडी येथे माता व बाल संगोपन केंद्र बांधणे हे काम सन २०२२-२३ व २०२३-२४ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मध्ये दिनांक २६.०५.२०२३ रोजी मंजुर असून रु. ५८००.०० लक्ष एवढया रकमेस दिनांक ११.०९.२०२३ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचेमार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच रु. ३८,९०,७८;८४८/- इतक्या रकमेस राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडून दिनांक २०.१२.२०२३ रोजी तांत्रिक मान्यता दिली आहे. विद्युत कामासाठी रु. ८,१८,०४,५४५/- इतक्या रकमेस मुख्य अभियंता (विद्युत) सा.बां. विभाग, मुंबई यांनी दिनांक १५.०१.२०२४ रोजी तांत्रिक मान्यता दिली आहे.

निविदा प्रक्रियेद्वारे मे. स्पेक्ट्रम इन्फ्रास्ट्रक्चर यांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सदरची इमारत तळमजला + ७ मजले आहे. सदरचे काम उप अभियंता, पायाभुत सुविधा विकास कक्ष, रा.आ.अ.जिल्हा परिषद, ठाणे यांचेमार्फत सुरु असुन बांधकाम ४७% झाले असून काम प्रगतीपथावर सुरु आहे.

नव्याने स्थापन होणाऱ्या २०० खाटांचे माता व बालसंगोपन केंद्राचा (MCH WING) १९० पदांचा पदनिर्मितीकरिता प्रस्तावावर कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

अधिकारी कर्मचा-यांकरीता निवासस्थान:

स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय भिवंडी येथे रुग्णालयातील अधिकारी व कर्मचा-यांकरीता शासकिय निवासस्थानाची सोय उपलब्ध नाही.

रुग्णालयात खालीलप्रमाणे सोईसुविधा उपलब्ध आहेत.

बाह्यरुग्ण विभाग, अपघात विभाग, बालरोग, नेत्ररोग, स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ, कान नाक घसा तज्ञ, सर्जन, भुलतज्ञ, दंतविभाग इ.,रूग्णालयातील मुख्य शस्त्रक्रिया विभागामध्ये सामान्य शस्त्रक्रिया गृह-२ व मॉडयुलर ओटी-३ कार्यान्वित आहेत.

डिजीटल एक्स रे / ईसीजी / सीटी स्कॅन/सीटीसी/डायलिसीस विभाग / NCD / MLC/ Physiotherapy / HIV व ART विभाग कार्यान्वीत असुन रुग्णांना आवश्यक सेवा देण्यात येतात. डायलिसिस विभागात ७ मशिन कार्यन्वित आहेत. कुपोषीत बालकांकरीता सीटीसी विभाग कार्यन्वित आहे. क्ष-किरण तसेच सीटीस्कॅन रुग्णांचे टेलिरिपोर्टींग क्रस्ना डायग्नोस्टीक या संस्थेकडून अद्यावत होतात.

१६ खाटांचे नवजात शीशू विभाग (SNCU) सुविधा उपलब्ध आहे. ३६ खाटांचे प्रसूती विभाग पुर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे. रुग्णांकरीता Blood Storage Unit ची सुविधा सुरु आहे. रुग्णांकरीता प्रयोगशाळा ची सुविधा सुरू आहे. तसेच HLL हिंदलॅब लिमीटेड या संस्थेमार्फत सर्व प्रकारच्या रक्त चाचण्या करण्याची मोफत सुविधा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे. २१ + ६ शव क्षमतेचे शवागृह पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे. रुग्णालयातील सर्व प्रकारचे यंत्रसामुग्री व उपकरणांचे मॅपींग AOV कंपनी कडून करण्यात येतात. या रुग्णालयात डोळ्याच्या शस्त्रक्रिया (गोतीबिंदु) नियमित होतात व त्याचबरोबर प्रसुती चे प्रमाण जिल्हा रुग्णालयाच्या बरोबरीने होते.

रुग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांवर रुग्णालयात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत आवश्यक ते सर्व उपचार केले जातात. स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असून या रुग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांची संख्या जिल्हा रुग्णालया एवढी आहे. इतर उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रमाणकानुसार व आय. पी. एच. एस. च्या मानांकनानुसार रुग्णहितार्थ सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात व त्यापासून कोणीही रुग्ण वंचित राहत नाही.

स्व इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय, भिवंडी येथेमागिल ५ वर्षांमध्ये रुग्णांना पुरविण्यांत आलेल्या आरोग्य सुविधांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रूग्णालयीन सेवा | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बाह्यरूग्ण | ५०३७७ | १०६७४१ | १७०८३७ | १९९४२६ | २४४२५४ |
| २ | आंतररूग्ण संख्या | ८६३४ | १३२०७ | १६९०५ | १४५७५ | १४७८४ |
| ३ | मोठ्या शस्त्रक्रिया | ११५ | ११८ | ४६१ | ४२१ | १२६६ |
| ४ | छोट्या शस्त्रक्रिया | ५०७ | ५८८ | ४०३ | २७८३ | ७६८१ |
| ५ | सिझर केसेस (प्रसुती) | ८१ | २०३ | ३२१ | १७५ | ७२१ |
| ६ | प्रयोगशाळा चाचण्या | ५२८६९ | ३७१३४ | ९३४८३ | ११३६२८ | १२५०१७ |
| ७ | क्ष-किरण | २४९० | ४८३८ | ६९७४ | ९२३० | १३१३० |

| अ.क्र. | रूग्णालयीन सेवा | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | सी.टी. स्कॅन चाचण्या (सन २०२० पासून सुरू करण्यात आले) | ४०४ | ११२५ | ६१० | १४२३ | ३०७९ |
| ९ | न्याय वैद्यकिय केसेस (एमएलसी) | ८५७४ | १२८८७ | १३२११ | २९८८४ | ९८५९ |
| १० | एकूण प्रसुति | २९९० | ३९९१ | ४१५८ | ३७९२ | ३६३१ |
| ११ | एकूण ई.सी.जी चाचण्या | ९५० | २२९६ | ३०८७ | ३६७१ | ४९५५ |
| १२ | डायलिसीस (जून २०२२ पासून सुरू करण्यात आले) | ० | ० | १३६ | २८३ | ६६९ |
| १३ | सोनोग्राफी | ० | ० | १०९० | १७७१ | ३१२८ |
| १४ | एकूण शवविच्छेदन | ७५१ | ६६० | ७०० | ७४९ | ६५३ |
| १५ | दंतचिकित्सा | १३३५ | ३७४७ | ४३५० | ४३०५ | ७३३३ |
| १६ | फिजीओथेरपी | २६४ | १७३१ | १६२७ | ३१८ | ५०२५ |

*******

**लक्षवेधी सूचना क्रमांक २२३६**

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

"श्री.अस्लम शेख,मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२३६ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाकडे कोविड-१९ कालावधी २०१९-२० पासून ते अद्याप कार्यरत कंत्राटी/तदर्थ बी.ए.एम.एस.वैद्यकीय अधिकारी कार्यरत असणे, या वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत समावेशन करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या स्तरावर तत्कालीन मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार माहिती संकलीत असून त्याबाबत प्रस्ताव देखील तयार करण्यात आला असणे, परंतु निवडणूक आचारसंहितेमुळे सदर बाब प्रलंबित रहिली असणे, तसेच याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दि.७/१/२०२५ व दि.२४/३/२०२५ रोजी कार्यवाही करणेबाबत सूचना देणे, मात्र त्यावर अद्याप कार्यवाही झाली नसणे, तसेच काही दिवसापूर्वी झालेली एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी नियुक्ती व आता जून, २०२५ महिन्यांत येणारे बंधपत्रित एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी यामुळे सदर बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी कार्यमुक्त होण्याची दाट शक्यता असणे, तरी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी यांना शासन सेवेत समावेशन करावे, अशी त्यांची मागणी असणे, परंतु शासन करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी या वैद्यकीय अधिकाऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री.प्रकाश आबिटकर, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन**

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्रामुख्याने आरोग्य सेवेमध्ये आधुनिक औषधोपचार पद्धती (ॲलोपॅथी) व पारंपारीक भारतीय औषधोपचार पद्धती (आयुर्वेद) या औषधोपचार पद्धतींचा वापर केला जातो. या दोन्ही उपचार पद्धतीमध्ये आरोग्य विभागांतर्गत राज्यस्तरावर वैद्यकीय अधिकारी गट-अ मध्ये एमबीबीएस संवर्गात एकुण ७९३६ पदे मंजूर असून ५४३५ पदे भरलेली आहेत तर २५०१ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (बीएएमएस) संवर्गात ८२८ पदे मंजूर असून ५७१ पदे भरलेली आहेत तर २५७ पदे रिक्त आहेत. त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकारी गट-ब मध्ये (बीएएमएस) या संवर्गात १३१८ पदे मंजूर असून पैकी ७०६ पदे भरलेली तर ६१२ पदे रिक्त आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आपीएचस मानांकन निश्चित करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत आधुनिक औषधोपचार पद्धती (ॲलोपॅथी) व पारंपारीक भारतीय औषधोपचार पद्धती

(आयुर्वेद) या दोन्ही अंतर्गत सेवा दिल्या जाणा-या आरोग्य संस्थांकरीता सदर मानांकन निश्चित करण्यात आलेले आहेत. राज्यामध्ये सर्व आरोग्य संस्थांच्या आकृतीबंधामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

बीएएमएस तदर्थ/कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कोविड-१९ कालावधी २०१९-२० पासून कार्यरत आहेत. कंत्राटी/तदर्थ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांचे समावेशन करण्याबाबत विविध निवेदने/पत्रे शासनास प्राप्त झाले आहेत.

यापूर्वी विभागाच्या दिनांक ०२/०२/२००९ च्या अधिसुचनेनुसार ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीकरीता अस्थाई स्वरुपात कार्यरत असलेल्या एमबीबीएस अर्हताधारकांचे वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावर समावेशन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ११/०१/२०१९ रोजीच्या अधिसुचनेनुसार अस्थाई बीएएमएस वैद्यकीय अधिकारी गट-ब यांचेही समावेशन करण्यात आले आहे.

राज्यामध्ये आरोग्य विभागांतर्गत बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत देण्यात येणा-या सेवा या पर्यायी सेवा म्हणून अपेक्षित नाहीत. कारण रुग्णालय स्तरावर व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर दिल्या जाणा-या सेवांमध्ये आधुनिक औषधोपचार पद्धती (ॲलोपॅथी) चा वापर केला जातो. त्यामुळे त्या ठिकाणी एमबीबीएस / तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता असते. अशा पदांवर बीएएमएस वैद्यकीय अधिकारी हा पर्याय असू शकत नाही. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर तात्पुरती व्यवस्था म्हणून मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीद्वारे ११ महिन्यासाठी शासन निर्णय दि. ४ जुलै २०१९) कंत्राटी/तदर्थ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांचे कंत्राटी पध्दतीने नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत नियुक्त्या केल्या जातात.

मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय बाबतचे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८ ऑगस्ट २००५ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये "अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्याला विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा कर्मचा-यांनी नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे" असे नमुद केलेले आहे. तसेच तात्पुरत्या अस्थाई कर्मचा-यांनी नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करण्यात येणार नसल्याचे त्यांना स्प्ष्टपणे सांगण्यात यावे असे निर्देश शासनाने दिनांक शासन पत्र दि. ०६/०३/२०२४ अन्वये दिलेले आहेत.

शासन निर्णय आदेश क्र. कंत्राटी-२०२३/प्र.क्र.५९०/सेवा-३/दि.११ सप्टेंबर, २०२३ अन्वये सार्वजानिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमिक आरोग्य केंद्रात) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गातील रिक्त पदे नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत बंधपत्रित एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवारांमधून भरण्यात यावीत. त्यानंतर सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. अर्हताधारकांमधून भरण्यात यावीत. त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास, ती पदे कंत्राटी पध्दतीने बी.ए.एम.एस अर्हताधारकांमधून त्या ठिकाणी नियमित वैद्यकीय अधिकारी अथवा बंधपत्रित एम.बी.बी.एस. अर्हताधारक अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत असे नमुद आहे.

तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आलेले एमबीबीएस किंवा बीएएमस तदर्थ वैद्यकीय अधिकारी जर त्या आरोग्य संस्थेत बंधपत्रीत वा नियमित एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी नियुक्त झाल्यास कंत्राटी / तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा समाप्त केल्या जातात. सद्यस्थितीत नवीन पदभरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

ॲड. श्रीजया चव्हाण, श्री. जितेश अंतापुरकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २८३२ पुढीलप्रमाणे आहे:
"नांदेड जिल्ह्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रासह महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालये तसेच वैद्यकिय महाविद्यालये असूनही सदर रुग्णालयांची असणारी दुरावस्था, तेथील यंत्रसामुग्रीची वेळीच न होणारी दुरुस्ती, अस्वच्छता, असमाधानकारक वैद्यकीय सुविधा यासह, नांदेड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदे अंतर्गत वैद्यकिय अधिकाऱ्यांपासून आरोग्य सेवका पर्यंत मंजूर पदांपैकी मोठया प्रमाणावर पदे रिक्त असणे, त्यापैकी काही रिक्त पदे ही वरिष्ठ स्तरावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांची असणे, वैद्यकीय अधिकारी तसेच परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह सहाय्यक वैद्यकीय सेवांमधील कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे गंभीर आजारी असलेल्या रुग्णांना नाईलाजाने खाजगी रुग्णालयांमध्ये अधिक खर्चासह वैद्यकीय उपचार करुन घेणे अपरिहार्य ठरल्यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची भूमिका".

---

मा. श्री. प्रकाश अबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन:-

नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण ७० प्रा.आ.केंद्र, ३८४ उपकेंद्र , ०७ आयुर्वेदिक दवाखाने, ०६ युनानी दवाखाने व इतर आरोग्य संस्था कार्यरत आहेत. तर, नांदेड आरोग्य विभाग, म.न.पा अंतर्गत ११ बाह्यरुग्ण व ०२ अंतरुग्ण म.न.पा. दवाखाने, २८ आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यरत आहेत. नांदेड जिल्ह्यात डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपूरी, नांदेड येथे मोठ्या प्रमाणात रूग्ण उपचाराकरीता येत असतात.

नांदेड जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या इमारती जुन्या व दुरवस्थामध्ये / मोडकळीस आल्या होत्या. त्याबाबत १५ वा वित्त आयोग अंतर्गत जीर्ण व जुन्या उपकेंद्राच्या इमारती पाडून एकूण ३८ उपकेंद्राचे नवीन बांधकामास सन २०२५-२६ मध्ये मान्यता मिळाली असून सदरील बांधकामास कार्यारंभ आदेश मिळालेले आहेत व बऱ्याच ठिकाणी बांधकाम सुद्धा चालू झालेले आहेत. सन २०२४-२५ मध्ये जीर्ण झालेल्या एकूण ९७ प्रा आ केंद्र / उपकेंद्र बांधकामांना मान्यता मिळाली होती , त्यापैकी ६४ आरोग्य संस्थांचे बांधकाम पूर्ण झालेले असून इतर संस्थाचे बांधकामे प्रगतीपथावर आहेत. नांदेड जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता नियमितपणे राहण्यासाठी कायाकल्प हा आरोग्य उपक्रम जिल्ह्यात यशस्वीपणे राबविला जात आहे. नांदेड महापालिकेतील रुग्णालयात दैनंदिन स्वच्छता राखण्यात येत असून वैद्यकीय महाविद्यालयात देखील स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घेतली जात आहे. नांदेड महापालिकेतील रुग्णालयात पुरेशी यंत्रसामग्री उपलब्ध आहे. तसेच, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये विष्णुपूरी येथे रुग्णांच्या तपासणीसाठी सी.टी. स्कॅन यंत्र उपलब्ध असून पी.पी.पी तत्वावर सी.टी. स्कॅन व एम.आर.आय मशीन रुग्णांच्या तपासणीकरिता उपलब्ध

आहे. वैद्यकीय महाविद्यालयात यंत्रसामग्रीची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे केली जात असून यंत्रे सुरळीतपणे कार्यरत आहेत. नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्य संस्थांमधील उपकरणांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असून यंत्रसामग्री व उपकरणे सुस्थितीत राहतील याकरीता आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत.

नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषद आरोग्य विभागातील एकूण १६१४ मंजूर पदांपैकी ११७२ पदे भरलेली असून ४४२ पदे रिक्त असून त्यापैकी वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची १६७ पदे मंजूर असून त्यापैकी १३८ पदे भरलेली आहेत, तसेच आरोग्य सेवक ( पु ) ४० % ची २३८ मंजूर पदांपैकी २३० पदे भरलेली आहेत, आरोग्य सेवक ( पु ) ५० % ची १४४ मंजूर पदांपैकी ११६ पदे भरलेली आहेत, आरोग्य सेविका महिला ची मंजूर ६२६ पदांपैकी ३५५ पदे भरलेली आहेत, औषधनिर्माण अधिकाऱ्यांची ९२ मंजूर पदांपैकी ८६ पदे भरलेली आहेत. सदर अधिकारी/ कर्मचारी तसेच, वैद्यकीय अधिकारी गट-ब, युनानी मिश्रण, कुष्ठरोग तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सहायक ( पु ), आरोग्य पर्यवेक्षक ( वि ), आरोग्य सहायिका ( स्त्री ), आरोग्य सेवक ( पु ) १० % यासारख्या पदांवर कार्यरत अधिकारी / कर्मचारी नागरीकांच्या सेवेकरिता कार्यरत आहेत. ज्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त आहेत अशा ठिकाणी बंधपत्रित अथवा तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने रुग्णांना समाधानकारक, दर्जेदार व सर्वसमावेशक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

*****************************